या मंडळाची स्थापना १९७५ मध्ये झाली. आर्थिक दृष्ट्या निराधार व दुर्बल स्त्रियांना स्वयंरोजगारासाठी सहाय्य देणे. तसेच त्यांना रोजगार व उत्पादनाचे साधना मिळवून देणे अशी कामे हे महामंडळ करते. उद्योजकता विकास खाद्यान विक्री, टेलीफोन केंद्र चालविणे व्यवसाय मार्गदर्शन, इलेक्टॉनिक वस्तुची असेंबली करणे. दुध वितरण, केरोसिन विक्री, शिवनकेंद्र अशा उपक्रमामध्ये महिलांचा सहभाग आयुर्विमा महामंडळाच्या सहकार्याने विमा एजंट ३ महिन्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम, उपहार गृह चालविणे, केटरिंग सेवा गणवेश पुरवठा इ. कामे महिला आर्थिक विकास महामंडळ करते. महाराष्ट्र राज्यामध्ये वरील संस्था कार्यरत आहे. हया संस्थाना महाराष्ट्र सरकारद्वारे अर्थसहाय्य देण्यात येते.

**१.८ औद्योगिक विकासासाठी केंद्र सरकारची योजना :**

- राज्यातील औरंगाबाद, रत्नागिरी, चंद्रपूर, या जिल्ह्यामध्ये कारखाना सुरु करावयाची असेल तर स्थिर भांडवलाच्या ९५% रक्कम सबसिडी म्हणून केंद्र शासनातर्फे दिली जाते.

- बेकार इंजिनियर व तंत्रज्ञ स्वतःच्या लघुउद्योग सुरु करणार असतील तर वित्तिय संस्थांचा कर्जावरील व्याजदर ७% यातील फरक केंद्रशासन देते.
- सरकारी औद्योगिक वसाहती सुरु करण्याचा निर्णय घेतला. २००५-०६ पर्यंत १९४ वसाहतींना मंजुरी मिळाली. तेव्हा १२५ वसाहतीमध्ये प्रत्यक्ष उत्पादन सुरु होते.

**रोजगार संवर्धनासाठी कार्यक्रम :-**

रोजगार संवर्धनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये पुढील प्रमाणे कार्यक्रम राबविले जातात,

१. सुशिक्षित बेकारासाठी वीज भांडवल पुरविणे ४% या अल्प व्याजदराने, तसेच औद्योगिक प्रकल्पावरील १० ते २०% खर्च शासन सहन करते.

२. उद्योजक प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रकल्पाची उभारणी पूर्ण होऊन उत्पादन चालु होईपर्यंत उद्योजकाला विद्यावेतन देणे, तसेच त्यांना मार्गदर्शन करणे हे कार्य केले जातात.

३. सुशिक्षित बेकारांसाठी त्यांनी स्वतःच्या उद्योग सुरु करावा यासाठी दरमहा रु. १०० ते ४०० इतके विद्यावेतन देवून प्रशिक्षण मार्गदर्शन दिले जाते. तसेच कामाचा अनुभवही दिला जातो.

४. रिक्षाचालकांना सिमांत साहय देणे.

५. राज्यात विविध ठिकाणी जाऊन बेरोजगारांची माहीती गोळा करणे व रोजगारांसाठी माहीती देणे, यासाठी २१ फिरती रोजगार विनिमय केंद्र राज्यात कार्यरत आहेत.

**इतर योजना :-**

१. राज्यात उद्योजकता विकास करण्याचे पध्दतीशीर प्रयत्न व्हावे म्हणून औरंगाबाद येथे उद्योजकता विकास केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राची कार्यालये मुंबई, नागपुर, पुणे, अमरावती, नाशिक, कोल्हापूर येथे असून येथून उद्योजक हे मासिक ही नियमितपणे प्रकाशित केले.

२. राज्यातील उद्योगधंद्याची एकीकरण अधिक वेगाने व्हावे म्हणून शासनाने ६५ विकास केंद्रे स्थापन केली आहेत. त्यातुन रोजगार विकासास मदत मिळणार आहेत.

३. नागरी कमाल मर्यादा कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या जमिनिचा औद्योगिक वापर व्हावा म्हणून शासनाव्दारे परवानगी देण्यात आली आहे.

४. उत्पादकांशी सर्वकष दर्जा व ISO-9000 प्रमाणपत्र मिळवावे यासाठी शासन मार्गदर्शन व ५०% खर्च करते.

५. नवव्या औद्योगिक धोरणाचा भाग म्हणूण राज्यातील किनारी जिल्ह्यामध्ये विशेष सवलत दिली जाते.

नियोजनाची कास धरल्यानंतर भारतसरकारने १९५०-१९५५ या कालावधीकरिता पहिली पंचवार्षिक योजना जाहीर केली. पहिल्या पंचावार्षिक योजनेमध्ये कृषी क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला. भारताच्या औद्योगिक विकासाला चालना व गती पंचवार्षिक योजनाच्या काळात मिळाली, आणि स्वयंचलित व स्वावलंबी विकासाचा पाया घातला गेला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यात आल्यामुळे औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचे स्वरुप मर्यादीत राहिले.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर विशेष भर देण्यात आला.[९]

एकदंरीत महाराष्ट्र राज्याला औद्योगिक पार्श्वभूमी असलेली आढळून येते. असे असले तरी प्रादेशिक असमतोल सुध्दा या औद्योगिक क्षेत्रात पहायला मिळतो या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात प्रादेशिक असमातोलाचा आणि औद्योगिक पार्श्वभूमी अभ्यासली आहे.

**संदर्भग्रंथ :**


१. प्रा. एच. एम. देसर्डा, मराठवाडा २००१, खंड पहिला प्रमुख संपादक, भुजंगराव कुलकर्णी, मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद. Pg. No. - १५३ - १६०

२. तर्कतिर्थ - लक्ष्मणशास्त्री जोशी. विश्वकोष खंड - ३, पृष्ठ क्र. -१२६

३. तर्कतिर्थ - लक्ष्मणशास्त्री जोशी, विश्वकोष खंड - ३, पृष्ठ क्र.- १२८ ते १३०

४. तर्कतिर्थ - लक्ष्मणशास्त्री जोशी, विश्वकोष खंड - ३, पृष्ठ क्र.- १३०

५. तर्कतिर्थ - लक्ष्मणशास्त्री जोशी, विश्वकोष खंड - ३, पृष्ठ क्र. - १३० ते १३१

६. महाराष्ट्रातील आर्थिक पाहणी - २००८-०९, महाराष्ट्र शासन, मुंबई. पृष्ठ क्र.- २७-२८

७. महाराष्ट्र - २००६ संतोष दास्ताने, रामचंद्र आणि कंपनी, पुणे. (२००६) पृष्ठ क्र. ९७

८. महाराष्ट्र-२००६ संतोष दास्ताने, रामचंद्र आणि कंपनी पुणे. (२००६) (पृष्ठ क्र. १२६-१४०)

९. महाराष्ट्र - २००६ संतोष दास्ताने, रामचंद्र आणि कंपनी, पुणे (२००६) पृष्ठ क्र. (पृष्ठ क्र. १४०-१५२)

## ¯Ööक्ú ¸णÖ 2 ¸।

# ÃÖ¿ÖÖ¬Ö⌐Ö ¯Ö¾Ö ÃÖÖ×ÆŸÖढÖÖ“ÖÖ †ÖœÖ¾ÖÖ


2.1 ¯ÖÖÃŸÖÖ¾Ö⌐ÖÖ

2.2 ÃÖ²Ö¬ÖßŸÖ ÃÖÖ×ÆŸÖढÖÖ“ÖÖ †ÖœÖ¾ÖÖ

2.3 ÃÖ¿ÖÖ¬Ö⌐Ö ÃÖÖ×ÆŸÖढÖÖ“ÖÖ †ÖœÖ¾ÖÖ

2.4 ´ÖÆÖ¸ÖÂ™ÖŸÖß»Ö ¯ÖÖ¤×¿Öक्ú

†ÃÖ´ÖŸÖÖ»ÖÖ¾Ö¸ß»Ö क्úÖÆß †³ढÖÖÃÖ

†Ö×णÖ ÃÖ×´ÖŸढÖÖ“ÖÖ †ÖœÖ¾ÖÖ

2.5 †Öª×ठÖक्ú ×¾Öक्úÖÃÖÖÃÖ²Ö¬Öß ¬ÖÖ¸णÖ

2.6 ÃÖ¿ÖÖ¬Ö⌐ÖÖ“Öß ˆ×§Â™¶

2.7 ´ÖÖ×ÃÖक्ú, ¯ÖÖ×ॡक्ú ¾Ö ¿ÖÖ¬Ö×⌐Ö²Ö¬ÖÖ“ÖÖ

†ÖœÖ¾ÖÖ

# प्रकरण दुसरे

# संशोधन पूर्व साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना

संशोधनामधील पुनरावृत्ती टाळण्यासाठी व संशोधनात नाविन्यता येण्याच्या दृष्टीने संबंधित साहित्य व संशोधनाचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा घेतल्याने संशोधकाला आपल्या संशोधन कार्यामध्ये नेमक्या कोणत्या बांबीवर विशेष लक्ष द्यावे, व कोणत्या अंगानी अभ्यास करावा याची दिशा मिळते. आपल्या विषयासंदर्भात अगोदर झालेल्या साहित्य व संशोधनावरुन संशोधन कार्य योग्य दिशेने अग्रेषीत होण्यास मदत होते. पूर्वीच्या संशोधन कार्याचा व साहित्याचा आढावा घेतल्याने आपले संशोधन कार्य अधिक पारदर्शक व निर्दोष होण्यास मदत होते.

संबंधित संशोधनाच्या आढाव्यामध्ये संशोधन विषयासंबंधी असलेली ग्रंथ, प्रबंध, वृत्तपत्रे, मासिके, ज्ञानकोष, तसेच विविध प्रकारचे अभ्यास व संशोधनाचा समावेश होतो. या सर्वांचा उपयोग संशोधक करित असतो.

संबंधित साहित्य व संशोधनाच्या पुनरावलोकनामुळे संशोधकाच्या ज्ञ ाानात भर पडून आपल्या संशोधन विषयाची उकल करण्यास मार्गदर्शन मिळते. संशोधक विश्वासाने कार्य करतो. पूर्व साहित्य व संशोधनाच्या अभ्यासामुळे संशोधन पध्दती, संशोधन साधने, तथ्य संकलनाची साधने, नमुना निवडीचे तंत्र इत्यादीविषयी मार्गदर्शन मिळते. संशोधकाला आपल्या अथक प्रयत्नाने स्वतःच्या संशोधनाचे मुल्यांकन व मूल्यमापन करुन इतरांच्या कार्याशी आपल्या कार्याची तुलना करता येते. मी **''महाराष्ट्रातील औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलाचा तुलनात्मक अभ्यास'' (विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र )** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास विषय निवडतांना असे दिसून आले की, महाराष्ट्रातील प्रादेशिक असमातोलाबाबत अभ्यास करतांना विदर्भातील अकोला

जिल्हा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा या विषयावर अद्यापही संशोधन झालेले नाही. म्हणून प्रत्यक्ष प्रादेशिक असमतोला संबंधीत संबंधीत काही घटकांचा अनेक संशोधकांनी, अभ्यासकांनी अभ्यास केला आहे. म्हणून या विषयावर झालेल्या संशोधनपूर्व साहित्याचा येथे आढावा घेण्यात येत आहे तो पुढीलप्रमाणे-

## २.२ संबंधीत साहित्याचा आढावा

### १. परमित चौधरी

यांनी आपल्या The Indian Economy: Poverty and Development या पुस्तकात भारताचा विकास आणि आर्थिक समानता या पैलुंवर विचार करीत असे मत मांडले की, भारताने लोकशाही समाजवादाचे उद्दिष्ट ठेवून विकासाचा मार्ग निवडला आहे. देशात लोकशाही व नागरिकांना आर्थिक स्वातंत्र्य असले तरी संपत्तीचे केंद्रीकरण करण्यास अनुमती नाही. उलट केंद्रीकरण कमी करून आर्थिक विषमतेत उत्तरोत्तर घट करणे हे नियोजनाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. त्याचा उल्लेख विविध योजनांमध्ये वारंवार झाला आहे. इतकेच नव्हे तर घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये 'व्यापक हिताच्या रक्षणासाठी राज्याने संपत्ती व उत्पादक साधनांचे केंद्रीकरण होईल अशी रचना राबवू नये असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.' पाचव्या योजनेने हीच गोष्ट वेगळ्या शब्दात मांडली आहे. (Reduction in inequality and economic growth are both indispensable to a successful attack on mass poverty)

परंतु तत्त्व आणि व्यवहार यातील विदारक अंतर हे भारतीय नियोजनाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आपल्या योजना चांगल्या असतात, पण त्या प्रत्यक्षात अमलात येतांना बदलत जातात. आर्थिक विषमता घटवायला हवी यांची वारंवार मान्यता देऊनही देशात विषमता वाढत आहे. वस्तुस्थिती कोणीच नाकारु शकत नाही. (It will be neither too rash nor too soon to draw the conclusion that economic development and economic planning have largly by passed the people who were supposed to be their chief beneficaries)

नियोजनाच्या काळात आर्थिक विषमतेत झालेली वाढ निरनिराळ्या अभ्यासामधून स्पष्टपणे दिसून आली आहे. उद्दिष्ट वेगळे असतांना भारतात आर्थिक विषमतेत वाढ का झाली? या परिस्थितीच्या करणांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल-

- सदोष औद्योगिक धोरण
- कर बुडविण्याची प्रवृत्ती
- उत्पादक साधनांचे विषम वितरण
- भांडवलप्रधान उत्पादन तंत्राला प्रोत्साहन
- वाढती स्फिती
- बेकारी आणि दारिद्रय

आर्थिक विषमतेचा अभ्यास अनेक आधारावर करण्यात येतो. त्यापैकी मुख्य आधारावर काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे-

- १९६४ च्या महालनोबीस समितीच्या अभ्यासानुसार देशाच्या शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील उत्पन्नात विषमता होती.
- नियोजन आणि करारोपणाच्या विविध योजना असूनही भारतात आर्थिक केंद्रीकरण वाढले आहे.
- ग्रामीण भागात आर्थिक विषमतेचा निर्देशक हा धारण क्षेत्रांचे विभाजन आहे.
- ग्रामीण भागात उच्च उत्पन्न गटाच्या हातात धारणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर केंद्रीत झालेले आढळते.
- शहरी आणि ग्रामीण भागात उच्च उत्पन्न गट व निम्न उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगात सहाजिकच उत्पन्ननिहाय विषमता आढळून येते.

एकंदरीत या सर्वांवरून भारतात आर्थिकविषमता मोठ्या प्रमाणावर असल्याचा निष्कर्ष अपरिहार्य ठरतो. [१]

## २. प्रा. लेविस कुझनेट्स

यांच्या मते, विकास आणि आर्थिक समता ही दोन उद्दिष्ट्ये एकाचवेळी साध्य करणे शक्य नाही. विकासाच्या सुरूवातीच्या काळात आर्थिक विषमता वाढू दिली तर त्यामुळे विकासाला मदत होते. जर विकासाचा पुरेसा वेग साध्य करायचा असेल तर समतेच्या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष करावे लागते. कुझनेट्स यांच्या मतानुसार, पश्चिम युरोपयी राष्ट्रे, इग्लंड, जपान इत्यादी देशांचा आर्थिक इतिहास अभ्यासला असता असे दिसून येते की, उत्पन्न व संपत्तीच्या वितरणातील विषमतेमुळे श्रीमंत लोकांना जास्त बचत करणे शक्य झाले व ही बचत त्यांनी उत्पादक कार्यात गुंतविल्यामुळे त्या देशांचा विकास वेगाने झाल जर आर्थिक समानतेवर भर दिला तर बहुसंख्य अशा समान व्यक्तींचे उत्पादन उपभोगावरच खर्च होईल व बचतीचे प्रमाण कमी राहील. त्यांच्या मतानुसार आर्थिक समानता म्हणजे श्रमीक वर्गाला जास्त उत्पन्न त्यांचा जास्त उपभोग व शेवटी लोकसंख्येत वाढ. जर हे घडू द्यायचे नसेल तर राष्ट्रीय उत्पन्नाचा जास्त भाग श्रीमंताच्या हातीच जायला हवा, ज्यामुळे ते जास्त बचत व गुंतवणूक करून विकासाच्या प्रक्रियेला गतिमान करतील.

प्रो. कुझनेट्स यांच्या मते, विकसित देशामध्ये असे दिसून येते की, प्रथमत: आर्थिक विषमता वाढत जाते व नंतर तिच्यात घट होते. विकास जसजसा वाढतो तसतसे त्याचे फायदे सामन्यजनांना मिळू लागतात व त्यामुळे विषमता घटते. अर्थात सुरूवातीच्या काळात विषमता वाढणे अपरिहार्य आहे असे समजून या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष करण्यास हरकत नाही. [२]

## ३. कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स यांच्या मतानुसार, आर्थिक विषमतेचा सरळ अर्थ म्हणजे, समाजातील बहुसंख्य लोकांना कमी उत्पन्न मिळणे हा आहे. त्यामुळे बहुसंख्य लोकांचा उपभोग कमी राहील. दुसरीकडे भांडवलदार अतिरीक्त मूल्यातून नफा मिळवितो, मिळविलेल्या नफ्याची पुर्नगुंतवणूक करतो त्यामुळे उद्योगांमध्ये अतिउत्पादनाची स्थिती निर्माण होईल व शेवटी उत्पादन कमी होईल. म्हणजेच न्यून उपभोग आणि अतिउत्पादन यांच्या चक्रामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्था संकटाच्या अवस्थेकडे जात असते. या घटनांचे मूळ कारण आर्थिक विषमता हे असल्यामुळे तिच्या मदतीने विकास साध्य होतो असे म्हणणे पूर्णतः चुकीचे आहे. [३]

### ४. लॉर्ड जे.एम.केन्स

लॉर्ड केन्स यांनी सुध्दा विषमतेतून विकास या कल्पनेला विरोध केला, त्यांच्या मते, आर्थिक विषमतेचा आधार घेऊन जो समाज अधिक बचत साध्य करतो, तो दीर्घकालीन गतिरोधाच्या (Secular Stagnation) अर्थव्यवस्थेला आमंत्रित करतो. या अवस्थेचे कारण आर्थिक विषमतेला समाजाची उपभोगक्षमता कमी होऊन मागणी घटते. मागणी कमी झाल्यावर उत्पादन जास्त होणे शक्य नाही. त्यामुळे शेवटी अर्थव्यवस्थेत गतिरोध निर्माण होतो. असा गतिरोध विकासाच्या प्रक्रियेशी सुसंगत नाही. अर्थात विकास सुरू ठेवायचा असेल तर गतिरोधाला जन्म देणारी विषमता कमी करणे आवश्यक आहे. [४]

### ५. कारोडो गिनी

कारोडो गिनी या इटालियन संख्याशास्त्रज्ञाने उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता मापनाचे एक प्रमुख तंत्र विकसित केले असून त्याला गिनी सहगुणक या नावाने ओळखले जाते. हे तंत्र त्यांनी आपल्या १९१२ मध्ये “Variability and Mutability” या विषयावरील आपल्या लेखामध्ये प्रकाशित केले. त्यांच्या मते, गिनी सहगणुक हा मापक आहे ज्यामुळे अनेक घटकातील विषमता मोजल्या जाते ज्यामध्ये प्रामुख्याने उत्पन्नातील वितरणाचा समावेश होतो. शुन्य गिनी सहगुणक हा

पुर्णत: समानता व्यक्त करतो जेव्हा प्रत्येक घटक हा समान असतो. जेव्हा गिनी सहगुणक हा एक असतो (100 on the percentile scale) तेव्हा हा मोठ्या प्रमाणातील विषमता व्यक्त करतो. (for example where only one person has all the income). जेव्हा एखाद्या व्यक्तीजवळ नकारात्मक उत्पन्न किंवा संपत्ती असते तेव्हा गिनी सहगुणक का एक पेक्षा जास्त असलेला आढळून येतो. (For larger groups, values close to or above 1 are very unlikely in practice however.)

कारोडो गिनी यांच्या मते केवळ उत्पन्नातील विषमताच गिनी सहगुणकाच्या माध्यमातून मोजता येत नाही तर त्याचबरोबर समाजशास्त्रे, अर्थशास्त्र, विज्ञान, आरोग्य, कृषी आणि अभियांत्रिकी क्षेत्रात सुध्दा याचा वापर विषमतेच्या मापनासाठी करता येतो. असे असले तरी आधुनिक काळात गिनी सहगुणक हा प्रामुख्याने उत्पन्न व संपत्तीतील विषमता मापनासाठी वापरला जातो. गिनी सहगुणक हा लॉरेन्ज व्रक्राच्या सहाय्याने व्यक्त केला जातो.




- जेव्हा गिनी सहगुणक हा शुन्यापेक्षा कमी असतो तेव्हा तो उत्पन्नातील वितरण मोठ्या प्रमाणावर समान असल्याचे दर्शवितो.
- जेव्हा गिनी सहगुणक हा शुन्यापेक्षा जास्त असतो तेव्हा तो उत्पन्नातील वितरण उच्च असल्याचे दर्शवितो.
- शून्य ते एक पर्यंतचा गिनी सहगुणक हा लोकांजवळी *non-negative income or wealth* दर्शवितो.

एकंदरीत गिनी सहगुणक हा उत्पन्न आणि संपत्ती वितरणातील विषमता मांडण्याचे एक प्रभावी साधन असलेल आढळून येते. [५]

**६. प्रा.हर्षमन :**

हर्षमन यांनी असमतोल विकास सिध्दांताची मांडणी केली असून हा सिध्दांत त्यांनी आपल्या *Strategy of Economics Development, new Heven. Yale University Press.1958* या ग्रंथामध्ये मांडला.

हर्षमनच्या मते, कोणत्याही, अविकसित देशाजवळ साधनांची उपलब्धता सिमित असते. परंतु देशाने हाती घेतलेल्या सर्व योजनांचा एकूण खर्च मात्र असतो. तेव्हा सर्व योजना हाती घेणे शक्य नसते. तेव्हा केवळ अशाच योजनांची काळजीपूर्वक निवड करावी लागेल की ज्यांच्या पुर्ततेनंतर राष्ट्रीय विकासामध्ये जास्तीत जास्त वाढ घडून येईल.

हर्षमन यांनी मांडलेली असमतोल विकास प्रक्रिया ही प्रामुख्याने दोन बाबींवर आधारीत असलेली आढळून येते.

१. अतिरिक्त क्षमतेद्वारे विकास

२. कोंडीद्वारे विकास

हर्षमनच्या विवेचनावरुन एक गोष्ट लक्षात येते की, अर्थव्यवस्थेचा विकास पथ सरळ रेषेत असू शकत नाही. याउलट तो नागमोडी मार्गाचा असतो. आर्थिक प्रगतीकरीता मुद्दामच एका क्षेत्रामध्ये ठरवूनच असंतूलन निर्माण करावे लागते व अशा असंतूलनाचा इतर क्षेत्रावर होणारा चांगला परिणाम शेवटी अर्थव्यवस्था संतुलनाकडे जाते. असे हर्षमाने म्हटले आहे. परंतु हा असंतुलन प्रथम कोणत्या क्षेत्रात आणावे हा वादाचा मुद्या आहे. प्रा. हर्षमनच्या मते, खाजगी क्षेत्रात गुंतवणूक कितीही केली तरी सरकारला काही किमान सेवा व सुविधा जनतेला पुरवाव्याच लागतात. म्हणजे शासन किमान सामाजिक खर्च करते.

**मागचा दुवा व पुढचा दुवा:**

पुढचा दुवा हा प्रत्येक उद्योगातील उत्पादनाचा वापर अनेक उद्योगात किती प्रमाणात होतो यानुसार कळतो तर याउलट एखादा उद्योग इतरांकडून ज्या वस्तू खरेदी कराते, त्यास त्या उद्योगाचा मागचा दुवा असे म्हणतात.

उद्योगांची निवड करण्यापूर्वी सरकारने किंवा नियोजन मंडळाने प्रत्येक उद्योगाच्या मागच्या व पुढच्या दुवा यांचे मुल्य माहित करुन घेणे आवश्यक असते. ज्या उद्योगांच्या मागच्या दुव्यांचे मूल्य आणि पुढच्या दुव्यांचे मुल्य यांची बेरीज सर्वाधिक असते, अशाच उद्योगांची क्रमवारी लावून निवड केली जाते.

अशारीतीने हर्षमन यांनी आपल्या असमतोल विकास सिध्दांतात उद्योगांची निवड कशी करावी हे स्पष्ट करुन, भांडवलाचा सुयोग्य वापर कसा करावा हे विषद केले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात जाणीवपूर्वक असमतोल निर्माण करुनच अर्थिक विकास शक्य आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाबद्दल प्रादेशिक असमतोल आहे. महाराष्ट्राच्या ह्या अविकसित भागाचा विकास करण्यासाठी त्या भागामध्ये असणाऱ्या साधनांची विपुलता सिमित आहे. तेव्हा ह्या विभागामध्ये अनेक योजना हाती घेणे शक्य नाही. तेव्हा सर्व योजनांची काळजीपूर्वक निवड करावी लागेल, की ज्यांच्या पुर्ततेनंतर त्या भागाचा विकास घडून येईल.

हर्षमनच्या सिध्दांतामध्ये उपलब्ध भांडवलाचा आर्थिक दृष्टीकोनातून जास्तीत जास्त लाभदायक वापर कसा करावा कोणत्या उद्योगांची निवड करुन अविकसित भागाचा विकास करावा याचा स्पष्ट उल्लेख आहे. राज्य सरकारला ह्या सिध्दांताचा आधार घेऊन सरकारजवळ उपलब्ध असलेले भांडवल, साधन सामग्रीचा उपयोग कोणत्याही उद्योगांची निवड करता येईल व अशा प्रकारे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल दूर होण्यास मदत होईल.

तसेच हर्षमनचे गुंतवणूक धोरण आखतांनाचे पर्यायी पसंती धोरण आणि उत्तर दिनांकित पसंती धोरण ह्या दोन धोरणांचा राज्य सरकारला तसेच इतर गुंतवणूकदारांनाही या धोरणांची मदत होईल यादृष्टीने कोणता उद्योग आर्थिकदृष्ट्या स्विकारावा? उद्योगांच्या पसंती क्रम लावून कोणता उद्योग हाती घ्यावा की जेणे करुन राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकास समतोल प्रमाणात होईल याचा निर्णय घेता येतो.[६]

**७.प्रो.गुन्नार मिर्डल :**

प्रो.गुन्नार मिर्डल्चे नाव आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेच्या मीमांसेत अग्रभागी आहे. मिर्डल यांनी *An Enquriy into the Poverty of Nations* या ग्रंथामध्ये आर्थिक विषमतेची चर्चा केली आहे. त्यांच्या प्रतिपादनानुसार आर्थिक विकासाचा परिणाम म्हणून विकसितांचा विकास होतो आणि जे विकासासाठी प्रयत्न करतात, त्या अविकसिताचे प्रयत्न सफल होत नाहीत. या प्रक्रियेने आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेबरोबर देशांतर्गत विषमताही वाढते. आपल्या सिध्दांताचे स्पष्टीकरण करण्यासाठी प्रो. मिर्डल यांनी प्रतिसारक परिणाम व विस्तारक परिणाम या संकल्पनांचा वापर केला आहे.

**प्रतिसारक परिणाम :**

एका विशिष्ट प्रदेशातील आर्थिक विकासाचे इतर प्रदेशावर होणारे सर्व प्रतिकूल परिणाम होय. यामध्ये श्रमिकांचे स्थालांतरण, भांडवलाचे स्थालांतरण आंतरराष्ट्रीय व्यापार यांच्या प्रतिकुल परिणामंचा समावेश होतो.

**विस्तारक परिणाम:** एका प्रदेशातील आर्थिक विकासाचा इतर प्रदेशात पसरणारे सर्व अनुकूल परिणाम म्हणजे विस्तारक परिणाम.

प्रा.मिर्डलच्या मते, अविकसित देशात प्रतिसारक परिणाम प्रभावी असतात. तर विस्तारक परिणाम दुर्बल असतात. प्रा. मिर्डलने आर्थिक विकास व विषमतेची अत्यंत अभ्यासपूर्व मिमांसा केली आहे. त्यांच्या विवेचनात देशातंर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचे एकत्रित विश्लेषण केले आहे. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत-

१. प्रो.मिर्डलने जगातील अविकसित राष्ट्रे दारिद्रयात का राहतात या महत्त्वाचा प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. राष्ट्राच्या दारिद्रयाचे कारण व परिणाम दारिद्रयच असते असे प्रतिपादन करुन देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय घटकामुळे अविकसित देश मागासलेला राहतो हे त्याचे विवेचन तर्कसंगत आहे.

२. अविकसित देशात प्रतिसारक परिणाम प्रबळ ठरतात हे सत्य आहे. त्याचप्रमाणे देशातांगर्त आणि आंतरराष्ट्रीय घटक

प्रतिसारक परिणामांची तीव्रता वाढवितात, त्यामुळे आर्थिक विषमता वाढत जाते.

३. अविकसित देशामध्ये आयात-निर्यातीमध्ये तफावत असते. देशांतर्गत बाजाराची अपूर्णता व नैसर्गिक साधनांचा अपूरा वापर यामुळे निर्यातीसाठी उत्पादन होत नाही. आयात अधिक व निर्यात कमी असते यामुळे विकासाचा वेग अत्यंत मंद राहतो.

४. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराला विकासाचे इंजिन म्हटले आहे, परंतु अविकसित देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापार फार कमकुवत असतो. त्यामुळे वरील बाब या देशाला लागु होत नाही दिर्घकाळ प्राथमिक वस्तूंचीच निर्यात करणाऱ्या अविकसित राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अटी प्रतिकुल होतात.

अशाप्रकारे प्रा. मिर्डलने प्रगत आणि अप्रगत देशातील आर्थिक व व्यापारी संबंधातून निर्माण होणाऱ्या हानीकारक परिणामाचे विवेचन केले आहे. वाढती आर्थिक विषमता हे आजच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे वास्तव सत्य आहे. हे सत्य सांगण्याचे व त्यामागील कार्यकारण संबंध स्पष्ट करण्याचे कार्य मिर्डल यांच्या प्रतिसारक व विस्तारक परिणामांचा सिध्दांत स्पष्ट करतो.

महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये औद्योगिक विकासामध्ये कमालीची विषमता आहे. विदर्भामध्ये विकास पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने कमी आहे. त्याच्या ह्या अविकसितपणामध्येच त्याचा अविकास दडलेला आहे. कारण, नवीन उद्योग, नवीन उत्पादन, रोजगार यांचा अभावामुळे नवीन गुंतवणूकदार या भागामध्ये गुंतवणूकीस तयार होत नाही. सर्व गुंतवणूक विकसित भागामध्ये आकर्षली जाते व त्या भागामध्ये विस्तारक परिणामामुळे त्या भागाचा विकास होतो व अशाप्रकारे महाराष्ट्राच्या विविध प्रदेशामध्ये असणारा औद्यागिक विकासामधील प्रादेशिक असमतोल आपणास अभ्यासता येतो.

प्रो.मिर्डलचा सिध्दांत प्रतिसारक व विस्तारक परिणाचा वापर करुन दोन प्रदेश, राज्य देश यामधील असणारा विकासातील असमतोल मोजण्यास, त्यांच्या कारणांचा शोध घेऊन ते दूर करण्यासाठी उपाय सुचवितो.[७]

### ८. रुनार नर्क्स

यांनी काही मुलभूत स्वरुपाच्या आर्थिक वैशिष्ट्यामुळे आज जगातील अनेक देश अविकसित आहेत असे मत मांडले. त्यांच्या मते, अविकसित देशातील दारिद्र्याचे मोठे प्रमाण हे एक मुख्य वैशिष्ट्य असून दारिद्र्याशी निगडीत अनेक घटक हे दारिद्र्याचे दृष्टचक्र सातत्याने टिकवून ठेवण्यास मदत करतात.

नर्क्स यांनी समतोल विकासाद्वारे दारिद्र्याच्या दृष्टचक्राचा छेद करता येत असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी मांडलेल्या सिध्दांतानुसार अविकसित देशातील मागासपणा व दारिद्र्य दुर करावयाचे असल्यास, एकाचवेळी वेगवेगळ्या परंतु पुरक अशा उद्योगात गुंतवणूक करुन दारिद्र्याचे दृष्टचक्र तोडता येणे शक्य आहे हे स्पष्ट होते. एका उद्योगाचे उत्पादन दुसऱ्या उद्योगाची निविष्टी किंवा एका उद्योगाचा पुरवठा हा दुसऱ्या अनेक उद्योगांची मागणी ठरते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अतिरिक्त क्षमता व कोंडी निर्माण होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

अर्थात समतोल विकास याचा अर्थ सर्व उद्योगांची वाढ एकाच दराने करावी असे नाही हे दर वेगवेगळे असू शकतात. परंतु प्रत्येक उद्योगांची वाढ पर्याप्त दराने व्हावी तसेच एकाचवेळी अनेक उद्योगांमध्ये गुंतवणूक केल्यामुळे बाजारपेठेचा आकार वाढेल. उत्पादकांना परदेशी बाजारपेठेवर अवलंबून रहावे लागणार नाही. नर्क्स यांनी कृषी व उद्योग क्षेत्रात एकदम गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला आहे. ही दोन्ही क्षेत्र एकमेकांस पूरक ठरुन दोन्ही क्षेत्रांचा समतोल विकास साधता येईल असे म्हटले आहे.

अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करुन सुध्दा अविकसित भागाचा विकास साधता येतो असे नर्क्स यांनी सुचविले तसेच ग्रामीण भागातील अल्प बचतीतून केली जाणारी भांडवल निर्मिती आणि सार्वजनिक उद्योगांची निर्मिती ज्यामुळे समतोल विकासास पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होते.[८]

## ९. भुंजगराव कुलकर्णी

यांनी 'मागास विभागांच्या विकास आणि प्रादेशिक असमतोलासंबंधी केंद्र व महाराष्ट्र सरकारची धोरणे' हा लेख मराठवाडा विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याद्वारा प्रकाशित मराठवाडा २००१ या खंडात लिहला आहे.

प्रस्तुत लेखात मराठवाड्यासारख्या मागास विभागांचा विकास आणि प्रादेशिक असमतोल नष्ट करण्यासाठी आणि त्याच्या विकासाच्या संदर्भात केंद्र व राज्य सरकारांची काय धोरणे आखली जावीत, किती अर्थसहाय्य मिळावे आणि मराठवाड्याचा विकास अंततः येथील लोकांच्या प्रयत्नांवर कितपत अवलंबून राहील याची चर्चापण करण्यात आलेली आहे.

हा निबंध खालील भागात विभागण्यात आला आहे.

१. जगातील मागास विभागांच्या विकासासंबंधीचा अनुभव
२. भारत सरकारची गेल्या ४० वर्षातील मागास विभागांच्या विकासासंबंधीची धोरणे.
३. इ.स. १९६०-८५ या पंचवीस वर्षाच्या काळातील महाराष्ट्र शासनाची विकासाची धोरणे.
४. मराठवाड्याच्या विकासावर या धोरणांचा झालेला परिणाम.

लेखकांनी भाग-१ मध्ये मांडलेले अध्ययन-

आजच्या विकसित राष्ट्रांना देखील विकासातील प्रोदशिक असमतोल या समस्येस सामोरे जावे लागले. त्यांनी विविध धोरणांचा अवलंब करून प्रादेशीक समतोल साध्य करण्याचा प्रयत्न केला. या देशांनी प्रादेशीक विकास प्रामुख्याने एखादे प्राधिकरण निर्माण करून करण्याचा प्रयत्न केला

लेखकांनी भाग-२ मध्ये मांडलेले अध्ययन-

भारतातील सर्व विभागातील लोकांना समान प्रतिष्ठा, सोयी व सवलती आणि संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे म्हणून भारताच्या राष्ट्रीय नियोजनात सुरूवातीपासूनच प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे धोरण अंतर्भूत केलेले आहे. परंतु १९६९ पर्यंत त्यांची अमंलबजावणी झालीच नाही. परंतु सप्टेंबर १९६८ मध्ये राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत विविध कार्यक्रमावर आधारलेले केंद्र सरकारचे अनुदान सूत्र बदलून त्याऐवजी गाडगीळ सूत्र म्हणून प्रसिध्द असलेली अनुदानाची नवी पध्दती स्वीकारली गेली. ज्यामध्ये ७० टक्के अनुदान लोकसंख्येच्या प्रमाणात व ३० टक्के अनुदान राज्याच्या गरजेप्रमाणे देण्याचे ठरले. त्यातही या दुसऱ्या वाट्यांपैकी एक तृतीयांश वाटणी देशाच्या दरडोई उत्पन्नाच्या सरासरीपेक्षा कमी दरडोई उत्पन्न असलेल्या म्हणजे केवळ मागास राज्यांनाच देण्याचे ठरले. तेच सूत्र थोड्याफार फरकाने आजपर्यंत अवलंबीले जात असल्याचे आढळते.

राष्ट्रीय विकास परिषदेच्या त्याच बैठकीत देशातील औद्योगिकदृष्ट्या मागासलेले विभाग निश्चित करण्यासाठी दोन अभ्यासगट नेमण्यात आले. या दोन्ही गटांच्या शिफारशीवर १९६९ च्या राष्ट्रीय परिषदेत विचार झाला आणि देशातील २४७ जिल्हे औद्योगिकदृष्ट्या मागास म्हणून निश्चित करण्यात आले. या गटांच्या शिफारशीप्रमाणे मागास जिल्ह्यातील गुंतवणुकीवर आयकरात सवलती, व्याजाच्या दरात सवलती इ. विलोभणे जाहीर झाली. त्याशिवाय महाराष्ट्रातील ३ जिल्हे रत्नागिरी, औरंगाबाद आणि चंद्रपूर हे भांडवली सबसीडीसाठी जाहीर झाले. ही सबसीडी प्रारंभी १० टक्के व पुढे १९७३ पासून १५ टक्के आहे. १९८३ पासून मराठवाड्यातील इतर सर्व जिल्ह्यातही १० टक्के सबसीडी केद्र सरकारकडून मिळत आहे. अशारीतीने उद्योगधंदे मागास जिल्ह्यात जावेत म्हणून केंद्र शासनाने समग्र धोरणे आखणी व त्याचा परिणाम म्हणून औरंगाबादचे औद्योगिकीरण होत गेले.

मागास विभागांच्या विकासासाठी व प्रादेशीक असमतोल कमी करण्यासाठी त्या त्या विभागातील कृषी विकासाकडेही विशेष लक्ष पुरविले पाहिजे हा विचार प्रथम चौथ्या योजनेतून मांडण्यात आला. पाचव्या योजनेच्या काळात प्रोदशीक

असमतोलावर दूरगामी परिणाम होईल असे अनेक नवे कार्यक्रम अमलात आले. त्यापैकी पहिला किमान गरजांचा कार्यक्रम आणि दुसरा एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम हे प्रमुख होत. सहाव्या योजनेत केंद्रीय विकास निधीतून राज्यात होणारे वितरण मागास विभागाच्या हितासाठी अनुरूप करून घ्यावे आणि त्यानुसार प्रयत्न करण्याचे प्रामण जोडण्याचे ठरविण्यात आले. सातव्या योजनेत दारिद्रयनिर्मुलनाच्या योजनेवर भर देण्यात आला. मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या ज्या सर्वसामान्य योजनांवर अधिक भर देऊन सर्व देशभर राबविल्या जाणार आहेत यातून दोन्ही घटकांची सुधारणा मागास विभागने अधिक त्वरेने होईल आणि त्यामुळे प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत होईल.

लेखकांनी भाग-३ मध्ये मांडलेले अध्ययन-

भाग ३ मध्ये लेखकांनी महाराष्ट्र सरकारची प्रादेशीक असमतोल दूर करण्यासाठीची धोरणे मांडली आहेत.

१. १९५३ मध्ये झालेला नागपूर करार आणि भारतीय राज्यघटनेतील ३७१ (२)कलम मराठवाडाव व विदर्भ या मागास विभागांच्या विकासासाठी वैधानिक विकास महामंडळाची सूचना केली आहे.
२. १९६० मध्ये महाराष्ट्रातील उद्योगपती व अर्थशास्त्रज्ञांच्या झालेल्या परिषदेत मागास विभागांचा संतुलित विकास करण्यावर भर दिला होता.
३. महाराष्ट्र राज्य सरकारने नियोजनात मागास विभागासाठी कुठलाही भरीव कार्यक्रम राबविला नसल्याचे वेळोवेळी दिसून आले.
४. महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमतेची चर्चा १९८० नंतर समोर आली म्हणून १९८२ मध्ये कोकणचा मागासलेपणा निश्चित करण्यासाठी एक अभ्यासगट नेमण्यात आला.

५. १९८३ मध्ये मागासलेपणा मोजण्यासाठी व अनुशेष भरुन काढण्यासाठी दांडेकर समिती नेमण्यात आली.

तात्पर्य वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, राज्य सरकारीची अनुशेष भरुन काढण्याची बांधीलकी, प्रादेशिक नेतृत्वाची त्याबाबतची जाण आणि जागरुकता त्या प्रक्रियेच्या यशाच्या खऱ्या महत्त्वाचा घटक आहेत. केंद्र व राज्य सरकारची धोरणे उशीरा का होईना पण मागास विभागाच्या समस्यांकडे वळली आहेत. त्यामुळे २००० पर्यंत मराठवाड्याच्या विकासाला गती येईल अशी आशा करायला जागा असल्याचा विश्वास प्रस्तुत लेखातून लेखकांनी मांडला आहे. [९]

**७. डॉ. संतोष सदार (२००१)**

विदर्भाचा औद्योगिक विकास या पुस्तकात महाराष्ट्रातील एक विकसनशिल विभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विदर्भातील औद्योगिक विकासाची प्रक्रिया अभ्यासली आहे. सदर पुस्तक म्हणजे भारतात नियोजीत अर्थव्यवस्थेच्या सुरुवातीपासूनच प्रगत राज्य व विशिष्ट प्रदेशांचा विकास गतीने झाला. त्यातून मागासप्रदेशाचा तुलनात्मक दृष्ट्या अधिक अविकसित राहिलेत. महाराष्ट्र शासनाने डॉ. वि.म.दांडेकर यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या सत्यशोधन समितीने शोधलेला विकासाचा अनुशेष अधिक स्पष्ट आणि बोलका असल्याचे लेखकाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा, विकासाचा केंद्रबिंदूमानुन स्थानिक स्त्रोत व संसाधनाचा वापर तेथील विकासाकरिता केला पाहिजे या भुमिकेतूनच जिल्हा उद्योगकेंद्राची संकल्पना अस्तित्त्वात आल्याचे मत त्यांनी मांडले. स्थानिक विकास पातळीवर निर्मित उद्योग केंद्र योजना विदर्भात कितपत प्रभावी राहीली ह्याचा शास्त्रीय अभ्यास प्रस्तुत पुस्तकात करण्यात आला आहे. [१०]

**८. डॉ. संतोष दास्ताने:**

यांनी आपल्या महाराष्ट्र (२००६) या पुस्त्कामध्ये महाराष्ट्राच्या औद्योगिक स्थितीबद्दल सखोल अभ्यास करुन खालील मत मांडले आहे.

त्यांनी आपल्या महाराष्ट्र (२००६) या पुस्तकातील औद्योगिक महाराष्ट्र या प्रकरणामध्ये असे मत मांडले आहे की, औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्राचा पुढाकार

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आहे. औद्योगिक प्रगती राज्यामध्ये सारख्या प्रमाणात विभागलेली नाही. मराठवाडा व विदर्भत्या तुलनेत अविकसितच राहीलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील औद्योगिक विकास हा पुणे, मुंबई, ठाणे व नाशिक अशा त्रिकोणातच झाला आहे. [११]

**२. ३ संशोधन साहित्याचा आढावा :**

**१. सौ.प्रतिभा खंडागळे :**

यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे २००६ मध्ये सामाजिक शास्त्रे या शाखेमध्ये Ph.D. पदवी प्राप्ती करिता **महाराष्ट्रातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास (१९९१-२००३) या विषयावरील आपला प्रबंध सादर केला आहे.**

**सदर प्रबंधामध्ये** यांनी महाराष्ट्रामध्ये १९९१-२००३ या पंधरा वर्षाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्र आणि त्या क्षेत्रामध्ये झालेली विदेशी गुंतवणूकीचे प्रमाणे आणि परिणाम याचा सखोल अभ्यास केला. त्यांनी आपल्या संशोधनामध्ये खालील निष्कर्ष काढलेत व सुचना सुचविल्या.

- संशोधनामध्ये असे निदर्शनास आले की, १९९१-२००३ या १५ वर्षाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्रामध्ये होणाऱ्या परकीय गुंतवणूकीचे प्रमाण वाढले आहे. साधारणतः १९९१-२००० या १० वर्षामध्ये या गुंतवणूकीचे प्रमाण फार जास्त होते. ही गुंतवणूक प्रकल्प उभारण्यात आणि रोख गुंतवणूक अशा दोन्ही प्रकारची होती.

- ही विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रातील विविध विभागामध्ये असमतोल प्रमाणात झाली आहे. त्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला. सर्व क्षेत्राचा समतोल विकास झाला नाही.

- या प्रादेशिक असमतोल विकासाचा मारा झाल्याचे प्रतिक स्पष्ट करतो.

- हा असमतोल विदेशी गुंतवणूकीमुळे पुढेही तसाच राहतो किंवा वाढत जातो. विदेशी गुंतवणूकदार त्यांची गुंतवणूक अधिक विकसित क्षेत्रामध्ये करतात.

कारण त्यांना केवळ नफाच हवा असतो. यामुळे दोन प्रदेशामध्ये विकासाच्या बाबतीत असमतोल निर्माण होतो.

- विदेशी गुंतवणूक जास्त प्रमाणात मुंबई, पुणे व ठाणे या अधिक विकसित असलेल्या भागामध्येच झाली आहे.

- अभ्यासा दरम्यान आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली, ती म्हणजे महाराष्ट्रातील एकूण ३६ जिल्ह्यापैकी केवळ २२ जिल्ह्यांमध्ये विदेशी गुंतवणूक झाली आहे. त्यापैकी (२२ पैकी) केवळ ९ जिल्ह्यांना अधिक महत्व देण्यात आले आहे.

- कोकण भाग हा मुंबई व ठाणे यामध्ये येत असल्यामुळे या भागमध्ये एकूण विदेशी गुंतवणूकीच्या ७८.५२% गुंतवणूक झालेली आहे. दुसऱ्या बाजूला अमरावती (विदर्भ) विभागामध्ये एकूण विदेशी गुंतवणूकीच्या ०.५७% गुंतवणूक आहे.

- संशोधनामध्ये आणखी एक गोष्ट स्पष्ट होते की, महाराष्ट्राच्या विविध विभागामध्ये झालेली परकीय गुंतवणूक ही असमान प्रमाणात आहे. ही गोष्ट महाराष्ट्रातील विविध विभागामध्ये असणाऱ्या दरडोई उत्पन्नातील फरक शोधण्यासाठी मार्गदर्शन करते.

- अविकसित भागामध्ये परकीय गुंतवणूकीला आकर्षित करण्याकरिता त्या भागामध्ये राज्यसरकारने पायाभूत सोयी व सुविधांमध्ये (वीज, पाणी, रस्ते, बँका, पोस्ट इ.) वाढ करावी. या भागातील व्यक्तीगत गुंतवणूकही वाढावी. यामुळे केवळ विदेशी गुंतवणूकीमध्येच वाढ होणार नाही तर त्या भागाचा दिर्घकालावधी करिता विकासही होण्यास मदत होईल. [१२]

**२. आय. एच. पठाण (१९९८):**

यांनी कोल्हापूर येथील १९४९ ते १९७४ या २५ वर्षाच्या कालावधीमध्ये (स्वातंत्र्यप्राप्तीनंतर) कोल्हापूर येथील औद्योगिक क्षेत्राचा व पर्यायाने पश्चिम महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात कारणीभूत असलेल्या घटकांचा आणि परिणामाचा

सखोल अभ्यास केला. त्यांनी १९९८ मध्ये शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर येथील इतिहास या विभागामध्ये Ph.D. पदवी प्राप्ती करिता आपला शोध प्रबंध सादर केला आहे. श्री. पठाण यांच्या संशोधनातून समोर आलेल्या बाबी पुढीलप्रमाणे-

- कोल्हापूर हे पश्चिम महाराष्ट्रातील विकसित असे औद्योगिक वसाहत असलेले शहर आहे.
- कोल्हापूर येथील नैसर्गिक स्थिती, येथे पडणारा दरवर्षी नियमित पाऊस, पंचगंगा सारखी बारामहा वाहणारी विशाल नदी, त्यामुळे होणारा विपूल पाणीपूरवठा, या भागातील काळी जमीन या अनेक महत्वाच्या घटकांच्या उपलब्धतेमुळे दरवर्षी विविध पिकांचे प्रचंड प्रमाणावर उत्पादन होते.
- (विशेष करुन ऊस आणि पाऊस) या पिकांच्या विपूलतेमुळे पश्चिम महाराष्ट्रातील या भागामध्ये साखर कारखाने, कापड उद्योग, चर्मोद्योग व त्याला अनुसरुन मशीन उद्योग, इंजिनिअरींग उद्योगांचा, सोने व चांदी उद्योग अशा अनेक उद्योगांचा झालेल्या विकासाचा आढावा घेऊन पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाचा सखोल अभ्यास त्यांनी केला आहे. [१३]

**३. जी. वाय. शितोळे (१९९६):**

यांनी १९९६ मध्ये शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर येथील वाणिज्य शाखेमध्ये Ph.D. पदवी करिता संशोधनपर प्रबंध सादर केला. त्यांनी "महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या कामगिरीचा अभ्यास" या विषयावर सखोल अभ्यास करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (M.I.D.C.) ने महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात केलेले कार्य, त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राचा झालेला समतोल आणि असमतोल विकास यावर बरेच संशोधन केले.

सदर संशोधनात त्यांनी एम. आय. डी. सी. चे कार्य, महत्व, कार्यसफलता त्यांच्या मर्यादा यांचा सखोल अभ्यास करुन औद्योगिक विकाससंदर्भात खालील निष्कर्ष मांडले. महामंडळाची ध्येय व धोरणे त्यांची विविध प्रकाशने यावर सखोल अभ्यास करुन खालील निष्कर्ष काढले.

- मागील ३३ वर्षाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (M.I.D.C.) महाराष्ट्रातील विकसित आणि अविकसित भागांच्या विकासाकरिता SICOM, MSFC, MSEB इ. च्या सहकार्याने विविध औद्योगिक कार्यक्रम राबवून त्यांनी औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल दुर करण्याचा प्रयत्न केला आहे.

- भारताच्या प्रचंड लोकसंख्येच्या अस्तीत्वामुळे भारताचा औद्योगिक विकास इतर देशाच्या मानाने कमी प्रमाणात झाला आहे.

- भारतावर १५० वर्षे इंग्रजीचे राज्य अस्तीत्वामुळे त्या कालावधीमध्ये २/३ मोठे कारखाने स्थापन झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून कृषी क्षेत्राच्या विकासाला महत्व देण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला महत्व देऊन औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल दुर करण्याचा प्रयत्न करण्यात आले.

- महाराष्ट्र जरी औद्योगिक दृष्ट्या आघाडीवर असणारे राज्य दिसत असले तरी विकासामध्ये कमालीची विषमता असल्याचे श्री शितोळे यांनी खालील उदाहरणावरुन स्पष्ट केले आहे.

- १९९२ मध्ये भारताच्या एकूण लोकसंख्येच्या १०% लोकसंख्या, एकूण क्षेत्रफळाच्या ११% क्षेत्रफळ, एकूण औद्योगिक क्षेत्राच्या १४%, क्षेत्र एकूण रोजगाराच्या २१% रोजगार, एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी २४% उत्पन्न, पायाभूत सुविधांच्या २६% सुविधा एकट्या महाराष्ट्रामध्ये एकवटलेल्या आहेत.

- दुसऱ्या बाजुला महाराष्ट्राच्या वरील आकडेवारीपैकी ५९% रोजगार (कामगार) आणि ७३% उत्पन्न केवळ एकट्या मुंबईचे आहे म्हणून मुंबई, पुणे व ठाणे हे विकसित व इतर भाग अविकसित असल्याचे चित्र स्पष्ट होते.

- महाराष्ट्रामध्ये एम. आय. डी. सी. ने औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला आवश्यक असणाऱ्या सेवा व सुविधा पुरवून ग्रामीण व अविकसित भागामध्ये विकासाला चालना देण्याच्या कार्याला मदत केली आहे.

- १९८३-१९९३ या १० वर्षाच्या कालावधीमध्ये M.I.D.C. ने मेट्रोसिटी किंवा विकसित भागात औद्यागिक विकासाला चालना दिली नाही. दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातील अर्ध-विकसित व अविकसित भागात नवीन उद्योगधंदे स्थापन करण्यास मदत केली आहे. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल दुर करण्यासाठी हा फार महत्वाचा प्रयत्न होय.

श्री. शितोळे योनी आपल्या संशोधनामध्ये औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकरिता व औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल दुर करण्याकरिता खालील सुचना केल्यात.

१) सेवा क्षेत्रामध्ये समानता आणण्याची आवश्यकता आहे.

२) औद्योगिक संघटनांची स्थापना होणे गरजेचे आहे.

३) उद्योजकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

४) M.I.D.C. मध्ये नवीन दुकानगाळे व शेड वाढविण्याची गरज आहे.

५) नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी योग्य स्थानाची निवड करणे जरुरी.[१४]

**४. एस. एल. पाटील. (१९८५):**

यांनी शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर अर्थशास्त्र विभागामध्ये एम. फिल. पदवीसाठी इंडस्ट्रीयल डिस्परसल इन कोल्हापूर डिस्ट्रीस्क्ट (कोल्हापूर येथील औद्योगिक क्षेत्राचा विस्तार) या विषयावर शोधप्रबंध सादर केला. या अभ्यासात त्यांनी खालील विचारप्रवाह मांडला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये औद्योगिक विस्तार हा प्रचंड प्रमाणात झालेला आहे. भिन्न-भिन्न प्रकारचे निर्यात उद्योग या जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत. औद्योगिक

विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व पायाभूत सुविधांचे प्रचंड जाळे शहरामध्ये विखुरलेले आहे. कुशल कामगार, विपूल पाणीपूरवठा उच्च प्रतीची जमीन व थंड वातावरण हे या भागाला लाभलेली देणगी आहे. तरी सुध्दा जिल्ह्यातील काही तालुक्यांचा प्रचंड विकास व काही तालुक्याचा शुन्य विकास अशी एकाच जिल्ह्यामध्ये औद्योगिक विकासामध्ये असमतोलाची स्थिती दिसून येते.

औद्योगिक क्षेत्राच्या विकास व विस्तारा करिता आवश्यक असणारी केंद्रीय गुंतवणूकीच्या माध्यमातुन होणारी आर्थिक मदत, वित्तीय कर्जामधून मिळणारी सुट, प्रत्यक्ष बक्षिस योजना, परवाना पध्दती व उद्योगाच्या स्थान निश्चितीमधील सुविधा या सर्व सोयी व सुविधा  ज्या भागामध्ये औद्योगिक विकासाला आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा (वीज, पाणी, रस्ते, बँका इ.) सरकारचे सहाय्य आणि कुशल कामगार उपलब्ध असतात, तेथे सहज एकवटल्या जातात आणि त्या भागाचा औद्योगिक विकास होऊन औद्यागिक विस्तार होतो. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये करवीर तालुका, हातकणंगले तालुका आणि शिरोली हे तीन तालुके (इचलकरंजी, जयसिंगपूर आणि कोल्हापूर) या तीन उद्योग केंद्रामुळे विकसित आहेत. या तीन्ही भागामध्ये पायाभूत सेवा व सुविधांचा विकास प्रचंड प्रमाणवर झालेला आहे. दुसऱ्या बाजूला चंदगड, आजरा, भुदरगड, गगनबाडा ही याचा जिल्ह्यातील चार तालुके औद्यागिक विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या पायाभूत सेवा व सुविधांच्या अभावामुळे अविकसित आहेत. त्यांनी आपल्या संशोधनातून असे निष्कर्ष काढले आहे की,

अविकसित तालुका व विकसित तालुका यांच्यामधील प्रादेशिक असमतोल दुर करण्याकरिता मागास तालुक्यामध्ये सरकारमार्फत पायाभूत सुविधा पुरविण्यात याव्यात वीज मंडळाने पुढाकार घेवून वीज पुरवठा करावा आणि त्या त्या तालुक्यामध्ये कृषी उत्पन्नावर आधारीत उद्योगधंद्याची स्थापना करावी. अशाप्रकारे अविकसित तालुक्यामध्येही औद्योगिक विस्तार घडून येईल आणि अशा प्रकारे तालुका-तालुका मध्ये असणारा औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल कमी होईल. [१५]

## २.४ महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील काही अभ्यास आणि समित्यांचा आढावा:

### १. पंचवार्षिक योजना व औद्योगिक क्षेत्र

सरकारने भारताच्या औद्योगिकरणाचा आकारबंध कसा राहील हे सन १९४८ च्या आद्यौगिक धोरणविषयक ठरावाने स्पष्ट केले होते. पहिल्या पंचवार्षिक योजनाबरोबर भारतात उद्योगांच्या विकासाला गती प्राप्त झाली हे पुढील योजनांच्या सविस्तर वर्णनावरुन स्पष्ट होते.

### १) पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळातील (१९५१-५६) औद्योगिक प्रगती :

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात औद्योगिक क्षेत्रातील पुढील बाबींवर भर देण्यात आला, या आधी सुरु केलेले औद्योगिक प्रकल्प पूर्ण करणे, नवीन औद्योगिक प्रकल्प सुरु करणे, नवीन प्रकल्प सुरु करतांना वीज, पाणी, अशा औद्योगक प्रकल्पावर भर देणे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूकी साठी ७९७ कोटींची तरतुद करण्यात आली. त्यापैकी सार्वजनिक क्षेत्रात रु ९४ कोटीची गुंतवणूक करण्याची ठरवण्यात आले परंतू प्रत्यक्षात या क्षेत्रामध्ये ५७ कोटीची तरतुद करण्यात आली. ७९७ पैकी ३४० कोटी रु. नवे औद्योगिक प्रकल्प व उद्योगांच्या आधुनिकीकरणावर खर्च करण्यात आले. म्हणजे ठरलेल्या रक्कमेपेक्षा कमी गुंतवणूक करण्यात आली.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात औद्योगिक क्षेत्रात ३७ % वाढ घडून आली. (वार्षिक औद्योगिक वाढीचा दर ७ % पेक्षा जास्त होता.)

### २) दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-६१) आणि औद्योगिक प्रगती :

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये भारताला मुलभूत व अवजड उद्योगात स्वयंपूर्ण बनविणे हा उद्येश डोळ्यासमोर ठेवून सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या विकासावर अधिक भर देण्यात आला.

दुसऱ्या योजनेच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक ८.७० कोटी रु. खाजगी क्षेत्रातील संघटीत उद्योगात रु. ६७५ कोटी गुंतविण्यात आले. लघुउद्योगात व ग्रामउद्योगात रु. २६५ कोटी गुंतवणूक रु १८१० कोटीची होती.

पहिल्या योजनेत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात सरकारी खर्चाच्या ४% सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगासांठी खर्च करण्यात आले, तर हेच प्रमाण दुसऱ्या योजनेत २७% इतके वाढविण्यात आले.

पहिल्या योजनेत शेतीक्षेत्राच्या विकासाला अग्रक्रम देण्यात आला. पहिल्या योजनेच्या अखेरीस अन्नधान्याचा प्रश्न समाधानकारक रितीने सुटला म्हणूण दुसऱ्या योजनेत औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला अग्रक्रम देण्यात आला.

**३) तिसरी पंचवार्षिक योजना (१९६५ -६६) आणि औद्योगिक प्रगती:**

चीनचे सन १९६२ मधील भारताविरुध्दचे आक्रमण भारत-पाकिस्तानमधील १९६५ चे युध्द या कारणामूळे तिसऱ्या पंचवार्षिक योजनामध्ये औद्योगिक क्षेत्राच्या विकासाऐवजी उत्पादन सामग्री संरक्षण क्षेत्राच्या साधनसामग्रीच्या विकासाकडे वळविण्यात आली.

तिसऱ्या योजनेच्या काळात संघटित व खाणकाम उद्योगांवर ३००० कोटी इतका खर्च झाला. त्यापैकी रु १७०० कोटी सरकारकडून आणि १३०० कोटी खाजगी क्षेत्रातील उद्योगांकडून केला गेला. त्याबरोबर लघुउद्योग व ग्रामोद्योगांच्या विकासासाठी रु ४२५ कोटीची तरतुद करण्यात आली.

**४) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-७४) आणि औद्योगिक विकास:**

चीन -भारत (१९६२) चे युध्द भारत -पाकिस्तान (१९६५) चे युध्द या कारणामुळे तसेच १९६५-६६ मध्ये देशाच्या विस्तीर्ण भागात पडलेले अवर्षण व त्यामुळे मोठ्या प्रमाणावर करावी लागणरी अन्न धाण्याची आयात, त्यामुळे भारताच्या परकीय चलनाच्या साठ्यावर व आंतरराष्ट्रीय व्यापार तोलावर झालेला प्रतिकूल परिणाम या सर्व कारणामुळे जी चौथी पंचवार्षिक योजना (१९६६-६७) मध्ये सुरु होणार होती ती तिची कार्यवाही पुढे ढकलण्यात आली. (१९६६-६७) (१९६७-६८) (१९६८-६९) या तीन वर्षात तीन वार्षिक योजना कार्यवाहीत आणण्यात आल्या. याचे विवेचन पुढील तक्त्याच्या आधारे करता येते.

**तक्ता क्रमांक-२.१**

**औद्योगिक क्षेत्रातील सार्वजनिकगुंतवणूक**

**(रु.कोटी)**

| **क्षेत्र** | **वार्षिक योजना (१९६६-६७)** | **वार्षिक योजना (१९६७-६८)** | **वार्षिक योजना (१९६८-६९)** | **एकूण (१९६६-६९)** |
|---|---|---|---|---|
| उर्जा | ४०४ | ३९३ | ५१३ | १२१३ |
| संघटीत उद्योग | ५१४ | ४७१ | ५२५ | १५११ |
| लघुउद्योग/ग्रामाद्योग | ४३ | ४२ | ४१ | १२६ |

(**संदर्भ**: Third Rine Year Plan,Pg .64)

चौथ्या पंचवार्षिक योजनेचया काळात औद्योगिक क्षेत्रात एकूण रु. ५३०० कोटींची गुंतवणूक करण्यास ठरविण्यात आले. त्यापैकी ३०५० कोटी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांत व २२५० कोटी खाजगी क्षेत्रातील उद्योग गुंतवायचे होते. लघुउद्योग व ग्रामीण उद्योगात रु ७४६ कोटी खर्च करावयाचे होते. प्रत्यक्षात सार्वजनिक क्षेत्रात रु. २७०० कोटीची गुंतवणूक करण्यात आली.

**५) पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७८) आणि औद्योगिक विकास :**

पाचव्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी रु. १०,२०० कोटीची तरतूद केली. त्यापैकी ९६०० कोटी सार्वजनिक क्षेत्रातील

उद्योगाच्या विकासाकरिता व ५३५ कोटी लघु व ग्रामोद्योगांच्या विकासाकरिता होते. पाचव्या योजनेत औद्योगिक क्षेत्राची वार्षिक ८.१ % ने वाढ करावयाचे उद्दिष्ट ठरविले पण प्रत्यक्षात योजनेच्या अखेरच्या वर्षी औद्योगिक क्षेत्रातील वृध्दी दर ५.३% इतकाच होता.

**६) सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५) आणि औद्योगिक विकास :**

सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या औद्योगिक क्षेत्रासंबंधीचे प्रमुख उद्दिष्टे म्हणजे १९५६ च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाच्या चौकटीत राहून औद्योगिक क्षेत्रात विविधता आणणे. आधुनिकता आणणेव राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने महत्वाच्या उद्योगाच्या विकासावर भर देऊन अशा वस्तुंच्या बाबतीत देशास आत्मनिर्भर होणे, असे होते.

सहाव्या योजनेत मोठ्या व संघटीत उद्योगात गुंतविण्यासाठी रु २०,४०७ कोटीची तरतुद करण्यात आली व लघु व ग्रामोद्योगांच्या विकासाकरिता रु. १७८० कोटीची तरतुद करण्यात आली. म्हणजे या योजनेत औद्योगिक क्षेत्रावर २२.८% (एकूण खर्चाच्या) खर्च करण्यात आले. वरील खर्चाबरोबर उर्जेच्या विकासासाठी रु. ४३०० कोटी आणि कोळसा उद्योगांच्या विकासासाठी रु. २८७० कोटीची तरतुद करण्यात आली सहाव्या योजनेत औद्योगिक विकासदर ७% दर गाठण्याचे लक्ष ठरविण्यात आले होते, पण प्रत्यक्षात ५% वाढीचा दर गाठला गेला.

**७) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०) आणि औद्योगिक विकास :**

सातव्या पंचवार्षिक योजनाकाळात सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या व मध्यम पातळीवरील उद्योगामध्ये रु १९०७८ कोटी गुंतविण्याचे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे लघु व ग्रामद्योगाच्या विकासासाठी २७५२ कोटीची तरतुद करण्यात आली.

सातव्या योजनेत औद्योगिक क्षेत्रातील वार्षिक वृध्दी-दर ८.७% व कारखानदारी क्षेत्रातील (manufacturing Sector) वार्षिक वृध्दी दर ८% अशी लक्ष्ये ठरविण्यात आली होती.

प्रत्यक्षात या योजनेत औद्योगिक क्षेत्राचा वार्षिक वृध्दी दर ८.५% गाठला गेला. म्हणजे ठरलेल्या लक्ष्यापेक्षा थोडास कमी होत. तर कारखानदारी क्षेत्रात प्रत्यक्षात ८.८% वार्षिक वृध्दी दर गाठला गेला. म्हणजेच सातव्या योजनेच्या काळामध्ये आद्योगिक क्षेत्रातील ठरविलेल्या वार्षिक वृध्दी दर गाठला गेला.

**८) आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९५) आणि औद्योगिक प्रगती :**

आठव्या योजनेच्या काळामध्ये आर्थिक उदारीकरणाची सुरुवात झाली. जुलै १९९१ मध्ये जाहीर झालेल्या नव्या औद्योगिक धोरणाने सार्वजनिक व खाजगी क्षेत्राची भूमिका स्पष्ट केली. ह्या काळामध्ये अकार्यक्षमतेमुळे, घटलेल्या उत्पादनामुळे नियोजनाला आवश्यक तेवढी साधनसामग्री जमा करण्यात सार्वजनिक क्षेत्राला अपयश आले. याच काळात खाजगी क्षेत्राने वेगाने प्रगती केली.

१९९१-९२ च्या किंमतीनुसार आठव्या योजनेत खनिज व उत्पादन क्षेत्रात ३८०८३ कोटी रु. गुंतवण्यात आले. म्हणूण एकूण गुंतवणूकीच्या ८२% गुंतवणूक औद्योगिक क्षेत्रात करण्यात आली.

**९) नववी पंचवार्षिक योजना (१९९५-२०००) :**

नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये औद्योगिक क्षेत्रामध्ये रु. ४९९६२ कोटी ची गुंतवणूक करण्याचे ठरविले. त्यापैकी ४४,६९५ कोटी रु. सार्वजनिक क्षेत्राकरिता राखून ठेवण्यात आले.

नवव्या योजनेत औद्योगिक उत्पादन वाढीचा ८% विकास दर निश्चित करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात केवळ ५% ने विकास झाला, म्हणजे नववी पंचवार्षिक योजना उद्योगक्षेत्रात अपयशी ठरली.

**१०) दहावी पंचवार्षिक योजना (२००२-०७) आणि औद्योगिक विकास :**

भारताचे खाजगी क्षेत्र प्रबळ आणि परिणामकारक होत आहे. या पार्श्वभुमीवर दहावी योजना आखण्यात आली.

**दहाव्या पंचवार्षिक योजनेचे प्रमुख उद्दिष्टे :**

दरवर्षी ८% विकास दर गाठणे याबरोबरच या योजनेत पुढील ध्येयानाही मदत देण्यात आले.

१) समतोल प्रादेशिक विकास साधणे.

२) ८% विकासाचा दर प्रत्यक्षात आणणे.

३) दारिद्रय हटविणे आणि रोजगारनिर्मीती करणे.

४) बचत व गुंतवणूकीचा दर वाढविणे. [१६]

**२. श्रमिक संघ नियमः (१९२६)**

औद्योगिक क्षेत्रामध्ये असणाऱ्या श्रमिक संघाच्या बहुलतेला नियंत्रित करण्यासाठी तसेच औद्योगिक लोकशाहिला मान्यता देण्यासाठी म्हणजे औद्योगिक विकासामध्ये कामगारांना सहभागी करुन, त्यांना आपल्या अस्तीत्वाची जाण व्हावी असे लोकशाही तत्व स्वीकारणाऱ्या संदर्भात प्रयत्न सुरु झालेत.

या अनुषंगाने श्रमिक संघ अधिनियम तयार करण्यात आला. १९२६ च्या नियमावर संशोधन करुन हे विधेयक एका नव्या रुपात २००० मध्ये संसदेत मांडण्यात आले. जे २००१ मध्ये संसदेने मान्य केले.

श्रमिक संघाची ही कल्पना औद्योगिक प्रादेशिक असमतोलाची दरी बुजविण्यासाठी महत्वाचे असल्याचे मत या समितीने मांडले. [१७]

**३. बर्वे अभ्यास गट :**

महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या अनेक अभ्यास गटापैकी १९५८ मध्ये नेमलेली बर्वे समिती (१९५८) ही एक होय. बर्वे गटांनी बृहन्मुंबई मध्ये उद्योगधंद्याच्या वाढीला पायबंद घालण्याचा आग्रह धरला होता.

बर्वे अभ्यास गटाच्या मते स्वातंत्र्य प्राप्तीनंतर एकट्या मुंबईमध्येच उद्योगधंद्याची वाढ होत आहे. त्यामानाने महाराष्ट्रातील इतर भाग (विदर्भ, मराठवाडा, कोकण) हे भाग फार दुर्लक्षित आहे. म्हणून महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विकासाबाबत प्रादेशिक असमतोल आहे.

बर्वे अभ्यास गटानेही औद्योगिक विकासाबाबत महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक असमतोल असल्याचे ठाम मत मांडले होते. हा असमतोल दूर करुन महाराष्ट्राचा समतोल विकास करण्यासाठी त्यांनी बऱ्याच उपाययोजना सुचविल्या आहेत.

बर्वे अभ्यास गटाची नेमणूक १९५८ मध्ये म्हणजे साधारणतः ५३ वर्षापूर्वी झाली. हया ५३ वर्षामध्ये औद्योगिक क्षेत्रामध्ये बरेच बदल झालेले आहेत. तेव्हा आज औद्योगिक विकासाबाबत महाराष्ट्रामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल अभ्यासने आवश्यकक आहे. [१८]

**४. गाडगीळ समिती (१९६५) :**

१९६५ मध्ये परत राज्यसरकारने मुंबई व पुणे महानगर क्षेत्राकरिता गाडगीळ समितीची स्थापना केली होती. गाळगीळ समितीने औद्योगिक क्षेत्रासंबंधी सखोल अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासाअंती त्योनी असे निष्कर्ष काढले की १९६५ पर्यंत पुणे व मुंबई हया दोन महानगरामध्ये उद्योगधंद्याची वाढ इतर क्षेत्रामध्ये अधिक झाली आहे. या समितीने मुंबई आणि पुण्यातील औद्योगिक वाढीवर निर्बंध घालण्याचे धोरण जाहीर केले. [१९]

**५. पांडे अभ्यास गटाचा अहवाल (१९६८) :**

केंद्रीय नियोजन मंडळाने श्री. पांडे यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील औद्योगिक दृष्ट्या मागास जिल्ह्याचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने औद्योगिक क्षेत्रामधिल काही प्रमुख निकष वापरुन महाराष्ट्रातील १३ जिल्हे औद्योगिक दृष्ट्या मागास घोषित केले होते. यामध्ये मराठवाड्यातील सर्वच ५ जिल्हे, विदर्भातील ४ जिल्हे, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येकी २ जिल्हे होते. या अभ्यास गटाच्या शिफारशी नुसार केंद्र सरकारने या १३ औद्योगिकदृष्ट्या मागास जिल्ह्यांना केंद्रीय अनुदान व प्रोत्साहन देण्याची योजना कार्यन्वीत केली. [२०]

### ६. गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे या संस्थेचा अभ्यास (१९७५) :

१९७५ साली प्रादेशिक नियोजन मराठवाडा विभागाच्या अभ्यास हा अहवाल गोखले अर्थशास्त्र संस्थेने प्रसिध्द केला. १९७१ मधील महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागातील विकासातील तुलनात्मक स्थिती या अहवालात दिली आहे. या अभ्यासातील निकष विचारात घेता विदर्भ व मराठवाडा विकासात मागे आहेत. हे स्पष्ट होते. उदा. कारखान्यातील मुल्यवृध्दीचे शेकडा प्रमाण लक्षात घेतले तर मराठवाडा आणि विदर्भाचा वाटपा अनुक्रमे ०.१ व २.१ इतकाच होता. [२१]

### ७. दांडेकर समिती (१९८३) :

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, कोकण व प. महाराष्ट्रातील आर्थिक विकासात फार मोठी तफावत आहे. अशी सामान्य जनतेची भावना विधानसभेत अनेक नेत्यांनी व्यक्त केल्यामुळे महाराष्ट्र शासनाने ३ ऑगस्ट १९८३ मध्ये सुप्रसिध्द अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका सत्यशोधक समितीची स्थापना केली समितीने ४९३ पानांचा मृद्रीत अहवाल १९८४ मध्ये सरकारला दिला. त्यांनी अकरा क्षेत्रातील आकडेवारीचे विश्लेषण करुन त्यातील विषमता दुर करण्यासाठी व असमतोल कमी करण्यासाठी या समितीने अनेक शिफारशी केल्या आहेत. या समितीने पुढील विषयावर प्रमुख संशोधन केले.

- विषयातील असमतोलाचा अंदाज करण्यासाठी दर्शक केले.
- महाराष्ट्राचा सरासरी विकासाच्या संदर्भात विकासातील जिल्हावार असमतोल निश्चित करणे.
- १९६० पासून अद्यावत माहीती उपलब्ध असलेल्या काळापर्यंत विकास कार्यासाठी जिल्हानिहाय किती खर्च केला व त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात झाली याची माहिती काढणे.
- खाजगी औद्योगिक क्षेत्राच्या मदतीकरता केंद्र व राज्य सरकारने व त्यांच्या

- कक्षेतील संस्थानी केलेले आर्थिक सहाय्य विचारात घेणे.
- कोणत्या दर्शकाबाबत शासन कोणती प्रत्यक्ष कार्यवाही करु शकेल याची मर्यादा ठरविणे.
- निश्चित केलेला असमतोल दूर करण्यासाठी व हा असमतोल पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून उपाय सुचविण्याचे कार्य करणे.

दांडेकर समितीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रामधून जिल्हा हा घटक मानक धरुन महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल शोधून काढला होता. दांडेकर सरांच्या संशोधनाला जवळ-जवळ ३० वर्षाचा कालखंड उलटून गेला आहे. त्यांनी ३० वर्षापूर्वी प्रादेशिक असमतोल शोधण्यासाठी ग्राह्य धरलेली परिस्थिती यामध्ये बरेच अंतर आहे.

तसेच व्ही. एम. दांडेकर आणि त्यांच्या समितीने महाराष्ट्रातील रोजगार, उत्पन्न, शिक्षण, पाणीपुरवठा, लोकसंख्या, औद्योगिक क्षेत्र, अशा सर्व क्षेत्रामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल शोधला, अभ्यासला आणि त्यावर उपाययोजना सुचविल्या होत्या.

**दांडेकर समितीच्या शिफारशी व अंमलबजावणी :**

- राज्यातील प्रत्येक विभागातील अनुशेष त्वरीत दुर व्हावा म्हणून प्रत्येक क्षेत्रीय योजनेपैकी ८५% रक्कम केवळ त्या क्षेत्राचा अनुशेष दुर करण्यासाठी वापरावी व उर्वरित १५% रक्कम चालु प्रकल्प व नैसर्गिक वृध्दी यावर खर्च करावी. व ती सर्व जिल्ह्यामध्ये समान वाटावी असे सुचविले.
- अनुशेष दूर करण्यासाठी प्रक्रिया १९८२-८३ चा अनुशेष दूर झाला म्हणजे संपणारी नव्हती. म्हणून समितीने दर ५ वर्षानी याबाबत आढावा घ्यावा असे सुचविले होते. [२२]

**८. गोस्वामी समिती (१९९३) :**

एप्रिल १९९३ मध्ये औद्योगिक क्षेत्रातील आजारी उद्योगांवर संशोधन करणारे भारतीय सांख्यिकीय संस्थानाचे डॉ. ओंकार गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली

एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १९९३ मध्ये चिंतन मंत्रालयास प्रदान केला.

गोस्वामी समितीने औद्योगिक क्षेत्रामध्ये असणाऱ्या आजारी उद्योगांच्या बारकाईहने अभ्यास केला. समितीने आपल्या अहवालामध्ये औद्योगिक आजारपणाची व्याख्या बदलण्यावर भर दिला. समितीने औद्योगिक आजारपणासंबंधी शिफारस करतांना असे मांडले की औद्योगिक विकासाकरिता औद्योगिक विकास बोर्ड स्थापन करण्यात यावा. या बोर्डाचा प्रमुख उद्येश आजारी पडलेल्या उद्योगांना बंद न करता त्यांची पुर्नस्थापना करणे हा असावा.

गोस्वामी समितीच्या अहवालावरुन किंवा त्यांनी वित्त मंत्रालयाला सुचविलेल्या उपाय योजनावरुन औद्योगिक विकासाकरिता सरकारने आजारी उद्योगांना अर्थसहाय्य व इतर प्रकारची मदत केल्यास आजारी उद्योग पुन्हा सुरू होऊन दोन प्रदेशामध्ये औद्योगिक विकासाबाबत असणारा प्रादेशिक असमतोल कमी होईल. आजारी उद्योगांना पुर्नजीवन न दिल्यास त्या प्रदेशाच्या व इतर प्रदेशाच्या औद्योगिक विकासामध्ये तफावत निर्माण होईल. यालाच आपण औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल म्हणतो.

गोस्वामी समितीचे आजारी उद्योगांना जीवन देऊन औद्योगिक विकासामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल कमी करण्यासंबंधीचा अभ्यास किंवा संशोधन २० वर्षापूर्वी आहे. २० वर्षामध्ये औद्योगिक क्षेत्रामध्ये बऱ्याच घडामोडी झाल्या आहेत. तसेच २० वर्षापूर्वी औद्योगिक आजारपणाची कारण भिन्न होती. आजच्या औद्योगिक आजारपणाची कारणे भिन्न आहेत. तेव्हा काळानुसार औद्योगिक क्षेत्रातील अस्तीत्वात असणारा प्रादेशिक असमतोल त्याची कारणे, प्रमाण शोधून त्यावर उपाय सुचविण्याकरिता मी हे संशोधन करणार आहे. [२३]

### ९. निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल (१९९७) :

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावर खऱ्या अर्थाने प्रकाश टाकण्याचे कार्य राज्यपालांनी १९९४ मध्ये स्थापन केलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीने केले

आहे. या समितीने सुध्दा अनुशेष काढण्यासाठी दांडेकर समितीने निवडलेल्या ९ प्रमुख क्षेत्रांचीच निवड केलेली आहे.

समितीने सन १९८४ साली दांडेकर समितीने काढलेला एकूण विकास अनुशेष (३१८६.७८) कोटी रु. वरुन सन १९९४ ला (१५,३५५.७७) कोटी रुपये पर्यंत वाढल्याचे म्हटले आहे. [२४]

**१०. अशोक मिश्रा यांचा अभ्यास (१९६४)**

श्री. अशोक मिश्रा यांनी सन १९६४ साली 'भारतीय प्रादेशिक विकासाचे स्तर' हा अहवाल प्रसिध्द केला. भारतातील सर्व जिल्ह्यांचे वर्गीकरण चार स्तरात त्यांनी ३५ सामाजिक आर्थिक निकषांचा वापर केला. त्यांनी महाराष्ट्रातील तात्कालीन २६ जिल्ह्यांचे पुढील चार स्तरात वर्गीकरण केले.

- **उच्च विकास स्तर (चवथा स्तर)**:

  या अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने, बृहन्मुंबई, ठाणे, नाशिक, धूळे, जळगाव, अहमदनगर, सोलापूर, पुणे, अकोला, अमरावती, नागपूर इ. समावेश होतो.

- **तिसरा विकास स्तर :**

  या अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने सातारा, सांगली, औरंगाबाद, नांदेड, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा इ. जिल्ह्यांचा समावेश होतो.

- **दुसरा विकास स्तर :**

  या अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने, कुलाबा (रायगड), कोल्हापूर, परभणी, बीड, उस्मानाबाद, भंडारा चंद्रपूर इ. जिल्ह्यांचा समावेश होतो.

- **पहिला विकास स्तर (सर्वात खालचा स्तर):**

  रत्नागिरी हा जिल्हा समाविष्ट असलेला आढळून येतो.

हे स्तर तपासल्यास उच्च स्तरातील जिल्ह्यात मराठवाड्यातल एकही जिल्हा दिसत नाही. बहुसंख्य ८ जिल्हे पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. तिसऱ्या स्तरात मराठवाड्यातील २ व विदर्भाचे ३ व पश्चिम महाराष्ट्राचे २ जिल्हे आहेत. दुसऱ्या स्तरात मराठवाड्याचे ३ तर विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राचे प्रत्येकी २ जिल्हे आहेत. पहिल्या स्तरात फक्त रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश होतो. जो सर्वात मागास जिल्हा ठरतो. [२५]

**११. श्री. नरोत्तम शहा यांचा अभ्यास :**

श्री. नरोत्तम शहा यांनी १९८१ साली महाराष्ट्रातील जिल्ह्याचे आर्थिक विकासाचे स्तर हा अभ्यास प्रसिध्द केला. कै. नरोत्तम शहा हे दांडेकर समितीचे (१९८४) तसेच राज्य नियोजन मंडळाचे ही सदस्य होते. श्री. शहा यांनी आपल्या अभ्यासामध्ये उत्पादक क्षेत्र व पायाभूत सायी या संदर्भात अनेक निकषांचा वापर करुन प्रत्येक जिल्ह्यासाठी एक संयुक्त निर्देशांक तयार केला त्यांनी भारतीय स्तरावर आपला निर्देशांक १०० तर महाराष्ट्राची सरासरी १६३ गृहीत घेतली व त्याआधारे राज्यातील २६ जिल्ह्याचे संयुक्त निर्देशांक निश्चित केले.

त्यांच्या निष्कर्षानुसार भारतीय विकास पातळीशी तुलना केल्यास महाराष्ट्रातील २६ पैकी ८ जिल्ह्यांचा संयुक्त निर्देशांक १०० वा त्यापेक्षा जास्त असल्याने ते विकसित जिल्हे होते. व उर्वरित अल्पविकसित होते. विशेष म्हणजे विकसित जिल्ह्यामध्ये नागपूर वगळता सर्वच जिल्हे पश्चिम महाराष्ट्रातील होते. याऊलट अविकसित जिल्ह्यामध्ये मराठवाड्याचे सर्व जिल्हे, विदर्भातील ७ जिल्हे व पश्चिम महाराष्ट्रातील ६ जिल्हे आहेत. [२६]

**१२. औद्योगिक विकाससंबंधी धोरणे :**

**१. १९४८ ची औद्योगिक निती**

भारतामध्ये जलद औद्योगिकीकरण घडवून आणण्याच्या दृष्टीने परकीय भांडवल व परकीय तंत्रज्ञान भारतात येण्यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण केली पाहीजे, असे १९४८ च्या धोरणात ठरविण्यात आले. परकीय भांडवल तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे देशाच्या हिताच्या दृष्टीने, परकीय भांडवल व तंत्रज्ञान ज्या

उद्योगांमध्ये प्रवेश करतील, त्या कारखान्याच्या मालकी हक्कात भारतीयांचा प्रमुख हिस्सा राहील, हे स्पष्ट करण्यात आले. परकीय तंत्रज्ञानी भारतीय कामगारांना प्रशिक्षण देऊन शेवटी भारतीय तंत्रज्ञानी परकीय तंत्रज्ञांची जागा घ्यावी असे १९४८ च्या धोरणामध्ये ठरविण्यात आले. सारांश १९४८ च्या पहिल्या औद्योगिक धोरणाचा प्रमुख उद्देश विविध अविकसित भागामध्ये नवनवीन उद्योग स्थापून आणि त्या भागाचा विकास साधून औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल दूर करणे हा होता.

**२. १९५६ ची भारताची व्दितीय औद्योगिक निती/धोरण :**

उद्योग धंद्याच्या उत्पादनामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने १९५६ मध्ये भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण जाहीर केले. १९५० मध्ये भारतामध्ये आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला. भारताची (१९५१-५६) ही पहिली पंचवार्षिक योजना सफल झाली होती. १९५६ मध्ये दुसरी पंचवार्षिक योजना सुरु होण्यापूर्वी उद्योगांच्या विकासासंबंधी काही धोरणे व उद्दिष्टे मांडण्यात आलेत. ही १९५६ ची धोरणे खालील प्रमाणे आहेत.

- वार्षिक वृध्दीदर वाढविणे.
- औद्योगिकीकरणाच्या गतीला चालना देणे.
- अवजड व यंत्रसामग्री उत्पादन करणारे उद्योग स्थापने.
- सार्वजनिक क्षेत्राची वाढ करणे.
- खाजगी मक्तेदारीला आळा घालणे
- संपत्ती व उत्पन्न वाट्यातील विषमता कमी करणे.
- आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रामध्ये विकेंद्रीकरण घडवून आणणे व औद्योगिकीकरणाकडे जलद वाटचाल करणे.

वरील सर्व उद्यिष्ट साधण्याच्या दृष्टीने १९४८ च्या औद्योगिक धोरणांचा पुनर्विचार करुन १९५६ चे औद्योगिक धोरण स्वीकारण्यात आले. त्यामुळे देशाच्या विविध भागाचा औद्योगिक विकास जलद गतीने व समतोल झाला.

**३. औद्योगिक नितीसंबंधी घोषणापत्रे (१९७७) :**

या घोषणापत्रामध्ये असे नमुद करण्यात आले की, आता पर्यंत मोठ-मोठ्याच उद्योगांच्या विकासाचे प्रयत्न झालेत. तेव्हा लघु व कुटीर उद्योगांकडे दुर्लक्ष न करता त्या उद्योगांच्य विकासाचा कार्यक्रम आखण्यात आला.

१९७७ च्या औद्योगिक धोरणाचा भर लघु व ग्रामोद्यागांच्या विकासावर होतो. कारण त्यामुळे ग्रामीण भागाच्या रोजगारामध्ये वाढ होणार होती व औद्योगिक विकेंद्रीकरण घडून येणार होते. १९७७ च्या औद्योगिक धोरणात खालील चांगल्या गोष्टीवर भर देण्यात आला होता.

- खाजगी उद्योगपतीच्या औद्योगिक साम्राज्यावर नियंत्रण ठेवणे.
- श्रमिकांना उद्योगांच्या मालकी हक्कात व व्यवस्थापनात सहभागी करुन घेणे.
- जिल्हा उद्योग केंद्र स्थापने सार्वजनिक क्षेत्र वाढविणे.
- उद्योगांचे देशामध्ये विकेंद्रीकरण घडवून आणणे इ.

वरील सर्व निर्णयामुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणावर वाढ झाली असून औद्योगिक विकासातील असमतोल दूर होण्यास बरीच मदत झाली.

**४. औद्योगिक नितीसंबंधी घोषणापत्रे (१९८०) :**

या घोषणापत्राचा उद्देश खालील प्रमाणे आहेत.

- स्थापीत उद्योगांची क्षमता वाढविणे.
- अधिक उत्पादन करणे.
- रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करुन देणे.
- निर्यातीला प्रोत्साहन देणे.
- औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या विभागांचा औद्योगिक विकास घडवून आणण्यास देऊन, प्रादेशिक असमतोल कमी करणे.

**५. औद्योगिक धोरण (१९९१) :**

ही निती १९५६ च्याच नितीची सुधारीत घोषणा होती. हे धोरण २४ जुलै १९९१ रोजी जाहीर करण्यात आले. १९९१ च्या धोरणाने १९५६ च्या औद्योगिक चौकटीत बदल घडवून आणले आहेत. हे बदल खालीलप्रमाणे आहेत.

- १९५६ मध्ये सरकारी क्षेत्रामध्ये परिशिष्ट 'अ' मध्ये १७ उद्योग व परिशिष्ट 'ब' मध्ये १२ उद्योग समाविष्ट होते. १९९१ च्या धोरणाने सरकारी क्षेत्रातील ही मक्तेदारी सात उद्योगांपुरती मर्यादीत केली त्यामुळे खाजगी क्षेत्राला वाव मिळाली.

- १९५१ मध्ये उद्योगांच्या स्थापनेच्या संबंधी, भांडवल उभारणी कारखान्याचे उत्पादन, कारखाना हलवायचा असल्यास त्याच्या नवीन ठिकाणांची निश्चिती इ. बाबत सर्व निर्णय घेण्याचा अधिकार नोकरशाहीच्या हातात असलेली परवाना पध्दती अस्तीत्वात होती.

- १९५१ च्या नवीन औद्योगिक धोरणाने महत्वाचे उद्योग सोडून इतर उद्योगांना त्यांच्या स्थापनेचा, भांडवल उभारणीचा, स्थान निश्चीतीचा उत्पादन प्रमाणाचा स्वतंत्र निर्णय अधिकार देण्यात आला. म्हणजे परवाना पध्दती शिथील करण्यात आली. फक्त एकच अट होती की १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरापासून असे कारखाने २५ किमी पेक्षा जास्त दूर असले पाहीजे.

- १९९१ मध्ये परकीय भांडवल गुंतवणूकीची मर्यादा ५१% करण्यात आली. या भागभांडवल परदेशातून यंत्रसामग्री आयात करावयाची असल्यास, त्यासाठी कोणतीही परवानगी किंवा आयात परवाना जरुरी नाही.

- भारतात परदेशांतुन आधूनिक तंत्रज्ञान यावे म्हणूण परकीय तंत्रज्ञानाची आयात करण्यासाठी मुक्त हस्ताने परवानगी देण्याचे सरकारने ठरविले आहे.

- १९९१ पर्यंत ज्या उद्योगांचे भागभांडवल १०० कोटीचे आहे. अशा कंपन्यांना मक्तेदारी कायदा लागू होता. परंतू १९९१ नंतर भांडवल गुंतवणूकीच्या आधारे एखाद्या कंपनीस मक्तेदारी कंपनी ठरविण्यात येणार नसून त्या कंपनीचे उत्पादन विशिष्ट उद्योगांच्या एकूण उत्पादनाच्या २५% पेक्षा जास्त असेल, अशीच कंपनी मक्तेदारी कंपनी ठरेल.

- यंत्रसामग्री किमान २५% किंवा २ कोटी रु. पर्यंतचे आयात परवाने नवीन कंपन्याना आपोआप मिळतील.

- अधिक भांडवल न गुंतविता उपलब्ध यंत्रसामग्रीच्या साहाय्याने त्याच उद्योगात दुसऱ्या कोणत्याही वस्तुचे उत्पादन करण्यारिता कारखानदाराला परत परवाना घ्यावा लागणार नाही. केवळ उद्योजकाने आपण कोणत्या नवीन वस्तुचे उत्पादन करणार आहोत ह्याची फक्त केंद्र सरकारकडे नोंद करावी.

सारांश उद्योग व्यवसायासंबंधी १९४८, १९५६, १९७७, १९८०, १९९१ अशा विविध औद्योगिक धोरणाची / नितीची आखणी करण्यात आली आहे. या औद्योगिक धोरणाचा एकमेव उद्देश हाच आहे की देशांनी औद्योगिक विकासामध्ये वाढ करणे आणि अविकसित/मागासलेल्या भागामध्ये नवनवीन उद्योगांची स्थापना करण्यास प्रोत्साहन देणे, सहाय्य करणे जेणेकरुन औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल दूर होईल.[२७]

**२.६ मासिके, पाक्षिके व शोधनिबंधाचा आढावा:**

**जरनल ऑफ इंडियन स्कुल ऑफ पॉलीटिकल इकॉनॉमी (सप्टे. २०११)**

या जनरल मधील संशोधनाचा आढावा :

**श्री. आर. पी. कुरुलकर** यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक असमानतेची समस्या आणि त्यासंदर्भात प्रादेशिक विकास महामंडळाची भूमिका यावर संशोधन करुन आपले संशोधनपर साहित्य निष्कर्षासह वरील जरनल मध्ये आहे. त्यांनी आपल्या संशोधनकरिता खालील अभ्यासकांची मते अभ्यासली आहेत.

१. १९९२ मध्ये **सीता प्रभु आणि पी. सी. सरेकर** यांनी महराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील विकासातील पायऱ्या या विषयावर संशोधनपर पेपर सादर केला. त्याकरिता त्यांनी १९८५-८६ च्या विविध विषयातील माहीतीचा आधार घेतला आहे. सीता प्रभु आणि सरेकर यांनी आपल्या संशोधनातुन काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

- महाराष्ट्रातील २९ जिल्ह्यापैकी ११ जिल्ह्याचा विकास हा उच्च पातळीवर झालेला आहे. म्हणजे ११ जिल्हे पूर्णपणे विकसित आहेत. ३ जिल्हे विकासाच्या मध्यम अवस्थेत आहेत आणि उर्वरित १५ जिल्हे हे मागासलेल्या म्हणजे अविकसित अवस्थेमध्ये आहेत.
- संशोधनातील निष्कर्षानुसार हे १५ अविकसत जिल्हे हे केवळ मराठवाडा आणि विदर्भ या प्रदेशातील आहेत.

२. १९८३ मध्ये महाराष्ट्र सरकारने (राज्य सरकारने) **श्री. व्ही. एम. दांडेकर** यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील प्रोदेशिक असमतोलाचा अभ्यास करण्याकरिता एका समितीची स्थापना केली होती. समितीने विविध क्षेत्रामध्ये असणाऱ्या प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करुन आपला अहवाल सरकारला सादर केला. १९८४ मध्ये दांडेकर समितीच्या अहवालाचे प्रकाशन झाले. पुन्हा १९९२ मध्ये 'राज्य नियोजन मंडळाने' (महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ) **श्री. बी. ए. कुलकर्णी** यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र राज्यातील मागासलेल्या प्रदेशांचा अभ्यास'

करण्याकरिता एका अभ्यास गटाची स्थापना केली होती. ह्या अभ्यास गटाने आपले संशोधन विविध १२ घटकांच्या अभ्यासातुन निवड करुन केले आहे.

३. १९९७ मध्ये भारत सरकारने (केंद्र सरकारने) मिस्टर (E.A.S. Sarma) **इ. ए. एस. सरमा** यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील १०० दारिद्रय रेषेखालील (Poorest Districts) जिल्ह्याचा शोध घेण्याकरिता एका समितीची स्थापना केली होती आश्चर्याची गोष्ट अशी की समितीने आपल्या संशोधनातून असे निष्कर्ष मांडले आहे की-

- भारतातील सर्वात उच्च विकसित १० जिल्हे हे केवळ एकट्या महाराष्ट्रामध्ये आहेत.
- दुसऱ्या बाजूला ह्याच महाराष्ट्रमध्ये सर्वात जास्त म्हणजे ८ जिल्हे दारिद्रयातील (गरीबावस्थेतील) गटात मोडतात.
- ह्या ८ पैकी विदर्भामध्ये गडचिरोली, बुलढाणा व यवतमाळ हे तीन जिल्हे एकट्या विदर्भातील आहेत.

४. जुलै २००७ मध्ये भारत सरकारने भारतातील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा आणि त्याचे परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्याकरिता **प्रो. आर. राधाकृष्णन** यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली. समितीने भारतातील १०० मागासलेल्या आणि कृषीप्रधान जिल्ह्यांचा संपूर्ण अभ्यास केला व खालील निष्कर्ष मांडला.

- भारतामध्ये एकूण १०० जिल्हे कृषीप्रधान आणि मागासलेल्या अवस्थेत आहेत.
- केवळ एकट्या महाराष्ट्रामधील विदर्भात अकरा जिल्ह्यामध्ये असणारे आत्महत्येचे प्रमाण उच्च पातळीवर आहे.

- मराठवाड्यातही दोन जिल्हे (उस्मानाबाद आणि नांदेड) ही जिल्हे आत्महत्येच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहेत.

५. २००९ मध्ये एच. एम. सुर्यनारायण यांनी 'आंतरराज्यीय आर्थिक असमतोलाचा अभ्यास' (संदर्भ कर्नाटक व महाराष्ट्र राज्य) २००९ मध्ये एक संशोधनपर पेपर प्रसिध्द केला. श्री. सुर्यनारायण यांनी कर्नाटक व महाराष्ट्र या दोन राज्यातील आर्थिक असमतोलाचा अभ्यास करुन निष्कर्ष काढले.

वरील सर्व अभ्यासावरुन असा स्पष्ट निष्कर्ष निघतो की महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा हे भाग मागील ५ दशके (स्वातंत्र्याची) ओलांडून गेल्यावरही आजही अविकसित अवस्थेत आहेत.

६. १९९५ मध्ये महाराष्ट्र सरकारने 'दर्शक आणि मागासलेपणा समिती' ची स्थापना केली. महाराष्ट्रामध्ये असणारा असमतोल आणि ह्या असमतोलाचे दर्शक घटक कोणते याचा अभ्यास करण्यासाठी वरील समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीने आपला अहवाल १९९७ मध्ये राज्य सरकारकडे सादर केला.

समितीने हा असमतोल शोधण्यासाठी (मोजण्यासाठी) दांडेकर समितीने स्वीकारलेल्या संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. फक्त दांडेकर समितीने विविध ९ घटकांपैकी ८ घटकांचा अभ्यास करतांना 'जिल्हा' घटक मानक धरला होता आणि १ घटकाच्या संशोधनाकरिता (कृषी क्षेत्रातील संशोधनाकरिता) तालुका हा मानक धरला होता. परंतू *I B Committee* ने कृषी क्षेत्रासहीत सर्व ९ घटकांच्या अभ्यासाकरिता जिल्हा हा एकच घटक संशोधनाचे मानक ग्राह्य धरला आहे.

*I B Committee* ने असमतोलासंबंधी केलेले संशाधन त्यांनी काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

समितीने १९९४ च्या आकडेवारीनूसार महाराष्ट्रामध्ये विविध घटकामध्ये (९ घटक-रस्ते, कृषीक्षेत्र, ग्रामीण विजपुरवठा, पशुवैद्यशास्त्र) असणारा मौद्रीक असमतोल १४००६.७७ कोटी रु. चा होता. म्हणजे तो दांडेकर समितीने दर्शविलेल्या १९८४ च्या आकडेवारीनुसार ४ १/२ % वाढला होता. समितीने काढलेला खरा मौद्रीक असमतोल १५३५५.७७ कोटी रु. चा होता. मात्र हा असमतोल दूर करण्याकरिता १४००६.७७ कोटी रु. ची तरतुद करण्यात आली होती.

**तक्ता क्रमांक.२.२**
**महाराष्ट्रातील अतिलघु, लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांच्या विकासाची आकडेवारी (३० नोव्हें. २००९ पर्यंतची)**

| अ.क्र. | प्रदेश/विभाग | अतिलघु, लघु व मध्यम उद्योग | कामगार (नंबर) | मोठे उद्योग | कामगार (नंबर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पश्चिम महाराष्ट्र (म.चा. उर्वरित भाग) | ११६४७८ | ८९४४५८ | २२३१ | ५०६२२३ |
| २ | मराठवाडा | ११६७२ | १०२०७६ | १४२ | ४१९३६ |
| ३ | विदर्भ | २३३४५ | १९१६४७ | २९७ | ८७४७८ |
| | **एकूण** | **१५१४९५** | **११८८१८१** | **२६७०** | **६३५६३७** |

स्त्रोतः Economic Survey of Maharashtra 2009-10 Govt. of Maharashtra.

***Economic Survey of Maharashtra 2009-10*** च्या औद्योगिक क्षेत्रातील विविध प्रदेशासंदर्भात असणारी वरील आकडेवारी ही २००-१० या कालावधीमध्ये म्हणजे जागतिकीकरणानंतर औद्योगिक क्षेत्रामध्ये विदर्भ आणि मराठवाडासोडून उर्वरित महाराष्ट्राने (पश्चिम महाराष्ट्र) उद्योगामध्ये केलेली अभूतपूर्व प्रगती स्पष्ट करते. ही प्रगती त्या भागामध्ये असणाऱ्या नैसर्गिक घटक, उत्कृष्ट सुविधा (रस्ते, पाणी, वाहतूक वीज इ.) ह्या घटकाच्या प्रभावामुळे झाली आहे.

महाराष्ट्रातील एकूण उद्योगांपैकी ३/४ उद्योग आणि ८०% रोजगार केवळ एकट्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये एकवटलेले आहे. त्याच्या समोर मराठवाडा व विदर्भाची स्थिती दयनिय आहे. मराठवाड्यामध्ये एकूण उद्योग क्षेत्राच्या ७.८% उद्योग

व रोजगाराच्या केवळ ५-६% रोजगार असून विदर्भामध्ये मराठवाड्यापेक्षा थोडी चांगली स्थिती म्हणजे एकूण उद्योग क्षेत्रापैकी १५% उद्योग व एकूण रोजगारापैकी १३-१६% रोजगार विदर्भामध्ये आहेत. वरील आकडेवारी महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्रामध्ये एकाच बाजूने औद्योगिक विकास म्हणजे कलता *(Lopsided Industrial Develop of the State)* झाल्याचे स्पष्ट चित्र दर्शविते आहे. ही गोष्ट महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास/विचार करण्यासाठी चालना देते.

७. महाराष्ट्रातील सद्य:स्थितीमध्ये असणारा प्रादेशिक असमतोल *I & B Committee* ने केलेल्या संशोधनाच्या वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे. टेबल क्र. ३ १९८४ ते १९९४ मध्ये महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या प्रादेशिक असमतोलाच्या वरील आकडेवारीवरुन आपणांस औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल अभ्यासाच्या व त्यावर उपाययोजना सुचविण्याच्या अभ्यासाचे महत्व पटते.

**तक्ता क्रमांक.२.३**

**महाराष्ट्रातील विशेष आर्थिक प्रदेश (२००९ पर्यंतचे)**

| अ. क्र. | प्रदेश (Region) | विशेष आर्थिक क्षेत्र (Sez) (लाख) | गुंतवणूक (कोटी रु.) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्रचा उर्वरित भाग (Rom) | ११९ (८२.६%) | १७१६०८ (९०.७%) | ५७.९१ (८८.८%) |
| २ | मराठवाडा | १५ | ४९६२ | १.५३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (१०.४%) | (२.७१%) | (२.३१%) |
| ३ | विदर्भ | १०<br>(७.०%) | १२५७८<br>(६.६१%) | ५.८१<br>(८.९%) |
| | **एकूण** | **१४४<br>(१००%)** | **१८९१४८<br>(१००%)** | **६५.२५<br>(१००%)** |

स्त्रोत - Economy surey of Maharashtra 2009-10 Government of Maharashtra, Mumbai, page-108

महाराष्ट्र सरकारच्या २००९-१० च्या इकॉनॉमिक सर्व्हे ने प्रसिध्द केलेली महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्रा *(Special Economic Zones in Maharashtra, Sez)* संबंधीची वरील आकडेवारी असे दर्शविते की, ८०% पेक्षा ही जास्त विशेष आर्थिक क्षेत्र आणि एकूण गुंतवणूकीपैकी जवळजवळ ९०% गुंतवणूक ही केवळ एकट्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये (उर्वरित महाराष्ट्र) असून त्यामानाने पुन्हा पायाभूत सुविधाचा अभावामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील विशेष आर्थिक क्षेत्राचा व रोजगाराचा विकास फारच कमी प्रमाणवर झाल्याचे स्पष्ट होते. जर ही परिस्थिती किंवा विशेष आर्थिक क्षेत्र, तेथील रोजगार यांची हीच प्रवृत्ती अशीच कायम राहीली तर येणाऱ्या प्रत्येक वर्षामध्ये औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल दिवसेंदिवस वाढतच जाईल.

*8. The Region - Wise Banking Estimated by the I & B Committee (Indicates and Banking Committee) (1997):*

**तक्ता क्रमांक.२.४**

**महाराष्ट्रातील मौद्रीक असमतोल**

| अ. क्र. | प्रदेश (Region) | मौद्रीक असमतोल | टक्के% |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र उर्वरित | ३७३८.३२ (कोटी) | २४.५३% |

| | | | |
|---|---|---|---|
| | भाग(Rom) | | |
| २ | मराठवाडा | ४६२८.५५ (कोटी) | ३०.४३% |
| ३ | विदर्भ | ६९६१.०२ (कोटी) | ४५.३३% |
| | **एकूण** | **१५३५५.७७ (कोटी)** | **१००%** |

*9. Impact of Govt. Expenditure (Backing) on three Regions of State:*

**तक्ता क्रमांक.२.५**

**महाराष्ट्रातील अधिकोषण निर्देशांक**

| Region | Proportion of Backing Percent (1984) | Proportion of Backing Percent (1994) | Change in Proportion Percent | Index of per Capita Backing | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1984 | 1994 | Change |
| Rest of Maharashtra | ३७.३२ | २४.५४ | -(१२.७८) | ६१ | ३९ | -२२ |
| Marathwada | ३२.५६ | ३०.१३ | +(६.५७) | १४३ | १८६ | +४३ |
| Vidharbha | ३९.१२ | ४५.३३ | +(६.२१) | १६१ | २०६ | +४७ |
| **Total** | **१००** | **१००** | | | | |

Source :- Indicators & Backlog Committee Report (1997) Govt. of Maharashtra, Mumbai (Page 243-243)

आय अँड बी समितीने (१९९७) मध्ये असमतोल व त्याचे यासंबंधी महाराष्ट्र सरकारला सादर केलेल्या आपल्या अहवालामध्ये १९८४-१९९४ या कालावधीचा अभ्यास करुन ह्या कालावधीमध्ये विकासातील प्रादेशिक असमतोल कमी न होता तो वाढत गेल्याचे वरील आकडेवारीवरुन सिध्द करुन दिले.

- मराठवाड्यातील असमतोल हा १९८४ ते १९९४ या कालावधीमध्ये २३.५६% वरुन ३०.१३% पर्यंत वाढल्याचे दिसते.
- विदर्भामध्येही विकासातील हा असमतोल ३९.१२% वरुन ४५.३३% पर्यंत वाढल्याचे दिसून येते.

- आश्चर्य म्हणजे ह्याच कालावधीमध्ये महाराष्ट्रातील उर्वरीत भागामध्ये (विदर्भ व मराठवाडा सोडून) विकासातील प्रादेशिक असमतोल ३७.३२% वरुन २४.५४% पर्यं कमी झाल्याचा दिसून येतो.

- व्यक्तीगत उत्पन्नाच्या बाबतीतही असणारे दर्शक मराठवाडा आणि विदर्भाचा व्यक्तीगत उत्पन्नातील असमतोल अनुक्रमे ४३ आणि ४७% नी वाढल्याचे दर्शवितो.

- पश्चिम महाराष्ट्राच्या बाबतीत व्यक्तीगत उत्पन्नामध्ये असणाऱ्या असमतोलाच्या बाबतीत या भागामध्ये हा असमतोल २२% नी कमी झाला आहे.

वरील आकडेवारीवरुन विकासाचा बाबतीत असणारा प्रादेशिक असमतोल दर्शवितो.[२८]

**१०. योगेश संत (२००१):**

यांनी ‘महाराष्ट्राच्या संदर्भात असणारी विदेशी गुंतवणूकीची प्रवृत्ती’ या विषयावर महाराष्ट्र आर्थिक विकास परिषद, मुंबई येथे संशोधनपर निबंध सादर केला.

२००१ मध्ये योगेश संत यांनी आपल्या संशोधनामध्ये परकीय गुंतवणूकीची भारत आणि महाराष्ट्रामध्ये असणारी प्रवृत्ती यावर प्रकाश टाकला आहे. त्यांनी भारत व महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये विदेशी गुंतवणूकीचा असणारा जागतिक दृष्टिकोन कसा आहे. या विषयावर सखोल अभ्यास केला.

हे संशोधन महाराष्ट्रामध्ये विदेशी गुंतवणूकीसंबंधी सरकारचे असणारे धोरण, बदलते आर्थिक धोरण राज्याची त्यासंर्भातील कामगिरी, प्रकार अशा विविध बाबीवर प्रकाश टाकणारे एक उत्कृष्ट संशोधनाचे उदाहरण आहे.

श्री योगेश संत यांच्या संशोधनानुसार विदेशी गुंतवणूकीचा महाराष्ट्रामध्ये तसेच भारताच्या विविध राज्यामध्ये असणारा ओघ असमान प्रमाणाचा आहे. त्यामुळे औद्योगिक विकासात प्रादेशिक असमतोल वाढतच जातो. कारण

परकीय गुंतवणूक (FDI) विकसित भागामध्ये आकर्षिली जात असल्यामुळे विकसित भाग अधिक विकसित व मागासलेले भाग मागासलेल्या स्थितीतच राहतात.[२९]

**११. अर्थमंथन पत्रिका (नोव्हेंबर २०१०) :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे १३, १४ व १५ नोव्हेंबर २०१० रोजी पार पडले. या परिषदेचे नोव्हेंबर २०१० रोजी अर्थमंथन हे मासिक (स्मरणिका) प्रसिध्द झाली आहे. संबंधीत स्मरणिकेमध्ये विविध संशोधकांनी, तंज्ञानी आपले मत प्रदर्शन केले. त्यापैकी महाराष्ट्रातील औद्योगिक विकास व या विकासामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल यावरही काही संशोधनकांनी आपले मत मांडले आहे. त्यांच्या संशोधनाचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे. [३०]

**१२. अर्चना ज्ह्रासे (Ph.D संशोधक विद्यार्थीनी, संगमनेर)**

यांनी अर्थमंथन पत्रिका, नोव्हें. २०१० मध्ये पृष्ठ क्रमांक १७५ वर प्रकाशित महाराष्ट्रातील औद्योगिक विकासामध्ये असणाऱ्या प्रादेशिक असमतोलाची मिमांसा खालीलप्रमाणे केली आहे.

महाराष्ट्र हे भारतातील औद्योगिकीकरणाच्या बाबतीत एक अग्रेसर राज्य आहे. भारताच्या एकूण स्थुल राष्ट्रीय उत्पन्नापैकी महाराष्ट्राचे स्थुल राष्ट्रीय उत्पन्न २०% आहे. महाराष्ट्रामध्ये २१७ औद्योगिक वसाहती असून त्यापैकी ९ पंचतारांकीत आहेत. देशी व विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीत महाराष्ट्र प्रथम पसंतीचे राज्य ठरत आहे.

परंतु महाराष्ट्रातील औद्योगिक विकास समतोल प्रमाणात झालेला नाही. महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, कोकण ह्या भागाचा विकास विदर्भ व मराठवाड्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात झाला आहे. राज्यातील-

| | | |
|---|---|---|
| अ) लघु उपक्रमापैकी | ६६% | उपक्रम |
| ब) लघु उपक्रमातील रोजगारापैकी | ६६.३% | रोजगार |

क) मोठ्या उपक्रमापैकी ८०.३% उपक्रम

ड) मोठ्या उपक्रमातील रोजगारापैकी ६७.३% रोजगार

केवळ पुणे, कोकण व कोल्हापूर या भागामध्ये केंद्रीत झालेला आहे. या तुलनेत इतर विभाग मागासलेले आहेत.[३१]

**१३. रमजान फत्तुखान मुजावर**

यांनी अर्थमंथन पत्रिका, नोव्हें. २०१० मध्ये पृष्ठ क्रमांक १ ते १८ वर प्रकाशित ‘महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल’ या लेखामध्ये असे मत मांडले आहे की, महाराष्ट्र राज्य भारतातील आकारमानाने तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे राज्य आहे. देशांतर्गत उत्पादन महाराष्ट्राचा वाटा ९% आहे. महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असणारे राज्य असले तरी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यामध्ये उच्च आर्थिक विषमता दिसून येते.

महाराष्ट्राचा पश्चिम भाग जास्त श्रीमंत, शहरी व औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असणारा भाग आहे. तर पुर्वेकडील भाग हा दुष्काळग्रस्त, गरीब व अविकसित असलेला दिसून येतो. राज्य नियोजन मंडळाच्या अभ्यास गटाने महाराष्ट्रातील १७ जिल्हे मागास आहे, असा उल्लेख केला आहे. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील- एक, कोकण- दोन, मराठवाडा- सहा व विदर्भ यांच्यातील औद्योगिक विकासाबद्दल असणारा प्रादेशिक असमतोल स्पष्ट करते.[३२]

**१४. विजय दिवानी (मार्च २००५) :**

मार्च २००५ मध्ये प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र वार्षिक ह्या पुस्तकामध्ये “मराठवाड्याच्या विकासात दिशाबदल हवा” या विषयावर विजय दिवानी यांनी शोध निबंध सादर केला. त्यांचे संशोधन महाराष्ट्रातील औद्योगिक विकासामध्ये असणारा असमतोल स्पष्ट करतो.

विजय दिवानी यांच्या मते उद्योगधंद्याच्या बाबतीत किंवा उद्योगधंद्याच्या विकासामध्ये महाराष्ट्र राज्य इतर राज्यापेक्षा अग्रेसर आहे, असे सरकारी आकडेवारी

सांगते. १९९१ पासून आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये ९५०० नवे उद्योग स्थापन झालेत. त्याकरिता २,१७,३७६ कोटी रु. ची भांडवली गुंतवणूकही करण्यात आली. ही गुंतवणूक कोकण ६७%, पश्चिम महाराष्ट्र २५%, विदर्भ तर मराठवाडा ४% अशी करण्यात आली आहे. यांच्या एकूण भांडवल गुंतवणूकीच्या वरील आकडेवारी वरुन महाराष्ट्रातील विविध विभागामध्ये औद्योगिक विकासामध्ये असणारा असमतोल स्पष्ट होतो. [३३]

**१५. तुकाराम जाधव (२००८-०९):**

२००८-०९ मध्ये श्री तुकाराम जाधव यांनी प्रसिध्द केलेल्या 'महाराष्ट्र वार्षिक' या पुस्तकामध्ये विविध लेखांच्या व आकडेवारीच्या साहाय्याने त्यांनी महाराष्ट्राच्या विविध विभागातील झालेला औद्योगिक विकास आणि औद्योगिक विकासामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल याचा सविस्तर विचार (संशोधन) केला आहे. त्यांनी मांडलेले मत किंवा त्यांचे संशोधनपर निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

राज्यामध्ये विविध जिल्ह्याचा झालेला विकास व त्यावरुन जिल्ह्याची वर्गवारी पुढील चार गटात केली आहे.[३४]

**श्रीमंत जिल्ह्यांचा गट :**

या गटामध्ये मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, रायगड व कोल्हापूर या जिल्ह्यांचा समावेश होतो.

**उच्चम मध्यम जिल्ह्योचा गट :**

या गटामध्ये औरंगाबाद, सांगली, सोलापूर, सिंधुदूर्ग, अमरावती, वर्धा व चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो.

**कनिष्ठ मध्यम जिल्ह्यांचा गट :**

या गटामध्ये सातारा, अहमदनगर, जळगांव, रत्नागिरी, अकोला, भंडारा व बीड इत्यादी जिल्ह्यांचा समावेश होतो.

**अतिगरीब जिल्ह्यांचा गट :**

या गटामध्ये लातुर, परभणी, उस्मानाबाद, जालना, बुलढाणा, यवतमाळ, नांदेड व धुळे या जिल्ह्यांचा समावेश होतो.

राज्याच्या स्थुल उत्पादनामध्ये जिल्ह्यांचा वाटा.

| | |
|---|---|
| १) श्रीमंत | ६०% |
| २) उच्चतम | १४.८% |
| ३) कनिष्ठ मध्यम | १४.३% |
| ४) अतिगरीब | ११% |

वरील आकडेवारीवरुन राज्याच्या विकासामध्ये जिल्हा विषमतेची तिव्रता किती वाढली, हे दिसून येते.

प्रादेशिक विषमतेला सरकारी खर्चाचे असमान वाटप हा मुद्दा तर कारणीभूत आहेच, पण त्याहीपेक्षा खोलात जाऊन या सरकारी खर्चाच्या असमान वाटपाला व एकूणच प्रादेशिक विषमतेला जबाबदार इतर महत्वाच्या कारणांची दखल घेणे ही तेवढेच गरजेचे आहे. श्री तुकाराम जाधव यांनी २००७-०८ मध्ये महाराष्ट्र वार्षिक हे पुस्तक प्रसिध्द केले. त्यामध्ये त्यांनी विदर्भाचा कमी व पश्चिम महाराष्ट्राचा अधिक विकास होण्याच्या कारणांचा सखोल अभ्यास करुन खालील मत मांडले आहे.

**१) पश्चिम महाराष्ट्राचे राजकीय वर्चस्व**

महाराष्ट्राच्या राजकारणावर पश्चिम महाराष्ट्राचे असणारे राजकीय वर्चस्व त्या भागाच्या अधिक प्रगतीला कारणीभूत ठरले आहे. मराठवाडा व विदर्भातील मंत्री आले तरी सत्तासुत्रे मात्र पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांच्या हातात राहील्याने बहुतांश ध्येय धोरणे आखतांना पश्चिम महाराष्ट्राला झुकते माप दिले जाते.

**२) राजकीय नेतृत्व**

राजकीय नेतृत्व हे सुध्दा प्रादेशिक विषमतेच्या संदर्भात एक कळीचा मुद्दा ठरला आहे. पश्चिम महाराष्ट्राला बऱ्याच मोठ्या राजकीय नेत्यांचे नेतृत्व लाभले आहे. परंतू विदर्भ व मराठवाडा यांचे तुलनेत फारसे प्रभावी नव्हते.

**३) सहकारी चळवळ**

यशवंत चव्हाणांनी पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाकरिता जाणीवपूर्वक येथे सहकारी चळवळीचा पाया घातला. जसे की सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध संस्था, पणन संस्था इत्यादीमुळे पश्चिम महाराष्ट्राचा काया पालटून गेला. या उलटची स्थिती विदर्भ व मराठवाड्याची राहिल्याने हे प्रदेश मागासलेपणाचे दृष्टचक्र मोडू शकले नाहीत.

**४) पायाभूत सुविधांचा विकास**

वरील सर्व कारणांबरोबर पश्चिम महाराष्ट्रामध्ये झालेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे नवीन उद्योजक व गुंतवणूकदार पुणे, मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्राला अधिक पसंती देतात.

**विशेष आर्थिक क्षेत्र (पान क्र. ३५३)**

महाराष्ट्रामध्ये २००७ मध्ये १७५ विशेष आर्थिक क्षेत्रापैकी (SEZ) १२२ क्षेत्रांना मंजूरी मिळाली होती. त्यापैकी ९८ विशेष आर्थिक क्षेत्र खाजगी असून ४५ क्षेत्र ही माहिती व तंत्रज्ञान या क्षेत्रातील आहेत. महाराष्ट्रामध्ये परकीय व देशांतर्गत गुंतवणूक वाढावी याकरिता तसेच रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्यात येत आहेत. २००७ अखेर कोकण-५८, पश्चिम महाराष्ट्र-४२, मराठवाडा-१३ आणि विदर्भ-९ अशा प्रमाणात विशेष आर्थिक क्षेत्रांना मंजूरी देण्यात आली. विशेष आर्थिक क्षेत्राची वरील आकडेवारी विदर्भ-९ आणि पश्चिम महाराष्ट्र-४२ अशी फार मोठी तफावत दोन प्रदेशामध्ये असणाऱ्या प्रादेशिक असमतोल स्पष्ट करते.

**२) पान क्र. ७७४**

कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये उद्योग क्षेत्राला महत्वाचे स्थान असते. विकासाची वरची पातळी गाठण्यासाठी उद्योग क्षेत्राच्या वाढीची व विस्ताराची ही आवश्यकता असते. राज्य शासनाने २००६ मध्ये महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाकरीता नवीन औद्योगिक व गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा धोरण जाहीर केले. या धोरणाची उद्दिष्टे खालीलप्राणे होती.

§ समतोल प्रादेशिक विकास साध्य करणे.

§ मोठ्या प्रमाणावर व टिकाऊ स्वरुपाची आर्थिक वाढ साध्य करणे.

§ औद्योगिक व पायाभुत सुविधाच्या खाजगी आणि सार्वजनिक गुंतवणूकीच्या माध्यमातून रोजगार वृध्दी करणे.

२००६ च्या धोरणामध्ये सुध्दा महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

## संदर्भग्रंथ-


1. Chaudhary Parmit., The Indian Economy: Poverty and Development.
2. Chaudhary Parmit, The Indian Economy: Poverty and Development., Page No. 222.
3. Chaudhary Parmit., The Indian Economy: Poverty and Development., Page No. 223.

४. कविमंडन वीजय., (२०००), 'अर्थशास्त्र आणि नियोजन'., मंगेश प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्रमांक-६३.

५. En.wikopedia.org/wiki/Economy of India.

६. कविमंडन वीजय., (२०००), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन'., मंगेश प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्रमांक-१०६ ते ११३.

७. कविमंडन वीजय., (२०००), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन'., मंगेश प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्रमांक-९३-९६.

८. कविमंडन वीजय., (२०००), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन'., मंगेश प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्रमांक-९७-१०३.

९. मराठवाडा-२००१ खंड-२ रा., मराठवाडा विद्यापीठ., औरंगाबाद. पृष्ठ क्रमांक-४ ते ९.

१०. सदार संतोष., (२०००), 'विदर्भाचा औद्योगिक विकास'., बोके प्रकाशन, अमरावती.

११. दास्ताने संतोष., (२००६), 'महाराष्ट्र २००६' रामचंद्र आणि कंपनी प्रकाशन., पुणे.

१२. खंडागळे प्रतिभा यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे २००६ मध्ये सामाजिक शास्त्रे या शाखेमध्ये Ph.D. पदवी प्राप्ती करिता महाराष्ट्रातील परकीय गुंतवणूकीचा अभ्यास (१९९१-२००३) या विषयावरील सादर केलेला शोध प्रबंध.

१३. पठाण आय. एच (१९९८)., यांनी कोल्हापूर येथील १९४९ ते १९७४ या २५ वर्षाच्या कालावधीमध्ये (स्वातंत्र्यप्राप्तीनंतर) कोल्हापूर येथील औद्योगिक क्षेत्राचा व पर्यायाने पश्चिम महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात कारणीभूत असलेल्या घटकांचा आणि परिणाम या विषयावर शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर येथे इतिहास या विभागामध्ये Ph.D. पदवी प्राप्ती करिता सादर केलेला शोध प्रबंध.

१४. शितोळे जी. वाय. (१९९६)., यांनी १९९६ मध्ये शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर येथील वाणिज्य शाखेमध्ये Ph.D. पदवी करिता "महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या कामगिरीचा अभ्यास" या विषयावर सादर केलेला शोधप्रबंध.

१५. पाटील. एस. एल. (१९८५)., यांनी शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर अर्थशास्त्र विभागामध्ये एम. फिल. पदवीसाठी इंडस्ट्रीयल डिस्परसल इन कोल्हापूर डिस्ट्रीस्क्ट (कोल्हापूर येथील औद्योगिक क्षेत्राचा विस्तार) या विषयावर सादर केलेला शोधप्रबंध.

१६. रसाळ राजेंद्र (२००९)., भारतीय अर्थव्यवस्था., सक्सेस पब्लिकेशन पुणे.

१७. श्रमिक संघ नियमः अधिनियम २००१.

१८. बर्वे अभ्यास गटाचा अहवाल., १९५८., महाराष्ट्र शासन.

१९. गाडगीळ समितीचा अहवाल., १९६५., महाराष्ट्र शासन.

२०. दि.व्य.जहागिरदार (२०१२)., 'महाराष्ट्रः ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा'., सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती., पृष्ठ क्रमांक- १५४.

२१.गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स ॲड इकॉनॉमिक्स ; रिजनल प्लॅनिंग केस स्टडी ऑफ मराडवाडा रिजन; (अर्थ विज्ञान व्हॉल्युम १+२ मार्च-जून १९७५); गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स ॲड इकॉनॉमिक्स, पुणे, १९७५ पृष्ठे १८६; डॉआंमवि ३३८.९५४७९१/ जी आय पी इ.

२२.महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, एप्रिल १९८४.

२३.गोस्वामी समितीचा अहवाल., १९९३., महाराष्ट्र शासन.

२४.जहागिरदार दि.व्य. (२०१२)., 'महाराष्ट्र: ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा'., सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती., पृष्ठ क्रमांक- १५६.

२५.जहागिरदार दि.व्य. (२०१२)., 'महाराष्ट्र: ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा'., सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती., पृष्ठ क्रमांक- १५७.

२६.जहागिरदार दि.व्य. (२०१२)., 'महाराष्ट्र: ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा'., सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती., पृष्ठ क्रमांक- १५८.

२७.१९९१ चे औद्योगिक धोरण.

२८.जरनल ऑफ इंडियन स्कुल ऑफ पॉलीटिकल इकॉनॉमी (सप्टे. २०११)

२९.योगेश संत (२००१): यांनी 'महाराष्ट्राच्या संदर्भात असणारी विदेशी गुंतवणूकीची प्रवृत्ती' या विषयावर महाराष्ट्र आर्थिक विकास परिषद, मुंबई येथे सादर केलेला शोधनिबंध.

३०. अर्थमंथन पत्रिका (नोव्हेंबर २०१०) :मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे १३, १४ व १५ नोव्हेंबर २०१०.

३१. ऱ्हासे अर्चना., (नोव्हेंबर २०१०) :मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे १३, १४ व १५ नोव्हेंबर २०१० पृष्ठ क्र.१७५.

३२. मुजावर रमजान (नोव्हेंबर २०१०) :मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय अधिवेशन बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे १३, १४ व १५ नोव्हेंबर २०१० पृष्ठ क्र.१ ते १८.

३३. दिवानी विजय., २००५ महाराष्ट्र वार्षिक या पुस्तकातील शोधनिबंध.

३४. जाधव तुकाराम., (२००८-०९) महाराष्ट्र वार्षिक या पुस्तकातील शोधनिबंध.

# ¯Öúü¸ÖüÖ 3 ¸Ö

# ×¾ÖÂÖüÖÖ“ÖÖ ^¯ÖÃÖÆÖ¸Ö

3.1 ¯ÖÖÃÖŸÖÖ¾Ö−ÖÖ

3.2 ÃÖ¿ÖÖ¬Ö−Ö †£Ö

3.3 ÃÖ¿ÖÖ¬Ö−Ö ¯Ö¬¤ŸÖß

3.4 ÃÖ¿ÖÖ¬Ö−Ö †Ö¸ÖüÖ›Ö

3.5 ŸÖ£üÖ ÃÖÖú»Ö−Ö

3.6 ÃÖ¿ÖÖ¬Ö−ÖÖ“Öß ^×§Â™¶

3.7 ÃÖ¿ÖÖ¬Ö−ÖÖ“Öß ÷Ö×ÆŸÖú

3.8 ÃÖ¿ÖÖ¬Ö−ÖÖ“Öß ¾üÖÖ¯Öß ¾Ö ´ÖüÖÖ¤Ö

3.9 ÃÖ¿ÖÖ¬Ö−ÖÖ“Ö ´ÖÆ¢¾Ö

# प्रकरण तिसरे

# विषयाचा उपसंहार

## ३.१ प्रस्तावना

संशोधनकर्ता संशोधन करतांना संपूर्णपणे जरी त्या विषयाशी परिचित नसला तरी तो त्यात संशोधन करून त्या विषयाशी समरस होण्याच्या प्रयत्न मात्र करीत असतो. त्यासाठी त्याला सामाजिक संशोधन म्हणजे काय? त्याचे महत्त्व आणि उपयोगिता जाणून घेणे अनिवार्य ठरते. सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक घटनाचा, व्यवहाराचा शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास होय आणि हा अभ्यास समाजाच्या प्रगतीसाठी अनिवार्य ठरतो. संशोधन हा सतत नव्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व संघटित प्रयत्न आहे. प्रत्येक संशोधनाची सुरूवात एखादा प्रश्न सोडविण्यासाठी किंवा समस्येचे निराकरण करण्याच्या उद्देशाने होत असते का, कसे, कधी, कुठे, केव्हा व कशास यापैकी एका प्रश्नाने संशोधनाची सुरूवात केली जाते. व अन्य प्रश्न त्याचे उपप्रश्न बनवून विषयवस्तूचे समग्र, सखोल व सक्षम अध्ययन केले जाते.

संशोधनाचा अर्थ स्पष्ट करतांना **'जिज्ञासे'** ला प्राधान्यता द्यावे लागते. अधिक जाणण्याची प्रवृत्ती या प्रवृत्तीतून जे जाणले गेले त्याच्या प्रामाणिकतेचा पडताळा, **'अशुद्धाला'** सारून **'शुद्धाचे'** दर्शन घेणे ही अभिलाषा संशोधनात दडलेली आहे ही अभिलाषा जेव्हा व्यक्तिला अस्वस्थ करते तेव्हा त्यातून अस्तित्वात येणारी कृति ही संशोधनाचे रूप प्राप्त करते ही कृति विविध रूपात प्रकट होत असल्याने संशोधनाला अभिव्यक्त करताना **'शोध'** व **'अन्वेषण'** या शब्दाचा उपयोग भरपूर प्रमाणात करावा लागतो.

संशोधन करतांना संशोधन करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या संशोधन पध्दतीचा अर्थ अभ्यासने आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाचा उपसंहार अभ्यासतांना प्रामुख्याने संशोधनासाठी उपयोगात आणलेली पध्दती,

संशोधनाची गृहिते, उद्दिष्टे, संशोधनाचे महत्त्व या सर्व गोष्टींचा आढावा अभ्यासला आहे.

संशोधनातील पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने या सर्व बाबींचे अध्ययन करणे आवश्यक असते.

## ३.२ संशोधनाचा अर्थ:

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा मराठी भाषेतील पर्यायी शब्द होय. Re म्हणजे पुन्हा तर Search म्हणजे शोधणे, यावरुन Research म्हणजे पुन:पुन्हा शोधणे असा त्याचा अर्थ निघतो. संशोधन हा शब्द सं+शोधन दोन शब्दांनी मिळून बनलेला आहे. सं चा अर्थ संपूर्ण किंवा समग्र तर शोधन म्हणजेच शोध घेणे. म्हणून संपूर्ण जे ज्ञात आहे त्यामध्ये आणखी नवीन किंवा अद्यापही अज्ञात आहे ते शोधून काढण्यासाठीचा प्रयत्न असा त्याचा अर्थ होतो.

संशोधनाचा अर्थ पुढील व्याख्यावरुन स्पष्ट होतो.

"संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची अधिक सुव्यवस्थित व नियमबध्द अभ्यासाची प्रक्रिया होय."[१]

**-जे.डब्ल्यू बेस्ट**

"संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे अथवा तथ्ये यांचे पुन: पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय."[२]

**-वेबस्टर शब्दकोश**

प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्रातील औद्योगिक विकासातील तुलनात्मक अभ्यास करण्यात आला असून ह्या अभ्यासाकरिता महाराष्ट्रातील विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र ह्या दोन भागांचा व त्यातल्या त्यात ह्या दोन विभागामधून अनुक्रमे अकोला व कोल्हापूर जिल्ह्यांची प्रतिनिधीक घटक म्हणून निवड केली आहे.

संबंधीत संशोधनात्मक अभ्यास करतांना ह्या दोन जिल्ह्यातील उद्योगांच्या विकासाची व अपयशाची रचनात्मक तपासणी करुन, त्यांचे दोष लक्षात घेऊन आवश्यक त्या दुरुस्ती व उपायांची मांडणी करणे ही भूमिका आधारभूत आहे तसेच प्रादेशिक असमतोलाचे कारणे शोधणे ही महत्त्वाची ठरते.

विशेष म्हणजे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील औद्योगिक विकास करण्यासाठी जे सरकारी अहवाल सादर झाले, ज्या वित्तीय संस्थांची स्थापना झाली, या अभ्यासाचे महत्त्व वाटते.

### ३.३ संशोधन पध्दती:

संशोधन हे वैज्ञानिक पध्दतीने केले जाते. संशोधन पध्दती ही संशोधन समस्येनुसार अथवा संशोधन विषयानुसार निर्धारित होत असते. संशोधन पध्दतीमध्ये संशोधन आराखडा, समंक (माहिती) संकलनाच्या पध्दती व नमुना निवड या बाबींचा विचार केला जातो.

**सामाजिक संशोधनाचे प्रकार :**

अध्ययनाचे स्वरुप, उद्देश आणि अध्ययन कर्त्याचा दृष्टीकोन या आधारावर सामाजिक संशोधनाचे मुख्यत्वे- शुध्द अथवा मौलिक सैध्दान्तिक संशोधन, वर्गीकरणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन, गुणात्मक आणि संख्यात्मक संशोधन, उपयोजित संशोधन आणि व्यावहारिक किंवा क्रियाभिमुख संशोधन या पाच भागात वर्गीकरण करता येते.

**१. शुध्द अथवा मौलिक सैध्दान्तिक संशोधन :**

या प्रकारात सामाजिक जीवन आणि घटना ह्यांच्या आधारे मौलिक सिध्दांत किंवा नियम शोधून काढले जातात. नवीन ज्ञान प्राप्त करणे, ज्ञानात भर टाकणे किंवा उपलब्ध असलेल्या पूर्वज्ञानाचे पुनर्परीक्षण व शुध्दीकरण हा या पध्दतीचा उद्देश असतो. या नवीन ज्ञानातून अथवा जुन्या ज्ञानात भर घालून एखाद्या प्रमेयाची किंवा सिध्दांताची मांडणी करणे हे या पध्दतीचे उद्दिष्ट आहे.

**२. वर्गीकरणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन :**

संशोधनात झालेल्या घटनांचा मागोवा घेऊन संकलित माहितीचे विश्लेषण करुन पूर्वीच्याच सिध्दान्ताच्या आधारे त्याचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न या प्रकारात केला जातो.

**३. गुणात्मक आणि संख्यात्मक संशोधन**

मानवी वर्तणुकीचा अभ्यास गुणात्मक संशोधनाने केला जातो. तर निवडक संशोधन विषयामध्ये उपयुक्त आकडेवारीच्या साहाय्याने माध्य,बहुलक, मध्यांक, सहगुणक इ. सांख्यिकी परिमाणाच्या आधारे संख्यात्मक संशोधन केले जाते.

**४. उपयोजित संशोधन**

समाजाच्या विकासासाठी आखल्या जाणाऱ्या योजनांसाठी आधुनिक काळात मार्गदर्शक तत्त्वे सुचविण्याचे कार्य या संशोधनामुळे होते. क्रियात्मक संशोधन (Action Research) हे उपयोजित संशोधनाशी मिळते जुळते संशोधन आहे. यामध्ये अध्ययनाच्या निष्कर्षांना क्रियात्मक रुप देण्याच्या उद्देशाने संशोधन केले जाते.

**५. व्यावहारिक किंवा क्रियाभिमुख संशोधन :**

मिळविलेल्या ज्ञानाचा मानवजीवनाच्या कल्याणाच्या हेतूने ह्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करावा हे या पध्दतीचे उद्दिष्ट आहे. ह्या पध्दतीनुसार समस्यांचा शोध घेणे, समस्यानिर्मितीला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करणे आणि त्या निर्माण झाल्यास त्यावर उपाययोजना सुचिविणे यावर भर असतो. क्रियाभिमुख पध्दतीचा उपयोग फक्त सामाजिक समस्यांबाबतच होतो असे नाही तर सामाजिक नियोजन, अधिनियम, स्वास्थ, धर्म शिक्षण, न्याय इ. बाबतीतही होतो.

व्यावहारिक संशोधनामुळे संशोधनाच्या तंत्रात व पध्दतीत अधिकाधिक सुधारणा होते व ते मानवी जीवन अधिक सुखी व समृध्द करण्यात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यास उपयुक्त ठरते.[३]

## ३.४ संशोधन आराखडा

संशोधन कार्याची योजना आखणे म्हणजेच संशोधनाचा आराखडा होय. यामध्ये संशोधन विषय, उद्दिष्ट्ये, गृहितके, अध्ययन क्षेत्र, कालावधी, तथ्य संकलनाच्या पध्दती, नमुना निवड इत्यादी बाबी निश्चित कराव्या लागतात. संशोधन आराखडा ही शास्त्रीय सामाजिक संशोधनातील एक प्रमुख पायरी आहे. संशोधन आराखडा तयार केल्यामुळे संशोधनात सुसुत्रता येते.

**संशोधन आराखडयाचे प्रकार :**

संशोधनाच्या उद्दिष्टानुसार संशोधन आराखड्याचे प्रमुख चार प्रकार पडतात.

"निर्णय कार्यान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारित करण्याच्या प्रक्रियेला आराखडा असे म्हणतात." - **आर.एल.एकॉफ**

**१) अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा**

अर्थशास्त्रामध्ये विविध शास्त्रीय घटक तपासण्यासाठी या आराखड्याचा उपयोग केला जातो. एखाद्या घटनेचे स्वरुप, घटनेच्या मुळाशी असणारी कारणे, परिणाम इत्यादी बाबी वस्तुनिष्ठ दृष्टीने शोधून काढण्यासाठी या आराखड्याचा उपयोग केला जातो.

**२) वर्णनात्मक संशोधन आराखडा**

वर्णनात्मक संशोधनात संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विवेचन केले जाते. वैज्ञानिक पध्दती संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय. या आराखड्यात मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, अभिलेख, ही साधने उपयोगात आणली जातात.

**३) निदानात्मक संशोधन आराखडा**

एखाद्या समस्येच्या कारणासंबंधीचे वास्तविक ज्ञान प्राप्त करुन त्या समस्येच्या निराकरणासाठी त्याचा उपयोग करण्यासाठी या आराखड्याचा उपयोग केला जातो.

**४) प्रयोगात्मक संशोधन आराखडा**

प्रयोगात्मक संशोधन आराखड्यात निश्चित व नियंत्रित व्यवस्था निर्माण करुन संशोधन विषयाचे अध्ययन केले जाते. विज्ञान विषयामध्ये या आराखड्याचा उपयोग केला जातो. [४]

सदर अभ्यासाकरिता वर्णनात्मक संशोधन आराखडा उपयोगात आणला आहे. औद्योगिक विकासामध्ये महाराष्ट्रात असणाऱ्या प्रादेशिक असमतोलाचे विश्लेषण करण्यापूर्वी संबंधीत समस्येचे निरिक्षण करुन, तथ्य संकलन करुन वरील समस्येचा शोध घेऊन उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

**३.५ तथ्य संकलन / समंक संकलन :**

संशोधनामध्ये संशोधनविषयाशी संबधित वास्तविक तथ्यांचे व माहितीचे संकलन करणे आवश्यक असते. अशी तथ्ये व माहिती संशोधनाकरिता गोळा करणे म्हणजे समंक संकलन होय. समंक संकलनाच्या दोन पध्दती आहेत त्या पुढीलप्रमाणे-

**प्राथमिक समंक (Primary Data) :**

संशोधन साधनांव्दारे व पध्दतीव्दारे जी तथ्ये व माहिती गोळा करण्यात येते त्यास प्राथमिक समंक असे म्हणतात. यामध्ये प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची इत्यादी प्रमुख संशोधन साधनांव्दारे माहिती गोळा केली जाते.

**१) निरीक्षण :**

निरीक्षण हे संशोधनातील पारंपारिक असे साधन आहे. प्रयोगातील प्रयोज्य हे विविध परिस्थितीत कोणती कृती करतात याची पाहणी करणे म्हणजे निरीक्षण होय.

**२) मुलाखत :**

संशोधन कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या तथ्यांचे संकलन करण्यासाठी संशोधकाने विषयाशी संबंधित व्यक्तींशी किंवा समूहाशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमाने साधलेला सुसंवाद म्हणजेच मुलाखत होय.

**३) प्रश्नावली :**

भिन्न भिन्न व्यक्तींकडून ज्यांची उत्तरे मागविली जातात अशा प्रश्नांची सूची म्हणजे प्रश्नावली होय. प्रश्नावलीच्या माध्यमातून प्रमाणित उत्तरे मिळण्यास मदत होते व त्यांचा उपयोग सारणीयण व सांख्यिकीकरणासाठी केला जातो.

**४) अनुसूची :**

लिखित सूचीला अनुसूची म्हणतात. अनुसूची प्रश्नांची संक्षिप्त यादी असून ती मुलाखत घेणारा संशोधक उत्तरदात्यांना प्रश्न विचारुन स्वतः भरत असतो. किवा माहिती जसजशी मिळते तसतशी ती भरत जातो.

### द्वितीय समंक (Secondary Data) :

जी तथ्ये स्वतः संशोधकाने गोळा केलेली नसून व्यक्ती किंवा संस्था यांच्याव्दारे संकलित केली जातात, त्यांना द्वितीय स्त्रोत म्हणतात. यामध्ये व्यक्तीगत प्रलेख, कागदपत्रे,प्रकाशित व अप्रकाशित प्रलेख, सरकारी व बीन सरकारी संस्थांव्दारे प्रकाशित रेकॉर्ड,आकडेवारी,अहवाल इ.चा समावेश होतो.[५]

## ३.६ नमुना निवड (Sampling):

ज्यावेळी संशोधन क्षेत्रातील एककांची संख्या जास्त असते त्यावेळी त्या एककाचा एक छोटासा गट नमुना म्हणून निवडला जातो. नमुना म्हणजे संपूर्ण समूहाचा निवडलेला एक प्रातिनिधिक गट होय.

**नमुना :**

जेव्हा जनसंख्येतील घटकांचा आकार मोठा असतो तेव्हा त्यातून काही घटकांची नमुना म्हणून निवड करावी लागते.

बोगाड्र्स च्या मते, ‘एका पूर्वनिर्धारित योजनेप्रमाणे कोणत्याही एककाच्या एका समुहातील एक निश्चित प्रतिशत निवडणे होय.’

**३.५.१ नमुना निवड पध्दत :**

नमुना किंवा न्यादर्श निवडीच्या दोन प्रमुख पध्दती आहेत.

**१) संभाव्यतेवर आधारित नमुना :**

जनसंख्येतून न्यादर्शाचे घटक निवडतांना ते निवडले जाण्याची निश्चिती, संभाव्यता ज्या पध्दतीने सांगता येते त्या पध्दतीला संभाव्यता पध्दती म्हणतात. जनसंख्येतून प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ट होण्याची संधी किती प्रमाणात मिळणार आहे हे सांख्यिकीय पध्दतीने संभाव्यता नमुना निवड पध्दतीत मांडता येते.

**२) असंभाव्यतेवर आधारित न्यादर्श :**

ज्या पध्दतीत संशोधक आपल्या व्यक्तीगत निर्णयानुसार जनसंख्येचे प्रतिनिधित्व करु शकणाऱ्या न्यादर्श घटकांची निवड करतो त्याला असंभाव्यता पध्दती म्हणतात. या पध्दतीत संशोधन क्षेत्रातील एककांची संख्या किती आहे हे माहिती नसते आणि त्या प्रत्येक एककाला निवडले जाण्याची शक्यता वा संभाव्यता किती प्रमाणात आहे हे टक्केवारीमध्ये मांडता येत नाही.

संभाव्यता व असंभाव्यता न्यादर्श निवड पध्दतीचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**न्यादर्श निवड पध्दतीचे प्रकार**

**संभाव्यता पध्दती**
**पध्दती**

१) साधा यादृच्छिक नमुना
२) व्यवस्थाबध्द नमुना
३) स्तरीय यादृच्छिक नमुना
४) बहुपदी नमुना
५) गुच्छ नमुना

**असंभाव्यता**

१) सोयीस्कर नमुना
२) स्वयं निर्वाचित नमुना
३) सहेतुक नमुना
४) कोटा नमुना

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांच्या आधारे अध्ययन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रकाशित ग्रंथे, अहवाल, शासकीय दस्ताऐवजांच्या आधारे अध्ययन केले आहे.

तसेच नमुन्याची निवड स्तरीय यादृच्छिक नमुना पध्दतीने केली आहे. स्तरीय किंवा स्तरीत यादृच्छिक नमुना पध्दतीत सामग्रीचे वेगवेगळ्या स्तरांमध्ये विभाजन केले जाते. म्हणून या पध्दतीला स्तरीय यादृच्छिक नमुना निवड असे म्हणतात. या पध्दतीमध्ये नमुना हा समग्राचा पूर्णपणे प्रतिनिधीत्त्व करतो. त्यामुळे निवडलेला नमुना हा प्रतिनिधीक असतो. समान वैशिष्ट्ये किंवा गुणांच्या आधारावर समग्रांचा एककांना विविध उप-विभाग किंवा वर्गात विभाजीत करुन समग्रात एकरुपता आणण्याचा प्रयत्न स्तरीय यादृच्छिक नमुना पध्दतीत केला जातो.[६]

## ३.६ संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्रातील विविध विभागाच्या औद्योगिक विकासामध्ये असमतोल कसा आहे याचा शोध घेणे.

२. हा प्रादेशिक असमतोल औद्योगिक क्षेत्राच्या कोणकोणत्या घटकासंबंधी आहे? याचा सखोल अभ्यास करणे.

३. औद्योगिक विकाससंबंध स्थापित विविध समित्यांनी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे.

४. केंद्र व राज्य सरकारने असमतोल दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

५. योग्य ती उपाययोजना करुनही हा असमतोल दूर न होण्यामागच्या कारणांचा शोध घेणे.

६. जिल्हा व राज्य पातळीवर औद्योगिक विकासाबाबत निर्माण झालेला असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

७. प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरिता विविध पंचवार्षिक योजनांमध्ये करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेणे.

## ३.७ संशोधनाची गृहितके :

संशोधकाला एखादी गोष्ट समस्यावत वाटणे हीच खऱ्या संशोधनाची सुरुवात होण्यामागचे खरे कारण असते. ती गोष्ट किंवा त्याला वाटणारी समस्या ज्याचा तो शोध घेऊ इच्छितो त्याला गृहितके असे म्हणतात. कोणत्याही समस्येचे संशोधकाला वैधानिक पध्दतीने अध्ययन करावे लागते. ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या आधारे संशोधक आपल्या संशोधन विषयासंबंधी सामान्य अनुमान निश्चित करतो. जर संकलीत तथ्याच्या आधारे गृहितकृत्य सत्य होत असेल तर त्या गृहितकृत्याचे रुपांतर सिध्दांतामध्ये होते.

संबंधीत संशोधनाकरीता खालील गृहितके निश्चित केली आहेत.

१. महाराष्ट्रातील विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन भागातील औद्योगिक विकासामध्ये प्रादेशिक असमतोल आहे.

२. पश्चिम महाराष्ट्राचा विकास हा विदर्भाच्या तुलनेने अधिक झालेला आहे.

## ३.८ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनकार्य करीत असतांना अध्ययन सोयीस्कर व्हावे तसेच त्या विषयाचा सखोल अभ्यास करता यावा या दृष्टिकोनातून त्यांच्या मर्यादा निश्चित कराव्या लागतात. म्हणून संशोधन समस्येचे कार्यक्षेत्र निश्चित करणे आवश्यक असते.

महाराष्ट्रातील औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमातोलाचा तुलनात्मक अभ्यास संबंधीत विषयावर संशोधन करण्यात आल्यामुळे संबंधीत विषयाचे संशोधन हे विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रापुरतेच मर्यादित आहे. तथ्यसंकलनाच्या दुय्यम साधनांचा वापर करुन, प्रमाणीत व खरी आकडेवारी गोळा करुन या दोन विभागामध्ये असणाऱ्या औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

१. मर्यादित कालावधी :

संशोधनाचा कालावधी हा मर्यादित असतो. म्हणजेच एका ठराविक कालावधीतच संशोधन पूर्ण करावे लागते त्यामुळे ही संशोधनाची मर्यादा ठरते.

२. गोपनीयता :

संशोधनासाठी मिळविलेली माहिती ही पुर्णपणे गुप्त ठेवावी लागते त्यामुळे बरेचदा ही माहिती गोपनिय ठेवली जाणार नाही या विचाराने माहिती दिली जात नाही व संशोधनात मर्यादा येतात.

३. अचूक माहितीचे संकलन :

संशोधन करीत असतांना अचूक माहिती मिळवावी लागते त्यामुळे बरेचदा अशी अचूक माहिती मिळविण्यात मर्यादा येतात.

४. इतर समस्या-

वेळ, श्रम, पैसा इत्यादी विविध प्रकारच्या समस्या विचारात घेऊनच संशोधकाला संशोधनाचे क्षेत्र व त्याची व्याप्ती निश्चित करावी लागते. योग्य वेळ, श्रम, पैसा यांचा मेळ घालून संशोधन पूर्णत्त्वास जाण्यासाठी संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आधीच निश्चित करावी लागते.

वरील मुद्यांचा मर्यादेत राहून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

## ३.९ संशोधनाचे महत्त्व :

औद्योगिक क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कोणत्याही देशाच्या औद्योगिकरणास अनन्य साधारण महत्त्व असते. भारतासारख्या विकसनशिल देशामध्ये सुध्दा आर्थिक विकास साधण्यासाठी औद्योगिकिकरण अत्यंत आवश्यक आहे.

परंतु औद्योगिक विकास किती झाला ह्या बरोबरच हा विकास सर्वत्र (सर्व भागामध्ये) समान प्रमाणावर झालेला आहे किंवा नाही ह्या ही गोष्टीला अत्यंत महत्त्व आहे. औद्योगिक विकासाबाबत आज प्रत्येक देशामध्ये जागरुकता आहे. त्याला आपले महाराष्ट्र राज्य ही अपवाद नाही. आपल्या महाराष्ट्राचा औद्योगिक विकास समप्रमाणात झालेला नसल्यामुळे म्हणजे काही भाग विकसित तर त्याच बाजूला काही भाग अविकसित (कमी विकसित) ही कमालीची प्रादेशिक विषमता अभ्यासण्याकरिता अनेक अहवाल सादर केलेत. बऱ्याच उपाययोजनाही सुचिविल्या परंतु महाराष्ट्रातील औद्योगिक विकासामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल अजुनही बऱ्याच प्रमाणात दिसून येतो.

औद्योगिक विकासामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विविध पंचवार्षिक योजनांमध्ये निधीच्या वाटपाबाबत अनेक उपाययोजना करुनही हा असमतोल कायमच असल्याचे सरकारी आकडेवारीवरुन स्पष्ट होते. बऱ्याच उपाययोजना करुनही हा असमतोल कमी न होण्यामागच्या कारणांचा शोध घेणे फार आवश्यक आहे.

ह्या विषयाच्या सखोल अभ्यासावरुन व संशोधनावरुन येणाऱ्या निष्कर्षावरुन केंद्र व राज्य सरकारला आपल्या निधींच्या विकासात्मक कार्याच्या वाटपाकरीता, प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरीता निर्णय घेण्यास मदत होईल. तसेच महाराष्ट्रामध्ये विविध प्रदेशाच्या विकासाकरीता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. ही विकास मंडळे आपली कार्य किती कार्यक्षमपणे करतात? त्यांच्या कार्यामध्ये कोणत्या अडचणी येतात? यावर विचार करुन अभ्यास करुन त्या संदर्भात योग्य ते उपाय सुचविता आली आहेत.

**संदर्भ सूची-**


१) घाटोळे प्रा.रा.ना. (२००३)., ‘समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती’., मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. ५.

२) घाटोळे प्रा.रा.ना. (२००३)., ‘समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती’., मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. ५.

३) डॉ.विजय एल.जरारे (२००४)., ‘संशोधन प्रणाली’., अद्वैत प्रकाशन, अकोला, पृष्ठ क्र. ८ ते २२.

४) घाटोळे प्रा.रा.ना. (२००३)., ‘समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती’., मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. ६७ ते ८०.

५) घाटोळे प्रा.रा.ना. (२००३)., ‘समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती’., मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. ६० ते १७३.

# ¯Öú¸üÞÖ 4 £Ö

## ×®Ö¾Ö›ü»Öê»µÖÖ ×¾Ö³ÖÖ¬ÖÖ“Öß ´ÖÖ×ÆüŸÖß


4.1 ¯ÖÃŸÖÖ¾Ö®ÖÖ

4.2 ú¸üÖ»ÖÆü¯Ö¸ü ×•Ö»ÆüÊÖ“Ö †¬µÖµÖ®Ö

4.3 †ú¸üÖ»ÖÖ ×•Ö»ÆüÊÖ“Ö †¬µÖµÖ®Ö

4.4 ¯ÖÖ¤ü×¿Öú ×¾ÖÂÖ´ÖŸÖÖ“Ö ×®Ö¾Ö›üú

×®Ö¤ü¿Öúú“µÖÖ †Ö¬ÖÖ¸ü ŸÖ»Ö®ÖÖŸ´Öú

†¬µÖµÖ®Ö

प्रकरण चौथे

# निवडलेल्या विविध विभागांची माहिती

## ४.१ प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील प्रमुख दोन जिल्ह्यांची निवड केलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने पश्चित महाराष्ट्रातील कोल्हापूर तर विदर्भातील अकोला जिल्हा यांची निवड केलेली आहे.

संशोधनासाठी निवडलेल्या या दोन जिल्ह्यांची माहिती अभ्यासतांना जिल्ह्याची आर्थिक व सामाजिक वैशिष्ट्ये अभ्यासली आहेत. या वैशिष्ट्यामुळे जिल्ह्यांचा परिचय तर होतोच शिवाय जिल्ह्यांची आर्थिक व सामाजिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासता येते.

## ४.२ कोल्हापूर जिल्ह्याचे अध्ययन :

**पार्श्वभूमी :**

कोल्हापूर हा पुरातन व ऐतिहासिक वारसा असणारा जिल्हा आहे. शिवकालिन संस्थान असलेला कोल्हापूर जिल्हा सन १९४९ मध्ये सध्याच्या स्वरूपात भूतपुर्व मुंबई राज्यात विलिन झाल्यानंतर अस्तित्वात आलेला आहे.

**स्थान, व्याप्ती व प्रशासकीय विभाग:**

कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडील नैऋत्य पठारी भागावर उत्तर अक्षांशावर१६°४२' पुर्व रेखांशावर ७४°१५' अंशावर वसला असून जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्रीचा कडा,उत्तरेस वारणा नदी, पुर्वेस अंशत: कृष्णा नदी व दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्हा अशा चतु:सिमा आहेत. कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७४६ चौ.कि.मी. इतके असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या २.५ टक्के आहे. जिल्ह्यातील बारा तालुके चार महसुली उपविभागात विभागले आहेत.

**करवीर उपविभागाखाली** करवीर, पहाळा, शाहूवाडी व कागल हे चार तालुके, **इचलकरंजी उपविभागाखाली** हातकणंगले व शिरोळ, **गडहिंग्लज उपविभागाखाली** गडहिंग्लज, चंदगड, वआजरा व **राधानगरी उपविभागाखाली** भुदरगड, राधानगरी व गगनबावडा हे तालुके समाविष्ट केले आहेत. जनगणना, २०११ नुसार जिल्ह्यामध्ये १२१६ गावे, १३ जनगणना शहरे, कोल्हापूर महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका असून ९ नगरपालिका अस्तित्त्वात आहेत.

**भूप्रदेश, भूस्तरीय संरचना व खनिजे :**

जिल्ह्याचे प्रामुख्याने तीन भूभाग पडतात. पश्चिम भागामध्ये डोंगराळ तांबड्या मातीचा भूप्रदेश, मध्य भागात सुपीक गाळाच्या जमिनी चा भूप्रदेश व पूर्व भागात मध्यम व काळ्या मातीचा भूप्रदेश येतो. पश्चिम भागात शाहूवाडी, गगनबावडा, राधानगरी, भूदरगड, आजरा व चंदगड हे तालुके, मध्य भागात करवीर, कागल तर पूर्व भागात हातकणंगले व शिरोळ हे तालुके येतात. भोगावती, कुंभी, कासारी, पंचगंगा, हिरण्यकेशी व वेदगंगा या नद्यांच्या काठाची जमीन सुपीक व गाळाची आहे. जिल्ह्याचे भूस्तरीय संरचनेनुसार प्रमुख तीन भाग पडतात. अतिप्राचीन केब्रीया पूर्व काळातील खडक मध्यजीव महाकल्प ते तृत्विक या कालखंडातील खडक व अलीकडील चतुर्थ काळातील खडक असे तीन भाग आढळतात. पश्चिमेकडील डोंगराळ भाग हा तांबड्या मुरमाड खडकांचा तर पूर्वेकडील भूभाग कठीण काळ्या खडकाचा आहे. जिल्ह्यात बॉक्साईट व ॲल्युमिनियमचे साठे विपूल प्रमाणात आहेत. सदर धातू प्रामुख्याने शाहुवाडी व राधानगरी या तालुक्यात सापडतो. जिल्ह्यात बेसॉल्ट खडक मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे.

**नद्या :**

जिल्ह्यातून प्रामुख्याने कृष्णा, वारणा, पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी व घटप्रभा या नद्या वाहतात. कृष्णा नदी ही जिल्ह्याच्या ईशान्य पूर्व सिमेवरून तर वारणा, पंचगंगा, दूधगंगा आणि हिरण्यकेशी या नद्या वायव्येकडून

आग्नेयेकडे वाहतात. वारणा नदी सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या सीमेवरून १२० कि.मी. पर्यंत वाहते.

जिल्ह्यातील कासारी, कुंभी, तुळशी व भोगावती या उपनद्या पंचगंगा नदीस मिळाल्या आहेत. जिल्ह्याच्या दक्षिण भागात दूधगंगा ही प्रमुख नदी असून वेदगंगा ही तीची उपनदी आहे. पंचगंगा नदी नृसिंह वाडीजवळ व दूधगंगा नदी जिल्हा सीमेबाहेर थोड्याच अंतरावर कृष्णा नदीस मिळतात. तिलारी ही दक्षिणेकडील एकच नदी पश्चिम वाहिनी नदी आहे.

**पर्जन्य, हवामान आणि वनसंपदा :**

जिल्ह्याच्या पश्चिमेकडील सह्याद्री पर्वतरांगामध्ये दाट झाडी असून तेथे पर्जन्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे तेथाल हवामान थंड आहे. पश्चिमेकडून पुर्वेकडे पर्जन्याचे प्रमाण कमी-कमी होत जाते. त्यामुळे पश्चिमेकडील गगपबावडा, राधानगरी, चंदगड व आजरा या तालुक्यात पर्जन्यमान जास्त तर पुर्वेकडील शिरोळ व हातकणंगले तालूक्यात पर्जन्य प्रमाण कमी आढळते. सन २०११-१२ मध्ये सर्वात जास्त म्हणजेच ७०७७ मि.मी. गगनबावडा तालुक्यात तर सर्वात कमी २७२ मि.मी. पाऊस शिरोळ तालुक्यात झाला आहे.

जिल्ह्यात मुख्यतः पश्चिमेकडील जास्त पावसाच्या भागात हिरडा, ऐन, जांभूळ, दालचिनी, साग इत्यादी वृक्ष आहे. कमी उंचीवरील परंतू जास्त पावसाच्या प्रदेशात चंदा, सिसव, किंजळ, पानबाभूळ, खैर, बांबू इत्यादी तर पुर्वेकडील कमी पावसाच्या प्रदेशात बाभळी, बोरी व तडवळ सारखी खुरटी व काटेरी झुडपे आढळतात. त्याचप्रमाणे जिल्ह्यात कुडा, वाकेरे, भरंग, बावडिंग, सातवी, धावरी, बिब्बा, वाव्हा, भुईकोहला इत्यादी औषधी वनस्पती ही आहेत. जिल्ह्यामध्ये १८.२३ टक्के भूभागावर वन क्षेत्र आहे. सन २०११-१२ मध्ये वन उत्पादनाच्या विक्रिपासून शासनास रु. ९६.५७ लाख उत्पन्न मिळाले आहे.

**धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळे :**

कोल्हापूर जिल्ह्यात अनेक तिर्थक्षेत्रे व ऐतिहासिक स्थळे आहेत. त्यात प्रामुख्याने कोल्हापुर शहरातील श्री. महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा तालुक्यातील ज्योतीबा मंदिर, शिरोळ तालुक्यातील नृसिंहवाडी येथील दत्तमंदिर, खिद्रापुर येथे महादेवाचे मंदिर तर हातकंणगले येथील बाहुबली मंदिर ही ठिकाणे प्रसिद्ध आहेत.

जिल्ह्यात पन्हाळगड, विशाळगड, भुदरगड, सामान गड हे शिवकालीन किल्ले आहेत. शहरामध्ये जुना राजवाडा व वस्तुसंग्रहालय ही ऐतिहासिक ठिकाणे आहेत. पन्हाळा हे थंड हवेचे ठिकाण असून राधानगरी येथील धरण व दाजीपुर येथील गवा अभायरण्य प्रसिद्ध आहे. जिल्ह्यामध्ये पर्यटन स्थळांचा योजनाबद्ध विकास करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने जिल्ह्यातील ८ पर्यटन स्थळांना **ब** वर्ग तर ६२ स्थळांना **क** वर्ग म्हणून मान्यता दिलेली आहे.

**लोकसंख्या :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३८.७४ लाख असून २००१ च्या तुलनेत ९.९६ टक्क्यांनी लोकसंख्येत वाढ झालेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात स्त्री-पुरूष प्रमाण ९५३ असले तरी ० ते ६ वयोगटामधील हेच प्रमाण ८४५ इतके कमी आहे. तथापी २००१ ते २०११ या दशकामध्ये कोल्हापूर जिल्ह्यात स्त्री-पुरूष प्रमाणात ४.२२ टक्क्यांनी व ० ते ६ वयोगटामधील ७.१५ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

**वहित धारणा :**

कृषी गणना २०००-०१ प्रमाणे जिल्ह्यात ६.०७ लाख वहित खातेदार असून त्यांचे एकूण क्षेत्र ४.६९ लाख हेक्टर इतके होते. मागील कृषी गणनेच्या तुलनेत खातेदारांची संख्या १४ टक्क्यांनी वाढली असून वहिती क्षेत्र मात्र ०.७५ टक्क्यांनी कमी झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारच्या खातेदारांनी धारण केलेले सरासरी क्षेत्र फक्त ०.७९ हे. एवढे राज्यात सर्वात कमी असून ते

राज्याच्या १.६६ हे. पेक्षा ५० टक्यांपेक्षा कमी आहे. एकूण खातेदारांपैकी १४ टक्के खातेदार पूर्ण ओलिताखालील, ५८ टक्के पूर्ण जिरायत तर २८ टक्के खातेदार अंशत: ओलिताखालील जमीन धारण करीत होते.

**जमिनीचा वापर, मुख्य पिके व त्याखालील क्षेत्र:**

सन २००२-०३ च्या आकडेवारीसार जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रांपैकी १८ टक्के जंगलव्याप्त, १० टक्के शेतीला उपलब्ध नसलेले, १३ टक्के लागवड न केलेले व पडीक तर निव्वळ कसलेले क्षेत्र ५९ टक्के इतके होते. जिल्ह्यात सन २००१-०२ मध्ये प्रामुख्याने एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी तृणधान्याखाली ३० टक्के क्षेत्र होते.

जिल्ह्यात सन २०११-१२ या वर्षी ३१५ हजार मे.टन रासायनिक खतांचे वाटप करण्यात आले असन सन २०१०-११ च्या तुलनेत रासायनिक खतांचे वाटप ८ टक्क्यांनी कमी प्रमाणात झाले आहे. सन २००१-०२ च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी २३ टक्के क्षेत्र ओलीताखाली असून निव्वळ ओलीताखालील क्षेत्रापैकी ३८ टक्के क्षेत्र पृष्ठभागीय उपसासिंचानाव्दारे व उर्वरित ६२ टक्के क्षेत्र विहीरीद्वारे ओलीताखाली आणले आहे. ओलीताखालील क्षेत्रापैकी ९ टक्के क्षेत्र अन्नधान्याखाली, ७२ टक्के ऊसाखालील तर उर्वरित क्षेत्र इतर पिकाखालील आहे.

**कृषी उत्पादन साठवणूक व पणन :**

जिल्ह्यात कोल्हापूर, जयसिंगपूर, वडगांव व गडहिंग्लज या चार नियंत्रित बाजारपठा असून बाजार समित्यांनी कृषी उत्पादन साठवणुकीची सोय आहे. या बाजारपेठेत प्रामुख्याने तांदूळ, गूळ, भुईमूग, ज्वारी, गहू व मिरची या पिकांची मोठ्याप्रमाणावर आवक होते. कोल्हापूर बाजारपेठ गुळासाठी, जयसिंगपूर व वडगांव भुईमूग व सोयाबीनसाठी आणि गडहिंग्लज ज्वारी व मिरचीसाठी प्रसिध्द आहे. सन

२०११-१२ मध्ये जिल्ह्यातील चार कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आवक झालेल्या कृषी मालाचे मूल्य रु. ४२५.६८ कोटी होते.

**सिंचनाच्या सोयी :**

सन २०११-१२ अखेर जिल्ह्यात राधानगरी, तुळशी, दूधगंगा व वारणा हे मोठे पाटबंधारे प्रकल्प कार्यरत आहेत. तसेच जिल्ह्यात १२ मध्यम पाटबधारे, ८४ लघु सिंचनप्रकल्प, १४७ पाझर तलाव व २५ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पुर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील ४ मोठ्या प्रकल्पांचे १.३४ लाख हेक्टर तर मध्यम प्रकल्पांचे ०.९६ लाख एवढे लाभक्षेत्र आहे.

**पशुधन, पशुधन उत्पादने व पशुवैद्यकिय सुविधा :**

पशुगणना २००७ च्या अस्थायी आकडेवारीनुसार जिल्ह्यात १३.३१ लाख इतके पशुधन आहे. त्यापैकी गायी/बैल २१ टक्के, म्हैस/रेडे ५० टक्के, मेंढ्या १२ टक्के, शेळ्या १४ टक्के आहेत. सन २००७ च्या पशुगणनेनुसार कुक्कूट पक्षांची संख्या ९.६५ लाख आहे.

जिल्ह्यात सन २०११-१२ मध्ये ४३४० संस्थांमार्फत २४५८ लाख लीटर दूध संकलन झाले आहे. जिल्ह्यात दूध संकलनाच्या सोईसाठी ५ शीतगृहे कार्यरत असून त्यांची क्षमता ४.२५ लाख लिटर्स इतकी आहे. जिल्ह्यात सन २०११-१२ अखेर ७ पशु सर्वचिकित्सालय, ८९ पशुवैद्यकिय दवाखाने, ७९ पशुप्रथमोपचार केंद्रे, १ कृत्रिम रेतन केंद्रे, १७५ कृत्रिम रेतन उपकेद्रांमार्फत पशुउपचाराचे कार्य केले जात आहे.

**विजेचा वापर :**

सन २०११-१२ मध्ये विजेचा वापर ३२१९ दशलक्ष किलोवॅट तास इतका झाला असून संदर्भ वर्षाअखेरीस कनेक्शन्सची संख्या ८.७६ लाख इतकी आहे. सन २०१०-११ च्या तुलनेत विजेचा एकूण वापर ८.०१ टक्क्यांनी वाढलेला असून सदरची वाढ ही प्रामुख्याने घरगुती व (व्यापारी, औद्योगिक, कृषि सोडून) इतर

क्षेत्रामध्ये जादा वीज वापरामुळे झाली आहे. सन २०११-१२ मध्ये जिल्ह्यात दरडोई विज वापर ८२७ कि.वॅ.तास इतका असून तो मागील वर्षाच्या ७६५ कि.वॅ.तास पेक्षा जास्त झाल्याचे दिसून आले आहे.

औद्योगिक क्षेत्राच्या विकासात वीज वापराचे विशेष महत्त्व असून प्रादेशिक असमतोलाचे विवेचन करतांना दांडेकर यांनी देखील वीज वापराच्या आधरावर असमतोलाचे मापन केले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील वीजेच्या वापराच्या आधारे हा असमतोल अभ्यासता येतो तो पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्र.४.१**

**कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील वीजेचा वापर**

**(वीज वापर हजार कि.वॅ.तास)**

| अ.क्र. | औद्योगिक क्षेत्रातील वीजेचा वापर | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| २०००-०१ | ७९४३९३ | १३.९० |
| २००९-१० | १२६६८४४ | २२.१६ |
| २०१०-११ | १९७८५४१ | ३४.६१ |
| २०११-१२ | १६७६८६६ | २९.३३ |
| **एकूण** | **५७१६६४४** | **१००.००%** |

**(स्त्रोतः जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१२, कोल्हापूर जिल्हा )**

वरील तक्त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील वीजवापराची स्थिती अभ्यासली आहे. सन २०००-०१ मध्ये जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील वीज वापर हा १३.९० प्रतिशत होता हा वापर सन २०१०-११ पर्यंत वाढत जाऊन ३४.६१ प्रतिशत झाला तर सन २०११-१२ मध्ये हा वापर थोड्याफार प्रमाणात कमी होऊन २९.३३ प्रतिशत म्हणजेच कमी झालेला आढळून येतो.

एकंदरीत कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील वीजेच्या वापरात उच्चावचने झालेली आढळतात. असे असले तरी औद्योगिक क्षेत्राचा मात्र विकास झालेला आढळून येतो.

**उद्योग :**

जिल्ह्यात कोल्हापूर व इचलकरंजी येथे मोठ्याप्रमाणावर औद्योगिकरण झाले आहे. इचलकरंजी हे कापड निर्मितीचे केंद्र असून कोल्हापूर येथे कृषी अवजारे, यंत्रमाग, हातमाग, कुटीर उद्योग कार्यरत आहेत. जिल्ह्यात शिरोली, गोकुळ शिरगांव, इचलकरंजी, जयसिंगपूर, कोल्हापूर शहरात उद्यमनगर येथे औद्योगिक वसाहती स्थापन झाल्या असून कागल येथे पंचतारांकित औद्योगिक वसाहत कार्यरत झाली आहे. तसेच हुपरी येथे सोन्या -चांदीचे मोठ्याप्रमाणात तयार करण्यात येत असल्याने तेथेही औद्योगिक वसाहत स्थापन केली आहे.

जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची ७ क्षेत्रे असून त्यामध्ये २८४३ औद्योगिक घटक कार्यरत आहेत. तसेच जिल्ह्यामध्ये ६ सहकारी औद्योगिक वसाहती आहेत. जिल्ह्यात १८ सहकारी व ३ खाजगी साखर कारखाने असे एकूण २१ साखर कारखाने कार्यरत असून २०११-१२ मध्ये १०६.५० लाख टन ऊसाचे गाळप करून १३४.९५ लाख मे.टन साखर उत्पादन झाले आहे.

**वाहतूक व दळणवळण :**

सन २०११-१२ अखेर जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी (न.प.हद्दीतील रस्त्यासह) ९३७९ कि.मी. होती. त्यापैकी ६९.०४ टक्के रस्ते सिमेंट/डांबरी असून ११.४६ टक्के खडीचे रस्ते व १९.५० टक्के रस्ते इतर माल वापरून तयार करण्यात आलेले आहेत. सन २०११-१२ अखेर जिल्ह्यात ८.०१ लाख वाहने वापरात होती. यामध्ये सर्वात जास्त म्हणजे ७७.५७ टक्के वाहने दुचाकी आहेत.

**शाळा, महाविद्यालये :**

**अ) शालेय शिक्षण**

सन २०११-१२ अखेर जिल्ह्यात २५७४ प्राथमिक, ८५८ माध्यमिक १९२ उच्च माध्यमिक शाळा होत्या. प्राथमिक शाळेतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ७१% विद्यार्थी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण घेत होते, तर माध्यमिक शाळेतील ९३% विद्यार्थी खाजगी अनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेत होते. प्राथमिक शाळेत प्रति शिक्षक विद्यार्थी संख्या २६ होती तर माध्यमिक व उच्चमाध्यामिक संस्थांमध्ये हीच संख्या २९ एवढी होती.

**ब) उच्च शिक्षण**

सन २०११-१२ च्या माहितीनुसार जिल्ह्यात सर्वसाधारण उच्च शिक्षणाच्या ५३ महाविद्यालये कार्यरत आहेत व त्यामध्ये ५१३७१ विद्यार्थी शिकत होते.

**वैद्यकिय व सार्वजनिक आरोग्य :**

सन २०११-१२ अखेर जिल्ह्यात २८ रूग्णालये, ६३ दवाखाने, ४ प्रसूतीगृहे, ७२ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. या संस्थांतील खाटांची संख्या २१९५ इतकी असून संदर्भ वर्षात १.५० लाख आंतररूग्ण व २०.५१ लाख बाह्य रुग्णांवर उपचार केले आहेत. प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार २०११ मध्ये ५९३०१ जन्म व २४९२३ मृत्यू नोंदले गेले आहेत.

**जिल्हा उत्पन्न अंदाज सन २०१०-११**

सन २०१०-११ च्या प्रारंभिक अंदाजानुसार चालू किंमतीनुसार जिल्ह्यातील सरासरी दरडोई उत्पन्न रु. ८४०९५ एवढे असून ते राज्याच्या दरडोई उत्पन्नापेक्षा (रु. ८७६८६) कमी आहे. दरडोई उत्पन्नाचा विचार करता राज्यामध्ये जिल्ह्याचा ८ वा क्रमांक लागतो. वाढीचा वेग विचारात घेता सन २००४-०५ ते २०१०-११ या काळात सन २००४-०५ च्या स्थिर किंमतीनुसार राज्य उत्पन्नामध्ये टक्के

१०.१६ वार्षिक चक्रवाढ वृध्दीदराने वाढ झाली तर जिल्ह्यामध्ये हीच वाढ १०.३८ टक्के एवढी नोंदविली गेली आहे.

जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अचूक अंदाज करण्यासाठी प्रदेशाला संचयीत करणारे उत्पन्न ही संकल्पना वापरणे योग्य असले तरी, जिल्हास्तरावरील आर्थिक उलाढालीचा परिणाम जिल्ह्यापुरताच मर्यादित राहत नसल्याने संबंधीत जिल्ह्याला बाहेरून प्राप्त होणारे व संबंधीत जिल्ह्यातून बाहेर जाणाऱ्या उत्पन्नाचे मोजमाप करणे शक्य नसल्याने सदर पद्धतीचा वापर करता येत नाही. त्यामुळे उत्पन्न स्त्रोतपद्धती (Income originating approach ) या संकल्पनेचा अवलंब करून जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार केलेले आहेत. जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याकरीता लागणारी मुलभूत माहिती अजूनही समाधानकारकरीत्या उपल्बध नाही.

प्राथमिक क्षेत्राकरीता बहुतांश आकडेवारी उपलब्ध आहे.मात्र इतर क्षेत्राकरीता आकडेवारी अतिशय अल्पशा प्रमाणात उपलब्ध आहे. ज्या क्षेत्राकरीता जिल्हास्तरावरील आकडेवारी उपलब्ध नाही, त्या क्षेत्राकरीता जिल्हावार अनुरूप असे निर्देशांक वापरून त्या आधारे राज्यस्तरावरील उत्पन्नाची जिल्ह्यामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव,अनुरूप निर्देशांकाचा वापर तसेच पध्दतीमधील अंगभूत उणीवा या सर्वांमुळे जिल्हाउत्पन्नाचे अचूक अंदाज बांधण्यामध्ये मर्यादा येत असल्याने, हे अंदाज ढोबळमानाने जिल्ह्यातील उत्पन्नाची पातळी आजमाविण्याकरीता वापरावेत. या प्रकाशनात प्रकाशीत केलेले जिल्हा उत्पन्नाचे अंदाज वापरताना वरील मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.

**४.३ अकोला जिल्ह्याचे अध्ययन :**

संशोधन क्षेत्र असलेला अकोला जिल्हा हा पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यापैकी एक आहे. महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे व ६ विभाग आहेत. या सहा विभागामध्ये असलेला अमरावती विभाग हा पश्चिम विदर्भ या नावाने ओळखला जातो. या पश्चिम विदर्भात अनुक्रमे अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा आणि वाशीम

या जिल्ह्यांचा समावेश होतो.  पश्चिम विदर्भ हा महाराष्ट्रातील विदर्भातील एक विभाग म्हणून मानला जातो.  एका आख्यायिकेनुसार या दक्षिण पथातील एका भूभागावर राजश्री यादवाचा पुत्र विदर्भ याने विदर्भ या नावाने नगराची स्थापना केली. यानगरीला राजधानी बनवून विदर्भाने सभोवतालच्या भूभागावर राज्य केले. अशाप्रकारे हा भूभाग विदर्भ या नावाने ओळखला जातो.

विदर्भातील एक भाग म्हणून वऱ्हाड (पश्चिम विदर्भ) संबोधला जातो. या वऱ्हाडातील अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा व वाशीम हे पाच जिल्हे आहेत.  याबाबत दंतकथाही वऱ्हाडात प्रचलित असून श्रीकृष्णाच्या लग्नात जी वऱ्हाडी मंडळी आली होती त्यांना ज्या भूभागावर ठेवण्यात आले होते.  त्या भूभागावर लग्नानंतर परत न जाता तिथेच स्थायी झाले. म्हणून या भूभागाला वऱ्हाड असे म्हणतात.

विदर्भाला प्राचीन पंरपरा लाभलेली आहे.  चंद्रपूर जिल्ह्यात सापडलेल्या ऐतिहासिक अवशेषावरून अगदी ऐतिहासिक काळात अश्मयुगात या प्रदेशात वस्ती होती.  असा निष्कर्ष काढला गेला आहे. रामटेक येथील श्री.राम मंदीर हे दर्शविते की, श्रीरामचंद्राच्या पुनीत स्पर्शाने ही भूमी पावन झाली होती.  प्राचीन बौध्द स्तूप, बौध्द धर्माच्या उन्नयनाची ग्वाही देतात.  गुप्त कालात पूर्व विदर्भात वाकाटक साम्राज्य नांदले, गोंड राजानंतर भोसले राजघराण्याने फार मोठ्या भागावर अधिपत्य गाजवले.  याच तऱ्हेने पश्चिम विदर्भाला सुध्दा तशीच परंपरा आहे. अमरावतीचे अंबामातेचे मंदीर श्रीकृष्णाच्या रूक्मिणीहरणाचे स्मरण करून देते. अल्लाउद्दिन खिलजी दक्षिणेत एलिचपूरमार्गे गेला व अनेक ठिकाणी लष्करी ठाणी ठेवून गेला.  पुढे हा प्रदेश मोगलांच्या ताब्यात पर्यायाने निजामाच्या ताब्यात आला.

संस्कृत साहित्यक्षेत्रात वैदर्भीरीती वाखाणली गेली आहे. कालीदासाने मेघदूतातल्या आपल्या नायकाला रामटेकच्या रामगिरी पर्वतावर बंदिस्त असल्याचे दाखवून मेघाला तेथून अलकापुरीपर्यंत प्रवास घडवला आहे.  भवभूमी व भास ही संस्कृत साहित्यरत्ने विदर्भाचीच आहेत.  विदर्भ साहित्य संघाच्या सन १९२६ च्या

हैद्राबाद येथील संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना भारताचार्य चि.वि.वैद्य यांनी असे सांगितले की, प्राचीन महाराष्ट्राचे विदर्भ, महाराष्ट्र व अपरान्त असे पूर्व मध्य-पश्चिम भाग होते. या महाराष्ट्रात यादव राजांनी प्रभुत्व गाजवले अपरन्तात शिलाहार, चालुक्य राजे होते.

ब्रिटीश अंमलात पूर्व विदर्भ भोसल्याकडून व पश्चिम विदर्भ निजामाकडून हस्तगत केला. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत हा सर्व प्रदेश मध्यप्रांत वऱ्हाड या नावाने ज्ञात होता. विदर्भ हा निजाम राज्याचा भाग होता. सन १८५३ मध्ये ईस्ट इंडीया कंपनीला हैद्राबाद येथील असलेल्या सैन्य तुकडी प्रित्यर्थ झालेल्या कर्जापोटी व भावी निर्वाहासाठी विदर्भ निजामाकडून सुपूर्द करण्यात आला. विदर्भ राज्याचा भाग असलेला विदर्भ दोन भागात दक्षिण विदर्भ व उत्तर विदर्भ जो बालाघाट म्हणून ओळखला जात होता. त्याचे मुख्यालय हिंगोली येथे होते. उत्तर विदर्भाचे मुख्यालय बुलडाणा येथे होते. सन १८५७ मध्ये हिंगोली व आसपासचा भाग निजामाला परत देण्यात आला. आणि वऱ्हाड प्रातांची पुनर्रचना करण्यात आली. पूर्व वऱ्हाडाचे मुख्यालय अमरावती तर पश्चिम वऱ्हाडचे मुख्यालय अकोला येथे ठेवण्यात आले.

सन १८५३ पासून पश्चिम विदर्भ हा बेरार नावाने प्रसिध्द होता. ह्यावर हैद्राबादच्या निजामाची सत्ता होती. सन १९०३ मध्ये निजामाने ब्रिटीश सरकारला वार्षिक २५ लाख रूपये भाडेपट्टी कराराद्वारे बेरारची सत्ता दिली. या बेरार विभागाचे सन १९५६ पासून अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा असे चार जिल्हे करण्यात आले. सन १९९८ ला अकोला जिल्ह्यातून वाशीम जिल्हा वेगळा करण्यात आला. अशारीतीने सध्या महाराष्ट्र राज्याचा भाग असलेल्या विदर्भ विभागाचे अकरा जिल्हे आहेत. त्यापैकी पश्चिम विदर्भात म्हणजेच अमरावती विभागात अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलडाणा असे पाच जिल्हे आहेत. यापैकी अकोला जिल्ह्यांचे भौगोलिक, ऐतिहासिक अध्ययन पुढीलप्रमाणे करता येते.

**अकोला जिल्ह्याचा ऐतिहासिक परिचय-**

अकोला जिल्हा ऐतिहासिक वास्तुंनी भरपूर असून जिल्ह्यातील सातही तालुक्यांना ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. ती पुढीलप्रमाणे अभ्यासता येते.

मोर्णा नदीच्या काठावर वसलेले अकोला विर्दभातील महत्त्वाचे शहर म्हणून सर्वदूर परिचित आहे. पांढऱ्या शुभ्र कापसाची निर्मिती करून कॉटनसीटी म्हणून प्रसिद्ध पावलेले, अंधश्रद्धेविरूद्ध आयुष्य खर्ची घालणारे संत शिरोमणी गाडगे बाबा यांची कर्मभूमी, स्वातंत्र्य लढ्यात मोलाचे योगदान देणाऱ्या विदर्भकेसरी ब्रिजलाल बियाणी यांच्या वास्तव्याने पूनीत झालेली तसेच परम महासंगणकाची निर्मिती करून संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या विजय भटकरांची जन्मभूमी म्हणून अकोला हा तालुका चितपरिचित आहे. अकोलसिंहाच्या नावाच्या रजपूत राजाने अकोला शहर वसविल्याचे सांगितले जाते. नरनाळ्याच्या सुभ्याचा अकोला हा एक परगणा असल्याचा उल्लेख ऐन-ई-अकबरी मध्ये आढळतो. औरंगजेब कालीन असदखान यांचे शिलालेख आजही अकोला येथे आढळतात.

मुघल सम्राट औरंगजेबाने अकोला हे शहर १६९७ ला आपला दिवान असदखान यास बक्षीस म्हणून दिले होते. असदखानने अकोला शहराच्या चारही बाजुंनी संरक्षणासाठी भिंत बांधली तसेच ३ बुरूज बांधले. या तीन बुरूजांपैकी असदबुरूज सर्वात मोठा असल्यामुळे त्यास असदगड किल्ला म्हणतात. १८५३ मध्ये इंग्रजांनी अकोला हे शहर निजामांकडून आपल्या ताब्यात घेतले. १८६८ पासून अकोला शहरात नगरपालिका अस्तित्वात आली. तिचे १ आक्टोंबर २००१ मध्ये महानगरपालिकेत रूपांतर झाले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्यांची निर्मिती झ ाल्यानंतर अकोला हा महाराष्ट्राचा स्वतंत्र जिल्हा म्हणून नावारूपास आला. **१ जुलै १९९८** मध्ये अकोला जिल्ह्याचे विभाजन करून वाशिम जिल्हा वेगळा करण्यात आला.

अकोला शहराच्या निर्मिती सबंधी प्रचलीत अशी एक आख्यायिका आहे, ती विचारात घेतल्यास अकोला शहराच्या नैऋत्येस १२ कि.मी. अंतरावर असलेल्या **कान्हेरी** खेड्यानंतर अकोला शहर वसलेले असावे असे मानावे लागते.

कान्हेरी येथे अकोलसिंह नावाचा एक शुरवीर सरदार राहत होता. त्याची पत्नी महादेवाची भक्त होती. कान्हेरीपासून बऱ्याच अंतरावर घनदाट अरण्य होते. (आज येथे राजराजेश्वर मंदीर आहे तो परिसर) या घनदाट अरण्यातील शिवमंदिरात अकोलसिंहाची पत्नी दररोज मध्यरात्र उलटल्यानंतर तेथील महादेवाच्या पिंडाची पूजा करण्यात जात असे. अकोलसिंहाला आपल्या पत्नीच्या चारित्र्याचा संशय आला. एका रात्री पत्नी घराबाहेर पडल्यानंतर सरदार अकोलसिंह हातात तलवार घेवून आपल्या पत्नीच्या पाठलागावर निघाला. पतीला आपल्या चारित्र्याचा संशय आला हे पाहून अकोलसिंहाच्या पत्नीला अतिशय दुःख झाले. तिने मनोमन महादेवाची प्रार्थना केली व धरती मातेने आपल्याला उदरात सामावून घ्यावे अशी इच्छा प्रकट केली, तोच प्रचंड कडकडाट झाला, शिवलिंग दुंभगले आणि अकोलसिंहाच्या पत्नीने त्यात उडी घेतली. पश्चातापद्ग्ध अकोलसिंहाने आपल्या पत्नीला वाचविण्याचा बराच प्रयत्न केला पण तिने परिधान केलेल्या पैठणीचा पदर तेवढा त्यांच्या हातात आला. सरदार अकोलसिंहाला या घटनेने वैराग्य आले. कान्हेरीला परत न जाता त्याने शिवलिंगाजवळ राहून शिवभक्तीत आयुष्य घालविले. पुढे इतरही लोक त्याच्या सोबतीला येऊन राहिले. व अशाप्रकारे तयार झालेल्या वस्तीला **अकोला** हे नाव रूढ झाले.

### स्थानिक व भौगोलिक वैशिष्ट्ये-

अकोला जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मध्य पूर्वेकडे वसलेला आहे. हा जिल्हा उत्तर अक्षांश २०.१७ ते २१.१६ आणि पूर्व रेखांश ७६.७ ते ७७.४ चे दरम्यान वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेला गाविलगडचे डोंगर असून पूर्वेकडे अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव, दर्यापूर व नांदगाव खंडेश्वर तहसील व वाशीम जिल्ह्यातील कारंजा तहसील आहे. दक्षिण बाजूला वाशीम जिल्हा आणि पश्चिमेस बुलढाणा जिल्हा आहे.

**क्षेत्र व प्रशासकीय विभाग**

अकोला जिल्ह्याचे क्षेत्रफळ ५४२८ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या १.७६% आहे. अकोला जिल्ह्यामध्ये अकोला तहसीलचे क्षेत्रफळ सर्वात जास्त म्हणजे १०३७ चौ.कि.मी. असून तेल्हारा तहसीलचे क्षेत्रफळ सर्वात कमी म्हणजे ६२८ चौ.कि.मी. आहे. अकोला जिल्ह्यामध्ये तेल्हारा, आकोट, बाळापूर, अकोला, मूर्तिजापूर, पातूर, बार्शिटाकळी अशा ७ तालुक्यांचा समावेश होतो. जिल्ह्यात अकोला येथे अकोला शहर महानगरपालिकेची स्थापना दि. १/१०/२००१ रोजी करण्यात आली सध्या जिल्ह्यात १ महानगरपालिका, ५ नगरपालिका, आणि ७ पंचायत समित्या आहेत. २००१ च्या जनगणनेप्रमाणे ८६२ वस्ती असलेली व १३६ ओसाड गावे आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय अकोला येथे आहे.

**नैसर्गिक रचना-**

अकोला जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागात सातपुडा पर्वताच्या रांगापैकी काही भाग आहे. त्याला गाविलगडचे डोंगर असे म्हणतात. जिल्ह्याचा मध्य भाग सपाट असून अंजिठा पर्वतरांगाचा काही भाग पातूर तालुक्यात आहे. पूर्णा ही नदी जिल्ह्याची प्रमुख नदी आहे.

**हवामान व पर्जन्यमान-**

अकोला जिल्ह्याचे हवामान अत्यंत विषम आहे. उन्हाळ्यात फार जास्त तापमान राहते. मे महिन्यांचे उष्णतामान ४५ ते ५० डिग्री सेंटीग्रेड पर्यंत वाढते. तसेच हिवाळ्यात उष्णतामान साधारण डिसेंबर मध्ये सर्वात कमी म्हणजे ८ ते १० डिग्री सेंटीग्रेड उतरते.

**भूगर्भीय रचना-**

अकोला जिल्ह्याचे क्षेत्र मुख्यतः दख्खन बस्तर लाव्हा या प्रकारच्या खडक प्रकारात मोडते. अशा जमिनीला सुपिक जमीन असे समजतात. अकोला

जिल्ह्याच्या भूगर्भामध्ये विशेष उल्लेख करण्यासारखी खनिजे किंवा त्यासारखे पदार्थ आढळून येत नाहीत.

**नद्यांची रचना-**

पूर्णा नदी आकोला जिल्ह्यातील वरदायनी असून उत्तर भागाची सर्वात मोठी नदी आहे. ती पुढे तापी नदीला मिळते. त्यामुळे या नदीच्या खोऱ्याला पूर्णा घाट असेही म्हणतात. अकोला जिल्ह्यातील मुख्य नदी पूर्णा असून तिचे उगमस्थान मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यात आहे. पुढे ही नदी अमरावती जिल्ह्यातून वाहत येवुन मूर्तिजापूर तालुक्यात प्रवेश करते. या नदीस दक्षिणेला पेढी, मोर्णा. काटेपूर्णा, निर्गुणा, मन या उपनद्या मिळतात. या उपनद्यांपैकी काटेपूर्णा ही सगळ्यात मोठी उपनदी आहे. काटेपूर्णा नदीचे उगमस्थान वाशीम जिल्ह्यात आहे. पूढे ही नदी अकोला व मुर्तिजापूर तालुक्यात वाहत जावून नंतर पून्हा अकोला तालुक्यातील सांगवी या गावाजवळ पूर्णा नदीस मिळते. तसेच या जिल्ह्याच्या नैऋत्य भागातून अरुणावती व मस या नद्या वाहतात. या जिल्ह्यात एकही मोठा नैसर्गिक तलाव नाही. फक्त एकबुर्जी. महान, मोर्णा या सिंचन तालुक्यातील महान येथील जलाशय सर्वात मोठा व प्रेक्षणीय आहे.

**जमीन**

अकोला जिल्हा मुख्यतः मध्यम काळी, काळी कसदार, व हलकी जमीन या जमिनीच्या तीन प्रकारात मोडतो. जिल्ह्यातील बहुतेक जमीन तुलनात्मकदृष्ट्या चांगल्या प्रतीची आहे. जिल्ह्यातील पूर्णाघाट या नावाने ओळखले जाणारे क्षेत्र मुख्यतः उत्तर भागात पसरलेले असून तेथे काळी कसदार जमीन आहे.

**वने -**

जिल्ह्यात एकूण वनक्षेत्र ४६८ चौ.कि.मी. असून ते जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ८.६२% आहे. सर्व वनक्षेत्र पूर्णतः वनविभागाच्या अधिकाराखाली

आहे. वरील वनक्षेत्रापैकी राखीव वनक्षेत्र ४५२ चौ.कि.मी. आहे. तर संरक्षित १५ चौ.की.मी. आहे.

सन २००६-०७ मध्ये वनोत्पादनापासून शासनास १३६४ हजार रुपयाचे उत्पन्न झाले आहे. त्यापैकी इमारती लाकडापासून शासनास १०३३ हजार रुपये व इतर वनोत्पदनापासून ६०२ हजार रुपये उत्पन्न झाले.

अकोला जिल्ह्यात २०११-१२ मध्ये वनोत्त्पादनापासून शासनास १६,१५९ हजार रुपयांचे उत्पन्न झाले आहे. त्यापैकी इमारती लाकडापासून शासनास १४,०६५ हजार रुपये व इतर वनोत्पदनापासून २,०९४ हजार रुपये उत्पन्न झाले.

**लोकसंख्या**

सन २०११ च्या जनगणनेनुसार अकोला जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १८,१८,६१७ एवढी आहे. त्यामध्ये पूरूष ९,३६,२२६ व स्त्रिया ७,८८,९८६ आहेत.

**लोकसंख्येची घनता**

सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्येच्या घनतेचे प्रमाण दर चौ. किलोमिटरला अकोला जिल्ह्यात ३२१ आहे.

**स्त्री-पुरुष प्रमाण**

२०११ च्या जनगणनेप्रमाणे अकोला जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण ९४२ असलेले दिसून येते.

**साक्षरता**

सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे अकोला जिल्ह्यात एकूण लोकसंख्येच्या ८७.५५% लोक साक्षर आहेत.

## अकोला जिल्ह्यातील जमिनीचे क्षेत्र

कृषी उत्पादनामध्ये जमीन हा मलभूत घटक असून त्याच्या कार्यक्षम वापरावर शेती उत्पादन सर्वस्वी अवलंबून आहे. कृषी क्षेत्राप्रमाणेच इतरही क्षेत्रास जमिनीची गरज लागते. कारखानदारी वाढते, शहरीकरण, नवीन नवीन पाटबंधारे प्रकल्प, रस्ते अशा इतर क्षेत्रांचे शेत जमिनीवर आक्रमण सुरू असते. त्याचा परिणाम बिगर शेती वापराचे प्रमाण वाढत जाते. अशा परिस्थितीत जमिनीच्या वापराबाबत शिस्तबध्द नियोजन नसल्याचे उत्पादन वाढविणे दूरच पण आहे तेवढेही उत्पादन टिकवून ठेवणे कठीण होते. यादृष्टीने जमिनीच्या क्षेत्राचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.

अकोला जिल्ह्याच्या स्थायी आकडेवारीनुसार जिल्ह्याचे एकूण भौगोलीक क्षेत्र ५,४२,८५४ हेक्टर असुन यापैकी लागवडी लायक क्षेत्र ४,६७,७११ हेक्टर एवढे आहे तसेच एकापेक्षा अधिक वेळा लागवडीखालील आणलेले क्षेत्र ८०,५०४ हेक्टर आहे. अकोला जिल्ह्यातील अकोला तालुक्यात एकूण लागवडी खालील क्षेत्र सर्वात अधिक असुन तेल्हारा तालुक्यात सर्वात कमी आहे.

## अकोला जिल्ह्यात घेण्यात येणारी पीके :

अकोला जिल्ह्यात २००२-०३ च्या स्थायी आकडेवारीनुसार लागवडीखाली ५,२२,८४६ हेक्टर जमीन असुन त्यापैकी अन्नधान्य पिकाखाली २,४७,५१२ हेक्टर, कडधान्य पिकाखाली १,५०,२६७ हेक्टर व कापुस या पिकाखाली २,२२,९१२ हेक्टर जमीन आहे. २००७-०८ च्या अस्थायी आकडेवारीनुसार या जिल्ह्यात लागवडीखाली ४,६६,४७० हेक्टर जमीन असून त्यापैकी अन्नधान्य पिकाखाली १९५८८८ हेक्टर, कडधान्य, पिकाखाली १०२२१४ हेक्टर व कापुस या पिकाखाली २०७४४३ हेक्टर जमीन आहे. ज्वारी, कापुस ही मुख्य पिके कोरडवाहु जमिनीत घेतले जातात. रब्बी पिकात गहू व हरभरा ही मुख्य पिके आहेत. या जिल्ह्यात ओलीताच्या सोय कमी असुन कोरडवाहु पिके जास्त घेतली जातात.

२००२-०३ च्या स्थायी आकडेवारी नुसार ओलीताखाली एकूण २०५०४ हेक्टर क्षेत्र होते व २००७-०८ च्या स्थायी आकडेवारी नुसार ओलीताखाली एकूण ४२८१९ हेक्टर क्षेत्र होते कापूस हे पिक साधारणपणे सर्व शेतकरी त्यांच्या जमिनीपैकी काही भागात कापूस हे पिक घेतात, कारण त्यांचे मुख्य उत्पन्नाचे पिक आहे. ज्वारी हे येथील मुख्य अन्न असल्यामुळे ज्वारी पिकापासून जनावरांसाठी चाराही मिळत असल्यामुळे ज्वारीची पेरणी जास्त असते.

**मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन**

अकोला जिल्ह्यामध्ये ज्वारी, गहू, कापूस, तूर, मुंग, भुईमुंग तिळ ही महत्वाची पिके आहेत. २००८-०९ मध्ये ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन ४६७ किलोग्रॅम, गहू ३४४ किलोग्रॅम, तुर ४९७ किलोग्रॅम, हरबरा ५९० किलोग्रॅम, भुईमुग २३० कि.ग्रा. होते.

अकोला जिल्ह्यात सन २०११-१२ मध्ये लागवडीखाली एकूण ५,१६,०३१ हेक्टर जमीन असून त्यापैकी अन्नधान्य पिकाखाली २,३१,९३५ हेक्टर, कडधान्य पिकाखाली १,४५,५११ हेक्टर व कापूस या पिकाखाली २,२७,७६५ हेक्टर जमीन आहे. या जिल्ह्यात ओलीताच्या सोयी कमी असून कोरडवाहू पिके जास्त घेतली जातात.

सन २०११-१२ मध्ये जिल्ह्यातील ओलीताखाली एकूण २६,२३५ हेक्टर क्षेत्र होते, कापुस हे नगदी पिक असल्यामुळे साधारणपणे सर्व शेतकरी त्यांच्या जमिनीपैकी काही भागात हे पीक घेतात, ज्वारी हे येथील मुख्य अन्न असल्यामुळे ज्वारी ह्या पिकापासून जनावरांना चाराही मिळत असल्यामुळे ज्वारीची पेरणी जास्त असते.

**अकोला जिल्ह्यातील सिंचनाच्या सोयी व अवस्था**

अकोला जिल्ह्यातील जलसिंचनाची स्थिती अभ्यासता जिल्ह्यात २ मोठा व ३ मध्यम प्रकल्प पूर्ण झाली असून लाभक्षेत्राखालील लागवडीलायक क्षेत्र

४९,२३३ हेक्टर आहे. या प्रकल्पामध्ये काटेपुर्णा, वान, उमा, मोर्णा, निर्गूणा, या प्रकल्पाखाली ४,०८४ हेक्टर जमिन हंगामी ओलीताखाली आली.

**पशुसंवर्धन**

**पशुधन**

अकोला जिल्ह्यात पशुगणना, २००७ नुसार जिल्ह्यात एकूण पशुधन ५,३२,२३४ होते, त्यापैकी २,८६,३०२ गाई व बैल, ६३,११० म्हशी व रेडे, १,७७,३५७ शेळ्या व मेंढ्या होत्या. शेतीला जोडधंदा म्हणून ग्रामीण भागात विस्तृत प्रमाणात पशुपालन व सोबत कुक्कूट पालनाचा व्यवसाय करण्यात येत आहे. उपरोक्त गणनेनुसार कुक्कूट पक्ष्यांची संख्या ९२,९५९ होती.

**पशुवैद्यकीय सेवा**

अकोला जिल्ह्यात ६ पशुवैद्यकीय चिकीत्सालय, २९ पशुवैद्यकीय दवाखाने व ३८ पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्र कार्यरत आहेत.

**मत्स्यव्यवसाय**

**मत्स्योत्पादन**

अकोला जिल्ह्यात पुर्णतः गोड्या पाण्याखालील मत्स्य संवर्धन असून २०११-१२ मध्ये तलाव धरणाखाली ४,२७५ हेक्टर क्षेत्र व ४०४ कि.मी लांबीचे नद्याचे पात्र मत्स्य उत्पादनासाठी उपलब्ध होते. यापासुन १९३ लाख रुपये मुल्याचे १९३० मे. टन मत्स्य उत्पादन झाले. यास्तव १३८.६३ लाख मत्स्यबीज व्यवसायाकरीता वापरण्यात आले आहे.

**विद्युत**

**विद्युतीकरण**

अकोला जिल्हातील एकूण ८६२ गावापैकी ८५६ गावांचे व सर्व ६ शहरांचे विद्युतीकरण पूर्ण करण्यात आले.

## विद्युत वापर

अकोला जिल्ह्यात विद्युत वापराच्या संदर्भात सन २०११-१२ ह्या वर्षात घरगूती वापरासाठी १,१४,७२६ युनिट, व्यवसायासाठी १८,९८३, कारखान्यासाठी ७७,३३६ युनिट, सार्वजनिक दिवाबत्तीसाठी २९,१२० युनिट तसेच कृषीसाठी ९८,०५५ युनिट व इतर वापरासाठी ५८,८३४ युनिट अशी एकूण ३,९७,०५४ युनिट विज वापरण्यात आली. तसेच विद्युत कनेक्शनची एकूण संख्या ३.२९ लाख अशी होती.

औद्योगिक क्षेत्राच्या विकासात वीज वापराचे विशेष महत्त्व असून प्रादेशिक असमतोलाचे विवेचन करतांना दांडेकर यांनी देखील वीज वापराच्या आधरावर असमतोलाचे मापन केले आहे. अकोला जिल्ह्यातील वीजेच्या वापराच्या आधारे हा असमतोल अभ्यासता येतो तो पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्र.४.२**

**अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील वीजेचा वापर**

**(वीज वापर हजार कि.वॅ.तास)**

| अ.क्र. | औद्योगिक क्षेत्रातील वीजेचा वापर | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| २०००-०१ | ८२४०० | २०.६८ |
| २००९-१० | ५४५६५ | १३.७० |
| २०१०-११ | १८४१०१ | ४६.२१ |
| २०११-१२ | ७७३३६ | १९.४१ |
| **एकूण** | **३९८४०२** | **१००.००%** |

**(स्त्रोतः जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१२, अकोला जिल्हा )**

वरील तक्त्यात अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील वीजवापराची स्थिती अभ्यासली आहे. सन २०००-०१ मध्ये जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील वीज वापर हा २०.६८ प्रतिशत होता, सन २००९-१० मध्ये हे प्रमाण १३.७० प्रतिशत तर सन २०११-१२ मध्ये १९.४१ प्रतिशत झालेले आढळून येते. केवळ २०१०-११ या वर्षातच हा वापर वाढून ४६.२१ प्रतिशत झालेला आढळून येतो.

वीजेची अनियमितता, भारनियमन यामुळे वापरात कमी अधिकपणा तर होतोच शिवाय औद्योगिक क्षेत्रात जिल्ह्याची होत असलेली पिछेहाट व त्यातूनच वीजेचा कमी होणारा वापर ही कारणे यामागे असलेली आढळून येतात.

**खाणकाम व उद्योग**

**खनिज उत्पादन**

अकोला जिल्ह्यात प्रमुख खनिजे आढळून येत नाही. रेती, गिट्टी, विटा, कवेली अशा गौण खनिज उत्पादनापासून अल्पशा प्रमाणात महसुल प्राप्त होतो, साधारणपणे अकोट व बाळापूर तालुक्यात जास्त प्रमाणात विटा तयार होतात.

**उद्योग आणि कामगार**

अकोला जिल्ह्यात ५४५ नोंदणीकृत उद्योग होते व त्याद्वारे ८,०८२ कामगारांना रोजगार मिळाला जिल्ह्यात पारस या गावी औष्णिक विज निर्मिती केन्द्र आहे. महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळाद्वारे निरनिराळे उद्योग स्थापन करण्याकरिता भुखंड भाडयाने उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**औद्योगिक विकास**

अकोला जिल्ह्यात उद्योगाच्या विकासाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अकोला शहरापासून थोडे अंतरावर १६.५ हेक्टर जमिनीवर एक औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात आली असुन १,८८५ भुखंड उपलब्ध करुन देण्यात आले आहेत त्यातील ४०१ भुखंडापैकी ३८६ भुखंड निरनिराळ्या आस्थापनाकरिता उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

**वाहतुक व दळणवळण**

**लोहमार्ग-**

अकोला शहर मुंबई - हावडा मार्गावरील महत्वाचे स्टेशन आहे व तसेच अकोला ते हिंगोली ब्राडगेजने (मराठवाडा) व मिटर गेजने अकोला ते अजमेर

(राजस्थान) या भागांना जोडलेले आहे. मुर्तिजापुर हे जिल्ह्यातले दुसरे जंक्शन असुन येथून अचलपुर व यवतमाळकडे नॅरोगेज मार्ग गेलेले आहे जिल्ह्यातील अकोट व मुर्तिजापुर ही शहरे अनुक्रमे मिटर गेज व ब्रॉड गेज रेल्वे मार्गानी जोडलेली आहे.

**रस्त्यांची लांबी**

अकोला जिल्ह्यात मार्च २०१२ पर्यंत एकूण ७१९३.१५ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत, त्यापैकी १२८.१० कि.मी. राष्ट्रीय महामार्ग, ५८७.४२ कि.मी. राज्य मार्ग, १३९९.३१ कि.मी. इतर जिल्हा मार्ग, २७४६.५८ ग्रामीण व इतर मार्ग २३३२.३८ आहेत. पैकी सिंमेटचे ८९८.७२ कि.मी.,डांबरी/ब्लॅकटाप्ड ५४२९ कि.मी. व ६३४.९६ कि.मी. रस्ते पक्के व खडीचे आहेत. तसेच इतर माल वापरुन केलेले २३१.११ कि.मी. रस्ते आहेत.

**नोंदणी करण्यात आलेली वाहने**

अकोला जिल्ह्यात दि. ३१/०३/२०१२ अखेर नोंदणी केलेल्या वाहनांची संख्या २,४१,०१३ त्यापैकी सर्वात जास्त म्हणजे १,८८,९८३ वाहने ही मोटर सायकली व स्कूटर या प्रकाराची आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत वाहनाच्या संख्येत शेकडा ११.४१ टक्यांनी वाढ झालेली आहे.

**टपाल व तार कार्यालये**

अकोला जिल्ह्यात दि. ३१/०३/२०१२ रोजी जिल्ह्यात २२० टपाल कार्यालये, १ तारघरे, ३७७ पत्र पेट्या, २८८ पोस्टमन व ६६७ पोस्टांची सुविधा असलेली गावे आहे. यवतमाळ जिल्ह्यात एकूण पोस्टांची संख्या ३७१ असून पत्रपेटयांची संख्या १,५३२ पोस्टमनची संख्या ४७३ आहे. वैयक्तिक दुरध्वनींची संख्या ३०,८२३ तर सार्वजनिक दुरध्वनींची संख्या १,२३५ आहे.

## रोजगार व कामगार

### रोजगार

अकोला जिल्ह्यातील निरनिराळ्या उद्योगातील सन २०११-१२ मध्ये ५३३ आस्थापनांकडुन रोजगार विषयक माहिती प्राप्त झाली, त्यानुसार कामगारांची संख्या ४२,०७० असून त्यापैकी शासकीय क्षेत्रात १८,०२६ कामगार, निमशासकीय क्षेत्रात ९,५४३ कामगार व खाजगी क्षेत्रात १४,५०१ कामगार कार्यरत होते.

## सहकार

### सहकारी संस्था

अकोला जिल्ह्यात ३१/३/२०१२ अखेर रोजी एकूण १९९४ संस्था आहेत, त्यापैकी प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था ४१४, बिगर शेती पतसंस्था २५३ पणन संस्था १९, उत्पादक संस्था ६७५ व सामाजिक सेवा संस्था ६३१ आहेत.

### अधिकोष

अकोला जिल्ह्यात २०१२ अखेरीस वर्गीकृत अधिकोषाच्या १८६ शाखा आहेत. त्यामध्ये स्त्रोत वर्षात वर्गीकृत अधिकोषातील एकूण ठेवी ४,००,८९३ लाख रु. होते.

### शैक्षणिक सुविधा-

अकोला जिल्ह्यामध्ये जिल्ह्यामध्ये सन २०११-१२ मध्ये १,२५९ प्राथमिक शाळा, २३८ माध्यमिक शाळा, १५८ उच्च माध्यमिक शाळा व ६२ सामान्य शिक्षणाची महाविद्यालये होती. २०१०-११ मध्ये एकूण विद्यार्थ्याची संख्या ३,८१,३६१ होती, यातील १,७७,१७६ प्राथमिक, ६२,१६० माध्यमिक, १,१७,८१५ उच्च माध्यिमिक शाळेत विद्यार्थी होते तर २४,२१० महाविद्यालयीन विद्यार्थी होते. तसेच प्राथमिक मध्ये ५९२९, माध्यमिक मध्ये २०८२ ८, उच्च माध्यिमिक शाळेत ३१०० शिक्षक होते तर महाविद्यालयामध्ये २६५ शिक्षक होते.

## सार्वजनिक आरोग्य सेवा

### आरोग्य सेवा

अकोला जिल्ह्यामध्ये सन २००४-०५ पासुन शासकीय वैद्यकिय महाविद्यालय कार्यरत झाले आहे. महाविद्यालयामध्ये उपलब्ध होत असलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग जिल्ह्यातील रुग्णांना होत आहे. जिल्ह्यामध्ये सार्वजनिक आरोग्याचा दृष्टीने वैद्यकीय सेवा शासनामार्फत जिल्हा परिषद, महानगर पालिका व नगर परिषद मार्फत सुध्दा उपलब्ध करुन दिल्या जाते. जिल्ह्यामध्ये सन २०११-१२ मध्ये १० रुग्णालये, २९ दवाखाने, ३० प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेन्द्र १७८ कार्यरत असुन आंतररुग्णांसाठी एकूण १,९५० खाटांची सोय आहे. डॉक्टरांची संख्या १८८ व परिचारिका ५६६ आहेत, उपचार केलेल्या बाह्यरुग्णांपैकी १,४४,३०० पुरुष, १,५१,२०० स्त्रिया, १,३४,४०० मुले तर उपचार केलेल्या आंतर रुग्णापैकी ९१,६०० पुरुष, १,१२,५०० स्त्रिया, ४५,००० मुले होती.

### कुटुंब कल्याण कार्यक्रम

लोकसंख्येला आळा घालण्याचे दृष्टीने कुटूंब नियोजनाचा कार्यक्रम पश्चिम विदर्भात राबविला जातो. अमरावती जिल्ह्यामध्ये ३१-३-२०१२ रोजी एकूण ७३ कुटूंब नियोजन केंद्रे कार्यान्वीत होती. २०११-१२ मध्ये निर्बिजीकरण केलेल्यांची संख्या १२,८०१ होती. यात १,०७१ पुरुष शस्त्रक्रिया व ११,७३० स्त्रियांवरील शस्त्रक्रिया समाविष्ट आहेत. हा कार्यक्रम लोकसंख्येला आळा घालण्याचे दृष्टीने महत्त्वाचे आहे. अकोला जिल्ह्यात कुटुंबकल्याण या राष्ट्रीय कामाकरिता जिल्ह्यातील सर्व स्तरावरील सहकार्य घेण्यात आले व परिणामता या जिल्ह्यात सन २०११-१२ मध्ये १,६४,११५ कुंटुब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्यात याशिवाय दोन जन्मातील अंतर वाढावे म्हणून ५६९३ जिल्ह्यात स्त्रियांनी लुपपध्दती अवलंबलेली आहे. सदर कार्यक्रमांतर्गत निर्बिर्जीकरण केलेल्या व्यक्तींची संख्या १६,५९९ होती. त्यापैकी ११,००० पुरुष शस्त्रक्रिया व ५,४७३ स्त्रियांवरील शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

**जन्म मृत्यू चे प्रमाण**

अकोला जिल्ह्यात सन २०११-१२ मध्ये जिल्ह्यात ३८,७२१ जन्म व १०,५५१ मृत्यु नोदविल्या गेले तर ४९९ बालमृत्यु नोंदविल्या गेले.

अशाप्रकारे प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचे क्षेत्र असणाऱ्या अकोला आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन केले आहे.

## ४.४ प्रादेशिक विषमतेचे निवडक निर्देशकांच्या आधारे तुलनात्मक अध्ययन:

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि पश्चिम विदर्भातील अकोला या दोन जिल्ह्यातील प्रादेशिक आर्थिक विषमता निर्धारित करणाऱ्या विविध घटकांचे अध्ययन करण्यासाठी प्रामुख्याने विभागात उपलब्ध असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या आधारे विषमतेचे मापन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने लोकसंख्या, साक्षरता, शिक्षण, वाहतूक व दळणवळण, आरोग्य विषयक सुविधा, विभागाच्या विकासासाठी प्राप्त तरतुद, वीजेचा वापर, सिंचनाच्या सुविधा, पीकपध्दती इ. घटकांचा आधार घेतला आहे.

जिल्ह्या जिल्ह्यातील आर्थिक विकास निर्धारित करणारे हे घटक प्रत्येक जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात आढळतात त्यामुळे विषमता जन्माला आली असून त्यात संशोधन कालखंडात झालेले बदल शोधून काढले आहेत. त्यासाठी २००१-०२ आणि २०११-१२ या वर्षातील उपलब्ध माहितीच्या आधारे अध्ययन केले आहे. आर्थिक विषमतेचा तुलनात्मक अभ्यास करतांना प्रामुख्याने २००१-०२ हे आधार वर्ष मानून २०११-१२ मध्ये घडून आलेल्या बदलाचे मापन करुन वृध्दीदर अभ्यासून विषमतेचे मापन केले आहे. वृध्दीदर काढण्यासाठी पुढील सुत्राचा आधार घेतला आहे.

$$\text{वृध्दीदर} = \frac{\text{चालू वर्ष - मागील वर्ष} \times १००}{\text{मागील वर्ष}}$$

## तक्ता क्रमांक-४.३
## आर्थिक प्रादेशिक विषमतेच्या निर्देशकांचा एकत्रित तुलनात्मक अभ्यास

| निर्देशक | अकोला | | कोल्हापूर | |
|---|---|---|---|---|
| | २००१-०२ | २०११-१२ | २००१-०२ | २०११-१२ |
| लोकसंख्या (हजार) | १६३० (--) | १८१८ (११.५३) | ३५१५ (--) | ३८७४ (१०.२१) |
| लोकसंख्येची घनता (दर ह.चौ.कि.मी.) | ३०१ (--) | ३२१ (६.६४) | ३३० (--) | ३५३ (६.९७) |
| स्त्री पुरुष प्रमाण (दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या) | ९३८ (--) | ९४२ (०.४३) | ९४९ (--) | ९५३ (०.४२) |
| साक्षरता (% प्रमाण) | ८१.४१ (--) | ८७.५५ (७.५४) | ७६.९ (--) | ८२.९ (७.८०) |
| जंगलव्याप्त क्षेत्र (हजार हेक्टर) | २५६ (--) | ३६४ (४२.१९) | उ.ना. | उ.ना. |
| ओलिताखालील क्षेत्र (हजार हेक्टर) | १८८ (--) | २४५ (३०.३२) | १३५२ (--) | उ.ना. (---) |
| पीकाखालील क्षेत्र (हजार हेक्टर) | २४२६ (--) | ४८५ (-८०.०१) | ४४७८ (--) | ४५५० (१.६१) |
| वीजेचा वापर (कि.वॅट/हजार वॅट तास) | ३५५४२५ (--) | ३९७०५३ (११.७१) | १५८१८४६ (--) | ३२१९१९५ (१०३.५१) |
| रस्त्यांची एकूण लांबी (कि.मी) | २५६७ (--) | ६६०८ (१५७.४२) | ७५६२ (--) | ९३७९ (२४.०३) |
| दळणवळण (संख्या - पोस्ट,तार,दूरध्वनी) | ३५३४१ (--) | २९५३९ (-१६.४२) | १५०८३३ (--) | १५००६५ (-०.५१) |
| अधिकोषण स्थिती (अ.शा.संख्या) | १९५ (--) | १८६ (-४.६२) | ८४५ (--) | ४९५ (-४१.४२) |
| सार्वजनिक आरोग्य (रुग्णालये) | ३६८ (--) | २४७ (-३२.८८) | ५३२ (--) | ५७६ (८.२७) |

(कंसातील आकडे वृध्दी दर (%) दर्शवितात)

उपरोक्त तक्त्यात पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि पश्चिम विदर्भातील अकोला जिल्ह्यातील निवडक विकास निर्देशकाच्या आधारे विविध बाबीतील विषमता अभ्यासली आहे. हे अध्ययन करतांना दोन्ही जिल्ह्यातील २००१-०२ आणि २०११-१२ या कालावधीतील विषमता निर्धारित करणाऱ्या घटकांच्या आधारे

अभ्यासलेल्या वृध्दी दराचा विचार केला असून एकूण जिल्ह्यासंबंधीच्या स्पष्टीकरणातून समोर आलेल्या बाबींचा अभ्यास केला आहे.

अकोला जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दी दराचा विचार करता २०११-१२ मध्ये हा दर २००१-०२ च्या तुलनेत ११.५३ टक्के होता, तर कोल्हापूर जिल्ह्यात हा दर १०.२१ टक्के असलेला आढळतो. म्हणजेच लोकसंख्येच्या बाबतीत अकोला जिल्हा हा कोल्हापूर जिल्ह्याच्या समोर असलेला आढळतो. तसेच लोकसंख्येची घनता, साक्षरता, स्त्री पुरुष प्रमाण याबाबत कोल्हापूर जिल्हा पुढे असलेला आढळतो.

अकोला जिल्ह्यातील जंगलव्याप्त क्षेत्रात वाढ होऊन ही वाढ ४२.१९ टक्के असलेली आढळून येते. अकोला जिल्ह्यातील ओलिताखालील प्रमाणाचा विचार करता अकोला जिल्ह्यात सन २००१-०२ च्या तुलनेत ३०.३२ टक्के वाढ झालेली आढळून येते. दोन्ही जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्राचा विचार करता अकोला जिल्ह्यातील वाढ ही -८१.०१ टक्के एवढी म्हणजेच ऋणात्मक झालेली आढळते. तर कोल्हापूर जिल्ह्यात मात्र पिकाखालील क्षेत्रात वाढ होऊन ही वाढ १.६१ टक्के झालेली आढळते. दोन्ही जिल्ह्यातील वीजवापराची स्थिती अभ्यासता अकोला जिल्ह्यात वीज वापरात सन २००१-०२ च्या तुलनेत झालेली वृध्दी ही ११.७१ टक्के तर कोल्हापूर जिल्ह्यात ही वृध्दी १०३.५१ टक्के होती. रस्त्यांच्या लांबीचा विचार करता अकोला जिल्ह्यात सन २००१-०२ च्या तुलनेत सन २०११-१२ मध्ये ही वृध्दी १५७.४२ एवढ्या मोठ्याप्रमाणात झाली असून कोल्हापूर जिल्ह्यात हे वाढीचे प्रमाण २४.०३ टक्के आहे. दळणवळण साधनांचा विचार करता वाढत्या भ्रमणध्वनी सुविधेमुळे दोन्ही जिल्ह्यातील दुरध्वनी, पोष्ट व तार सेवा यांचे प्रमाण कमी झाले असून किंबहूना ते ऋणात्मक झालेले आढळते हे प्रमाण कमी होऊन अकोला जिल्ह्यात -१६.४२ टक्के एवढे ऋणात्मक आणि कोल्हापूर -०.५१ एवढे ऋणात्मक असलेले दिसून येते. दोन्ही जिल्ह्यात अधिकोषांच्या संख्येत सुध्दा घट झाली असून अकोला जिल्ह्यात घटीचे प्रमाण -४.६२ टक्के तर कोल्हापूर जिल्ह्यात -४१.४२ टक्के होते.

दोन्ही जिल्ह्यातील आरोग्य विषयक सुविधांचा विचार करता अकोला जिल्ह्यात या सोयीत घट होऊन -३२.८८ इतकी झालेली आढळून येते. तर कोल्हापूर जिल्ह्यात ही वाढ ८.२७ टक्के झालेली आढळून येते.

उपरोक्त अध्ययनावरुन सन २००१-०२ च्या तुलनेत २०११-१२ या वर्षातील असमतोल अभ्यासण्याच्या दृष्टीने विषमता अभ्यासण्यासाठी उपयोगात आणलेल्या निर्देशित घटकांच्या आधारे असे दिसून येते की, लोकसंख्या आणि रस्ते या दोन घटकांच्या बाबतीत अकोला जिल्हा हा अग्रेसर असून इतर बाबतीत मात्र तो कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत पिछाडीवर असलेला आढळते.

एकंदरीत विकास निर्धारित करणाऱ्या अनेक बाबींच्या बाबतीत अकोला जिल्हा हा कोल्हापूर जिल्ह्यापेक्षा मागे असल्याचे वरील अध्ययनावरुन आढळते.

**संदर्भग्रंथ-**

१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अकोला जिल्हा., अर्थ सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन., मुंबई.

२. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, बुलडाणा जिल्हा., अर्थ सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन., मुंबई.

# ¯ÖÛú¸ü¾Ö 5 ¾Ö

## ÃÖ¾ÖÖ×ÆüŸÖ ÃÖÖ´Ö¾ÖÖß“Ö ×¾Ö¿»ÖÊÖ¾Ö

5.1 ¯ÖÖÃŸÖÖ×¾ÖÛú

5.2 †Ö ªÖ×¾ÖÛú ¥Ö¡ÖÖ¯ÖÖÃÖ¬Ö ×´ÖÔü¾ÖÖ¸ü ^Ÿ¯Ö®Ö

5.3 ÛúÖ´Ö¾ÖÖ¸üÖ“Öß ÃÖ¾ÖÇÖ

5.4 ÛúÖ¸üÝÖÖ¾Ö¾ÖÖ“Öß ÃÖ¾ÖÇÖ

5.5 ×¬Ö¸ü×¬Ö¸üÖóÖ ^ªÖ¾ÖÖŸÖß»Ö ¸üÖ•Ö¾ÖÖ¸ü

5.6 †ÛúÖ»ÖÖ †Ö×¾Ö ÛúÖ»ÖÆüÖ¯Ö¸ü ×•Ö»ÊÖŸÖß»Ö †Ö ªÖ×¾ÖÛú ×¬ÖÖ¤¿ÖÖÛúÖ“Ö †¬Ö¾Ö¾Ö¬Ö

# प्रकरण पाचवे

# संग्रहित सामग्रीचे विश्लेषण

**५.१ प्रास्ताविक:**

प्रस्तुत प्रकरण हे सर्वेक्षण अहवालावर आधारीत आहे. सर्वेक्षणासाठी निवड केलेल्या पश्चिम विदर्भातील अकोला जिल्हा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक विकासातील असमतोल अभ्यासला आहे. हा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्राशी संबंधीत बाबींचा आधार घेण्यात आला आहे. अध्ययन कालखंड २००१-२०१० च्या आधारे हे अध्ययन करण्यात आले आहे. हे अध्ययन दुय्यम सर्वेक्षणावर आधारीत असून जिल्ह्यातील सांख्यिकीय कार्यालयाद्वारे प्रकाशित माहितीच्या आधारे हे अध्ययन केले आहे ते पुढीलप्रमाणे-

**५.२ औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे उत्पन्न:**

महाराष्ट्रातील प्रमुख दोन विभाग म्हणून पश्चिम विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राची गणना केली जाते. या विभागातील अकोला आणि कोल्हापूर या दोन्ही जिल्ह्यांना औद्योगिक क्षेत्राची पार्श्वभूमी लाभलेली आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यात औद्योगिकक्षेत्र मोठ्या प्रमाणावर पसरलेले आहे. कोणत्याही राज्याला प्राप्त उत्पन्न हे तिन प्रमुख क्षेत्रापासून मिळते ते म्हणजे प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्र हे होत. एकूण उत्पन्नात या तिन्ही क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाला महत्त्वाचे स्थान असून अर्थव्यवस्थेचा विकास कितपत झाला याचा मापदंड लावण्यासाठी या क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पनाचा आधार घेतला जातो. अकोला आणि कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक उत्पन्नातील असमतोल अभ्यासण्यासाठी औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा आधार घेतला आहे. जिल्ह्यांना प्राप्त उत्पन्नात औद्योगिक क्षेत्राचा समावेश असून यालाच द्वितीय क्षेत्रापासून प्राप्त उत्पन्न म्हटले जाते. द्वितीय क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नात प्रामुख्याने नोंदणीकृत उद्योग, अनोंदणीकृत उद्योग, बांधकाम, वीज, वायु व पाणी पुरवठा यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश होतो. औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त उत्पन्नाचे विभाजन हे प्रामुख्यान स्थुल आणि निव्वळ उत्पन्न यात केले जाते. हे उत्पन्न चालु आणि स्थिर किंमतीनुसार मोजले जाते. जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अध्ययन पुढीलप्रमाणे-

## तक्ता क्रमांक ५.१
## सन २००१ ते २०१० या कालावधीतील कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न दर्शविणारा तक्ता (चालु किमतीनुसार)

(रुपये लाख)

| वर्षे | स्थुल उत्पन्न | शेकडा प्रमाण | निव्वळ उत्पन्न | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | २१७२४१ | ५.४३ | १७५२७८ | ५.४१ |
| २००१-०२ | २१६५९६ | ५.४१ | १७१२७५ | ५.२८ |
| २००२-०३ | २२८०५७ | ५.७० | १८३०६८ | ५.६५ |
| २००३-०४ | २५३४८२ | ६.३३ | २०५४२३ | ६.३४ |
| २००४-०५ | २८७६१७ | ७.१९ | २३०८८५ | ७.१२ |
| २००५-०६ | ३८३२२१ | ९.५७ | ३०४११६ | ९.३८ |
| २००६-०७ | ४४६५१४ | ११.१६ | ३५२११६ | १०.८६ |
| २००७-०८ | ५०६६०१ | १२.६६ | ३९६३६२ | १२.२२ |
| २००८-०९ | ६६०००६ | १६.४९ | ५३६२२१ | १६.५४ |
| २००९-१० | ८०३०८४ | २०.०६ | ६८७६३८ | २१.२१ |
| **एकूण** | **४००२४१९** | **१००.००** | **३२४२३८२** | **१००.००** |

(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, कोल्हापूर)

वरील तक्त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अध्ययन केले आहे. हे अध्ययन चालू किंमतीनुसार केले आहे. सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडातील स्थुल व निव्वळ उत्पन्नाचे अध्ययन केले आहे.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त स्थुल उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे ४००२४१९ होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक स्थुल उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या २०.०६ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ५.४१ टक्के होते.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त निव्वळ उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे ३२४२३८२ होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक निव्वळ उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या २१.२१ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ५.२८ टक्के होते. कोल्हापूर जिल्ह्यातील स्थुल व निव्वळ उत्पन्नाचे अध्ययन करणारा आलेख पुढीलप्रमाणे-

### आलेख क्र.५.१

## कोल्हापूर जिल्ह्यातील स्थुल व निव्वळ उत्पन्नाचे प्रमाण दर्शविणारा आलेख (चालू किंमतीनुसार)



## तक्ता क्रमांक ५.२
## सन २००१ ते २०१० या कालावधीतील कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न दर्शविणारा तक्ता (स्थिर किमतीनुसार)

(रुपये लाख)

| वर्षे | स्थुल उत्पन्न | शेकडा प्रमाण | निव्वळ उत्पन्न | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | २०९८६० | ६.७८ | १६९१७९ | ६.७८ |
| २००१-०२ | २०४३३४ | ६.६० | १६१८०६ | ६.४९ |
| २००२-०३ | २११८१५ | ६.८४ | १६९४०६ | ६.७९ |
| २००३-०४ | २१८१०७ | ७.०५ | १७५२५२ | ७.०३ |
| २००४-०५ | २३३११५ | ७.५३ | १८६९१७ | ७.४९ |
| २००५-०६ | २८४२७२ | ९.१८ | २२४७२३ | ९.०१ |
| २००६-०७ | ३१५११८ | १०.१८ | २४७९१३ | ९.९४ |
| २००७-०८ | ३४११८९ | ११.०२ | २६७०४५ | १०.७१ |
| २००८-०९ | ३८४०४९ | १२.४१ | ३०८५६३ | १२.३७ |
| २००९-१० | ६९३२५६ | २२.४० | ५८३५७५ | २३.४० |
| **एकूण** | **३०९५११५** | १००.०० | **२४९४३७९** | १००.०० |

(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, कोल्हापूर)

वरील तक्त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अध्ययन केले आहे. हे अध्ययन स्थिर किंमतीनुसार केले आहे. सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडातील स्थुल व निव्वळ उत्पन्नाचे अध्ययन केले आहे.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त स्थुल उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे ३०९५११५ लाख होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक स्थुल उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या २२.४० टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ६.६० टक्के होते.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त निव्वळ उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे २४९४३७९ लाख होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक निव्वळ उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या २३.४० टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ६.४९ टक्के होते.

## आलेख क्र.५.२

## कोल्हापूर जिल्ह्यातील स्थुल व निव्वळ उत्पन्नाचे प्रमाण दर्शविणारा आलेख (स्थिर किंमतीनुसार)



## तक्ता क्रमांक ५.३
## सन २००१ ते २०१० या कालावधीतील अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न दर्शविणारा तक्ता (चालू किमतीनुसार)

(रुपये लाख)

| वर्षे | स्थुल उत्पन्न | शेकडा प्रमाण | निव्वळ उत्पन्न | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-२००१ | ६८६२७ | ६.४१ | ५५१९७ | ६.२९ |
| २००१-२००२ | ६३३४६ | ५.९१ | ५०१४३ | ५.७२ |
| २००२-२००३ | ७८९३६ | ७.३७ | ६२७४० | ७.१५ |
| २००३-२००४ | ८४१५७ | ७.८६ | ६८०३१ | ७.७६ |
| २००४-२००५ | ९२५७३ | ८.६४ | ७४४७२ | ८.४९ |
| २००५-२००६ | ९०९५७ | ८.४९ | ७२९३७ | ८.३२ |
| २००६-२००७ | १०२२३० | ९.५५ | ८१३४४ | ९.२८ |
| २००७-२००८ | ११६६९२ | १०.९० | ९२१६० | १०.५१ |
| २००८-२००९ | १८८८७४ | १७.६४ | १५८२६५ | १८.०५ |
| २००९-२०१० | १८४५६२ | १७.२३ | १६१६५१ | १८.४३ |
| **एकूण** | **१०७०९५४** | **१००.००** | **८७६९४०** | **१००** |

(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, अकोला.)

वरील तक्त्यात अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अध्ययन केले आहे. हे अध्ययन चालू किंमतीनुसार केले आहे. सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडातील स्थुल व निव्वळ उत्पन्नाचे अध्ययन केले आहे.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात अकोला जिल्ह्यास प्राप्त स्थुल उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे १०७०९५४ लाख होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक स्थुल उत्पन्न २००८-०९ मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या १७.६४ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ५.९१ टक्के होते.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात अकोला जिल्ह्यास प्राप्त निव्वळ उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे ८७६९४० लाख होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक निव्वळ उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या १८.४३ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ५.७२ टक्के होते.

**तक्ता क्रमांक ५.४**

**सन २००१ ते २०१० या कालावधीतील अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न दर्शविणारा तक्ता (स्थिर किमतीनुसार)**

**(रुपयेलाख)**

| वर्षे | स्थुल उत्पन्न | शेकडा प्रमाण | निव्वळ उत्पन्न | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | ६२०९७ | ८.०४ | ५०१९८ | ७.८७ |
| २००१-०२ | ५७७४५ | ७.४८ | ४५१२० | ७.०८ |
| २००२-०३ | ६६४६७ | ८.६१ | ५२८९९ | ८.३० |
| २००३-०४ | ६६१५० | ८.५७ | ५३०९४ | ८.३३ |
| २००४-०५ | ६९०४७ | ८.९४ | ५५५५५ | ८.७२ |
| २००५-०६ | ५२७१९ | ६.८३ | ५२९५५ | ८.३१ |
| २००६-०७ | ७१०७४ | ९.२० | ५६५८७ | ८.८८ |
| २००७-०८ | ७६९१२ | ९.९६ | ६०८४४ | ९.५४ |
| २००८-०९ | ११०४२५ | १४.३० | ९१०४२ | १४.२८ |
| २००९-१० | १३९६५१ | १८.०८ | ११९१५१ | १८.६९ |
| **एकूण** | **७७२२८७** | १००.०० | **६३७४४५** | १००.०० |

(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, अकोला.)

वरील तक्त्यात अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अध्ययन केले आहे. हे अध्ययन स्थिर किंमतीनुसार केले आहे. सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडातील स्थुल व निव्वळ उत्पन्नाचे अध्ययन केले आहे.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात अकोला जिल्ह्यास प्राप्त स्थुल उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे ७७२२८७ लाख होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक स्थुल उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या १८.०८ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ७.४८ टक्के होते.

सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात अकोला जिल्ह्यास प्राप्त निव्वळ उत्पन्नाचा विचार करता मिळालेले एकूण उत्पन्न हे ६३७४४५ लाख होते. जिल्ह्यास प्राप्त सर्वाधिक निव्वळ उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या १८.६९ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ७.०८ टक्के होते.

**औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त उत्पन्नाचे तौलनिक अध्ययन-**

औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त उत्पन्नाचा विचार करता कोल्हापूर जिल्हा हा अकोला जिल्ह्यापेक्षा अग्रेसर असून याबाबत तौलनिक अध्ययन करणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.५**

**सन २००१ ते २०१० या कालावधीतील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातंर्गत औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या स्थुल व निव्वळ उत्पन्नाची तौलनिक स्थिती दर्शविणारा तक्ता (चालू किमतीनुसार)**

(रुपये लाख)

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्याचे उत्पन्न | अकोला जिल्ह्याचे उत्पन्न | उत्पन्नातील तफावत | तफावतीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | ३९२५१९ | १२३८२४ | २६८६९५ | ५.०७ |
| २००१-०२ | ३८७८७१ | ११३४८९ | २७४३८२ | ५.१८ |
| २००२-०३ | ४१११२५ | १४१६७६ | २६९४४९ | ५.०९ |
| २००३-०४ | ४५८९०५ | १५२१८८ | ३०६७१७ | ५.७९ |
| २००४-०५ | ५१८५०२ | १६७०४५ | ३५१४५७ | ६.६४ |
| २००५-०६ | ६८७३३७ | १६३८९४ | ५२३४४३ | ९.८८ |
| २००६-०७ | ७९८६३० | १८३५७४ | ६१५०५६ | ११.६१ |
| २००७-०८ | ९०२९६३ | २०८८५२ | ६९४१११ | १३.१० |
| २००८-०९ | ११९६२२७ | ३४७१३९ | ८४९०८८ | १६.०३ |
| २००९-१० | १४९०७२२ | ३४६२१३ | ११४४५०९ | २१.६१ |
| **एकूण** | ७२४४८०१ | १९४७८९४ | ५२९६९०७ | १००.०० |

वरील तक्त्यात कोल्हापूर व अकोला जिल्ह्यांना औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे चालू किमतीनुसार तुलनात्मक अध्ययन केले आहे. सन २०००-०१ ते २००९-१० या कालावधीमध्ये कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्न ७२४४८०१ लाख होते तर अकोला जिल्ह्यास प्राप्त उत्पन्न हे १९४७८९४ लाख होते.

दोन जिल्ह्यातील उत्पन्नातील तफावत ही ५२९६९०७ लाख होती. सर्वाधिक तफावत ही सन २००९-१० मध्ये होती तफावतीचे प्रमाण २१.६१ टक्के होते. तर सर्वात कमी उत्पन्नातील तफावत ही सन २०००-०१ या वर्षी असून तफावतीचे प्रमाण ५.०७ टक्के होते. यावरुन दोन्ही जिल्ह्यात औद्योगिक उत्पन्नात विषमता असलेली आढळून येते.

## आलेख क्रमांक. ५.3

## कोल्हापूर व अकोला जिल्ह्यांतर्गत औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त उत्पन्नातील तफावतीचे शेकडा प्रमाण दर्शविणारा आलेख



## तक्ता क्रमांक ५.६

## सन २००१ ते २०१० या कालावधीतील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातंर्गत औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या स्थुल व निव्वळ उत्पन्नाची तौलनिक स्थिती दर्शविणारा तक्ता (स्थिर किमतीनुसार)

(रुपये लाख)

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्याचे उत्पन्न | अकोला जिल्ह्याचे उत्पन्न | उत्पन्नातील तफावत | तफावतीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | ३७९०३९ | ११२२९५ | २६६७४४ | ६.३८ |
| २००१-०२ | ३६६१४० | १०२८६५ | २६३२७५ | ६.३० |
| २००२-०३ | ३८१२२१ | ११९३६६ | २६१८५५ | ६.२६ |
| २००३-०४ | ३९३३५९ | ११९२४४ | २७४११५ | ६.५६ |
| २००४-०५ | ४२००३२ | १२४६०२ | २९५४३० | ७.०७ |
| २००५-०६ | ५०८९९५ | १०५६७४ | ४०३३२१ | ९.६५ |
| २००६-०७ | ५६३०३१ | १२७६६१ | ४३५३७० | १०.४२ |
| २००७-०८ | ६०८२३४ | १३७७५६ | ४७०४७८ | ११.२६ |
| २००८-०९ | ६९२६१२ | २०१४६७ | ४९११४५ | ११.७५ |
| २००९-१० | १२७६८३१ | २५८८०२ | १०१८०२९ | २४.३६ |
| **एकूण** | **५५८९४९४** | **१४०९७३२** | **४१७९७६२** | **१००.००** |

वरील तक्त्यात कोल्हापूर व अकोला जिल्ह्यांना औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे स्थिर किमतीनुसार तुलनात्मक अध्ययन केले आहे. सन २०००-०१ ते २००९-१० या कालावधीमध्ये कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्न ५५८९४९४ लाख होते तर अकोला जिल्ह्यास प्राप्त उत्पन्न हे १४०९७३२ लाख होते. दोन जिल्ह्यातील उत्पन्नातील तफावत ही ४१७९७६२ लाख होती. सर्वाधिक तफावत ही सन २००९-१० मध्ये होती तफावतीचे प्रमाण २४.३६ टक्के होते. तर सर्वात कमी उत्पन्नातील तफावत ही सन २००२-०३ या वर्षी असून तफावतीचे प्रमाण ६.२६ टक्के होते. यावरुन दोन्ही जिल्ह्यात औद्योगिक उत्पन्नात विषमता असलेली आढळून येते.

**औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा चालू किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर**

महाराष्ट्रातील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा चालु किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ५.७**

**औद्योगिक क्षेत्र : प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा चालु किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर (२०००-०१ ते २००९-१०)**

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्यातील उत्पन्न | अकोला जिल्ह्यातील उत्पन्न |
|---|---|---|
| **२०००-०१** | ३९२५१९<br>(----) | १२३८२४<br>(----) |
| **२००१-०२** | ३८७८७१<br>(-१.१८) | ११३४८९<br>(-८.३५) |
| **२००२-०३** | ४१११२५<br>(६.००) | १४१६७६<br>(२४.८४) |
| **२००३-०४** | ४५८९०५<br>(११.६२) | १५२१८८<br>(७.४२) |
| **२००४-०५** | ५१८५०२<br>(१२.९९) | १६७०४५<br>(९.७६) |
| **२००५-०६** | ६८७३३७<br>(३२.५६) | १६३८९४<br>(-१.८९) |
| **२००६-०७** | ७९८६३०<br>(१६.१९) | १८३५७४<br>(१२.०१) |
| **२००७-०८** | ९०२९६३<br>(१३.०६) | २०८८५२<br>(१३.७७) |
| **२००८-०९** | ११९६२२७<br>(३२.४८) | ३४७१३९<br>(६६.२१) |
| **२००९-१०** | १४९०७२२<br>(२४.६२) | ३४६२१३<br>(-०.२७) |

स्त्रोत : जिल्हा सांख्यिकी कार्यालयातुन प्राप्त माहितीवरुन

(कंसातील आकडे टक्के%दर्शवितात.)

उपरोक्त तक्त्या वरुन असे दिसून येते की, २००१-०२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर -१.१८ टक्के म्हणजेच ऋणात्मक होता तर अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर -८.३५ टक्के इतका होता.

२००९-१० मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर २४.६२ टक्के होता, अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर -०.२७ टक्के इतका म्हणजे ऋणात्मक होता.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००५-०६ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (३२.५६ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी (-१.१० टक्के) होता.

२००८-०९ ला अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (६६.२१ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी -८.३५ टक्के म्हणजे ऋणात्मक होता.

**औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा स्थिर किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर**

महाराष्ट्रातील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा स्थिर किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ५.८**

**औद्योगिक क्षेत्र : प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा स्थिर किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर (२०००-०१ ते २००९-१०)**

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्यातील उत्पन्न | अकोला जिल्ह्यातील उत्पन्न |
|---|---|---|
| **२०००-०१** | ३७९०३९ (----) | ११२२९५ (----) |
| **२००१-०२** | ३६६१४० (-३.४०) | १०२८६५ (-८.४०) |
| **२००२-०३** | ३८१२२१ (४.१२) | ११९३६६ (१६.०४) |
| **२००३-०४** | ३९३३५९ (३.१८) | ११९२४४ (-०.१०) |
| **२००४-०५** | ४२००३२ (६.७८) | १२४६०२ (४.४९) |
| **२००५-०६** | ५०८९९५ (२१.१८) | १०५६७४ (-१५.१९) |
| **२००६-०७** | ५६३०३१ (१०.६२) | १२७६६१ (२०.८१) |
| **२००७-०८** | ६०८२३४ (८.०३) | १३७७५६ (७.९१) |
| **२००८-०९** | ६९२६१२ (१३.८७) | २०१४६७ (४६.२५) |
| **२००९-१०** | १२७६८३१ (८४.३५) | २५८८०२ (२८.४६) |

स्त्रोत : जिल्हा सांख्यिकी कार्यालयातुन प्राप्त माहितीवरुन
(कंसातील आकडे टक्के%दर्शवितात.)

उपरोक्त तक्त्या वरुन असे दिसून येते की, २००१-०२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर -३.४० टक्के म्हणजेच ऋणात्मक होता तर अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर -८.४० टक्के म्हणजे ऋणात्मक इतका होता.

२००९-१० मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर ८४.३५ टक्के होता, अकोला जिल्ह्यातील

औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर २८.४६ टक्के इतका होता.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००९-१० मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (८४.३५ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी (-३.४० टक्के) होता.

२००८-०९ ला अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (४६.२५ टक्के) होता तर २००५-०६ ला सर्वात कमी -१५.१९ टक्के म्हणजे ऋणात्मक होता.

**५.३ कामगारांची संख्या :**

औद्योगिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक म्हणून कामगारांची गणना केली जाते. उत्पादनाच्या चार घटकांमध्ये कामगारांच्या श्रमाची वर्णी लागते. 'श्रम' या घटकाला अर्थोत्पादनात भाग घेणारा सर्वात महत्त्वाचा घटक मानले जाते. 'कामगार' म्हणजेच 'श्रमिक' ही दोन्ही शब्दे एकाच अर्थाने वापरल्या जातात. श्रमिक हा उद्योग जगताचा पाया आहे. राष्ट्राच्या उन्नतीस प्रमुख हातभार लावण्याच्या प्रक्रियेत श्रमिकांचा सिंहाचा वाटा असतो. महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील विषमता अभ्यासतांना कामगारांच्या संख्येतील विषमता अभ्यासली आहे. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांमध्ये स्त्री आणि पुरुष या दोघांचाही समावेश होत असलेला आढळून येतो. कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील कामगारांची संख्या अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

## तक्ता क्रमांक ५.९

## कोल्हापूर जिल्ह्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या अभ्यासणारा तक्ता

| वर्षे | पुरूष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| २०००-०१ | ४३६५२ (११.६८) | १३८३ (१०.९०) | ४५०३५ (११.६६) |
| २००१-०२ | ३९७९१ (१०.६५) | १३३३ (१०.५१) | ४११२३ (१०.६४) |
| २००२-०३ | ३६०५० (९.६५) | १२४० (९.७७) | ३७२९० (९.६५) |
| २००३-०४ | ३८६२७ (१०.३४) | १४२० (११.१९) | ४००४७ (१०.३६) |
| २००४-०५ | ३७९६० (१०.१६) | १४४७ (११.४०) | ३९४०७ (१०.२०) |
| २००५-०६ | ३७९६० (१०.१६) | १४४७ (११.४०) | ३९४०७ (१०.२०) |
| २००६-०७ | ३४२९९ (९.१८) | १२६१ (९.९४) | ३५५६० (९.२०) |
| २००७-०८ | ३४४६० (९.२२) | १२७१ (१०.०२) | ३५७३१ (९.२५) |
| २००८-०९ | ३५४५८ (९.४९) | ९३९ (७.४०) | ३६३९७ (९.४२) |
| २००९-१० | ३५४४९ (९.४९) | ९४८ (७.४७) | ३६३९७ (९.४२) |
| **एकूण** | **३७३७०६ (१००%)** | **१२६८९ (१००%)** | **३८६३९५ (१००%)** |

**(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, कोल्हापूर.**
**टिप-कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात)**

वरील तक्त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील कामगारांची सरासरी संख्या अभ्यासली आहे. जिल्ह्यात पुरूष कामगारांची संख्या सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात ३७३७०६ होती. सर्वाधिक पुरूष कामगार सन २०००-०१ मध्ये होते त्यांची संख्या ४३६५२ असून त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या ११.६८ टक्के होते. तर सर्वात कमी कामगार सन २००६-०७ मध्ये होते त्यांची संख्या ३४२९९ असून त्यांचे प्रमाण ९.१८ टक्के एवढे होते.

जिल्ह्यातील स्त्री कामगारांची संख्या सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात १२६८९ होती. सर्वाधिक स्त्री कामगार सन २००४-०५ मध्ये होते त्यांची

संख्या १४४७ असून त्यांचे प्रमाण एकूण स्त्री कामगारांच्या ११.४० टक्के होते. तर सर्वात कमी कामगार सन २००८-०९ मध्ये होते त्यांची संख्या ९३९ असून त्यांचे प्रमाण ७.४० टक्के एवढे होते.

जिल्ह्यातील कारखान्यातील एकूण स्त्री-पुरुष कामगारांची संख्या अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालावधीत एकूण कामगारांची संख्या ३८६३९५ होती. सर्वाधिक एकूण कामगार हे २०००-०१ मध्ये होते त्यांची संख्या ४५०३५ असून त्यांचे प्रमाण ११.६६ टक्के होते. तर सर्वात कमी सन २००६-०७ मध्ये कामगारांची संख्या ३५,५६० होती त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या ९.२० टक्के होते.

**तक्ता क्रमांक ५.१०**

**अकोला जिल्ह्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या अभ्यासणारा तक्ता**

| वर्षे | पुरूष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| २०००-०१ | ४१५२<br>(९.३६) | ३०५<br>(८.४७) | ४४५७<br>(९.३०) |
| २००१-०२ | ४९७८<br>(११.२३) | ३८४<br>(१०.६७) | ५३६२<br>(११.१९) |
| २००२-०३ | ३२८०<br>(७.४०) | ३७९<br>(१०.५३) | ३६५९<br>(७.६३) |
| २००३-०४ | ४०४०<br>(९.११) | ३०७<br>(८.५३) | ४३४७<br>(९.०७) |
| २००४-०५ | ४१४७<br>(९.३५) | ३२८<br>(९.११) | ४४७५<br>(९.३४) |
| २००५-०६ | ३८१०<br>(८.५९) | २४२<br>(६.७२) | ४०५२<br>(८.४५) |
| २००६-०७ | ५५९२<br>(१२.६१) | ३७४<br>(१०.३९) | ५९६६<br>(१२.४५) |
| २००७-०८ | ४७७९<br>(१०.७८) | ४२७<br>(११.८६) | ५२०६<br>(१०.८६) |
| २००८-०९ | ४७७९<br>(१०.७८) | ४२७<br>(११.८६) | ५२०६<br>(१०.८६) |
| २००९-१० | ४७७९<br>(१०.७८) | ४२७<br>(११.८६) | ५२०६<br>(१०.८६) |
| **एकूण** | **४४३३६<br>(१००%)** | **३६००<br>(१००%)** | **४७९३६<br>(१००%)** |

**(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, अकोला.)**

**(टिप-कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात)**

वरील तक्त्यात अकोला जिल्ह्यातील कामगारांची सरासरी संख्या अभ्यासली आहे. जिल्ह्यात पुरूष कामगारांची संख्या सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात ४४३३६ होती. सर्वाधिक पुरूष कामगार सन २००६-०७ मध्ये होते त्यांची संख्या ५५९२ असून त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या १२.६१ टक्के होते. तर सर्वात कमी कामगार सन २००२-०३ मध्ये होते त्यांची संख्या ३२८० असून त्यांचे प्रमाण ७.४० टक्के एवढे होते.

जिल्ह्यातील स्त्री कामगारांची संख्या सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात ३६०० होती. सर्वाधिक स्त्री कामगार सन २००७ ते २००९ मध्ये होते त्यांची संख्या ४२७ असून त्यांचे प्रमाण एकूण स्त्री कामगारांच्या ११.८६ टक्के होते. तर सर्वात कमी कामगार सन २००५-०६ मध्ये होते त्यांची संख्या २४२ असून त्यांचे प्रमाण ६.७२ टक्के एवढे होते.

जिल्ह्यातील कारखान्यातील एकूण स्त्री-पुरुष कामगारांची संख्या अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालावधीत एकूण कामगारांची संख्या ४७९३६ होती. सर्वाधिक एकूण कामगार हे २००६-०७ मध्ये होते त्यांची संख्या ५९६६ असून त्यांचे प्रमाण ११.६६ टक्के होते. तर सर्वात कमी सन २००२-०३ मध्ये कामगारांची संख्या ३३५९ होती त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या ७.६३ टक्के होते.

**कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर**

महाराष्ट्रातील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ५.११**

**कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर (२०००-०१ ते २००९-१०)**

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्यातील कामगार संख्या | अकोला जिल्ह्यातील कामगार संख्या |
|---|---|---|
| **२०००-०१** | ४५०३५ (----) | ४४५७ (----) |
| **२००१-०२** | ४११२३ (-८.६९) | ५३६२ (२०.३१) |
| **२००२-०३** | ३७२९० (-९.३२) | ३६५९ (-३१.७६) |
| **२००३-०४** | ४००४७ (७.३९) | ४३४७ (१८.८०) |
| **२००४-०५** | ३९४०७ (-१.६०) | ४४७५ (२.९४) |
| **२००५-०६** | ३९४०७ (०.००) | ४०५२ (-९.४५) |
| **२००६-०७** | ३५५६० (-९.७६) | ५९६६ (-१२.७४) |
| **२००७-०८** | ३५७३१ (०.४८) | ५२०६ (०.००) |
| **२००८-०९** | ३६३९७ (१.८६) | ५२०६ (०.००) |
| **२००९-१०** | ३६३९७ (०.००) | ५२०६ (०.००) |

स्त्रोत : जिल्हा सांख्यिकी कार्यालयातुन प्राप्त माहितीवरुन
(कंसातील आकडे टक्के%दर्शवितात.)

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, २००१-०२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर -८.६९ टक्के म्हणजेच ऋणात्मक होता तर अकोला जिल्ह्यातील कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर २०.३१ टक्के इतका होता.

२००९-१० मध्ये कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील कामगारसंख्येचा वार्षिक वृध्दी दर हा २००८-०९ च्या तुलनेत ०.० टक्के होता.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००३-०४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (७.३९ टक्के) होता तर २००६-०७ ला सर्वात कमी (-९.७६ टक्के) होता.

२००१-०२ ला अकोला जिल्ह्यातील कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त २०.३१ टक्के होता तर २००२-०३ ला सर्वात कमी (-३१.७६ टक्के) होता.

**५.४ कारखान्यांची संख्या :**

औद्योगिक क्षेत्रात कारखान्यांना महत्त्वाचे स्थान आहे. कारखान्यांच्या संख्येवर त्या क्षेत्रातील औद्योगिक स्थिती कशी आहे याचा अंदाज लावला जातो. कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील औद्योगिक स्थिती अभ्यासतांना तेथील कारखान्यांची संख्या अभ्यासली आहे हे अध्ययन करतांना नोंदणी झालेले कारखाने, बंद कारखाने, प्रपत्र पाठवणारे कारखाने यांची संख्या अभ्यासली आहे ती पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.१२**

**कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांची संख्या अभ्यासणारा तक्ता**

| वर्षे | नोंदणी झालेले कारखाने | बंद कारखाने | प्रपत्र पाठवणारे चालू कारखाने |
|---|---|---|---|
| २०००-०१ | १५७८ (१०.५७) | १९१ (११.३२) | ९११ (११.६१) |
| २००१-०२ | १४८२ (९.९३) | १६५ (९.७७) | ७५५ (९.६२) |
| २००२-०३ | १४२२ (९.५३) | १५९ (९.४२) | ६९६ (८.८७) |
| २००३-०४ | १४१४ (९.४८) | १५० (८.८९) | ८७४ (११.१४) |
| २००४-०५ | १४३४ (९.६१) | १७० (१०.०७) | ८९० (११.३४) |
| २००५-०६ | १४३४ (९.६१) | १७० (१०.०७) | ८९० (११.३४) |
| २००६-०७ | १४६८ (९.८४) | १७५ (१०.३७) | ६९४ (८.८४) |
| २००७-०८ | १४९० (९.९९) | १८० (९.७२) | ७०२ (८.९४) |
| २००८-०९ | १६०० (१०.७२) | १६४ (९.७२) | ६१४ (७.८२) |
| २००९-१० | १६०० (१०.७२) | १६४ (९.७२) | ८२३ (१०.४९) |
| **एकूण** | **१४९२२ (१००%)** | **१६८८ (१००%)** | **७८४९ (१००%)** |

**(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, कोल्हापूर.**

**टिप-कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात)**

वरील तक्त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांची संख्या अभ्यासली आहे. नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात जिल्ह्यात नोंदणी झालेले एकूण कारखाने हे १४९२२ होते. सर्वाधिक नोंदणी झालेले कारखाने सन २००८-०९ व २००९-१० या वर्षात होते त्यांची संख्या १६०० असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या १०.७२ टक्के होते तर सर्वात कमी नोंदणी

झालेले कारखाने सन २००९-१० या वर्षात होते त्यांची संख्या १४१४ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ९.४८ टक्के होते.

बंद झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात जिल्ह्यात बंद पडलेले एकूण कारखाने हे १६८८ होते. सर्वाधिक बंद पडलेले कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांची संख्या १९१ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.३२ टक्के होते तर सर्वात कमी बंद पडलेले कारखाने सन २००८ ते २०१० या वर्षात होते त्यांची संख्या १६४ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ९.७२ टक्के होते.

प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या अभ्यासता अध्ययन कालखंड सन २०००-०१ ते २००९-१० मध्ये प्रपत्र पाठविणाऱ्या चालु कारखान्यांची संख्या ७८४९ होती. सर्वाधिक प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांची संख्या ९११ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.६१ टक्के होते तर सर्वात कमी प्रपत्र पाठविणारे चालू कारखाने सन २००८-०९ या वर्षात होते त्यांची संख्या ६१४ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ७.८२ टक्के होते.

## तक्ता क्रमांक ५.१३

## अकोला जिल्ह्यातील कारखान्यांची संख्या अभ्यासणारा तक्ता

| वर्षे | नोंदणी झालेले कारखाने | बंद कारखाने | प्रपत्र पाठवणारे चालू कारखाने |
|---|---|---|---|
| २०००-०१ | ४२९ (८.१६) | १०१ (१०.१४) | १३४ (८.२२) |
| २००१-०२ | ४७२ (८.९८) | १०० (१०.०४) | १५७ (९.६३) |
| २००२-०३ | ५२० (९.८९) | १०२ (१०.२४) | १५४ (९.४४) |
| २००३-०४ | ५३२ (१०.१२) | १०२ (१०.२४) | १३० (७.९७) |
| २००४-०५ | ५४१ (१०.२९) | १०२ (१०.२४) | १५७ (९.६३) |
| २००५-०६ | ५३९ (१०.२५) | ११४ (११.४५) | १५० (९.२०) |
| २००६-०७ | ५८८ (११.१९) | ९६ (९.६४) | १८५ (११.३४) |
| २००७-०८ | ५४५ (१०.३७) | ९३ (९.३४) | १८८ (११.५३) |
| २००८-०९ | ५४५ (१०.३७) | ९३ (९.३४) | १८८ (११.५३) |
| २००९-१० | ५४५ (१०.३७) | ९३ (९.३४) | १८८ (११.५३) |
| **एकूण** | **५२५६ (१००%)** | **९९६ (१००%)** | **१६३१ (१००%)** |

**(स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, अकोला.**

**टिप-कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात)**

वरील तक्त्यात अकोला जिल्ह्यातील कारखान्यांची संख्या अभ्यासली आहे. नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात जिल्ह्यात नोंदणी झालेले एकूण कारखाने हे ५२५६ होते. सर्वाधिक नोंदणी झालेले कारखाने सन २००७ ते २०१० या वर्षात होते त्यांची संख्या ५४५ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या १०.३७ टक्के होते तर सर्वात कमी नोंदणी

झालेले कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांची संख्या ४२९ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ८.१६ टक्के होते.

बंद झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात जिल्ह्यात बंद पडलेले एकूण कारखाने हे ९९६ होते. सर्वाधिक बंद पडलेले कारखाने सन २००५-०६ या वर्षात होते त्यांची संख्या ११४ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.४५ टक्के होते तर सर्वात कमी बंद पडलेले कारखाने सन २००७ ते २०१० या वर्षात होते त्यांची संख्या ९३ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ९.३४ टक्के होते.

प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या अभ्यासता अध्ययन कालखंड सन २०००-०१ ते २००९-१० मध्ये प्रपत्र पाठविणाऱ्या चालु कारखान्यांची संख्या १६३१ होती. सर्वाधिक प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांची संख्या १८८ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.६१ टक्के होते तर सर्वात कमी प्रपत्र पाठविणारे चालू कारखाने सन २००८-०९ या वर्षात होते त्यांची संख्या ६१४ असून त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ७.८२ टक्के होते.

**कारखान्याच्या संख्येचे तौलनिक अध्ययन-**

अकोला आणि कोल्हापूर या जिल्ह्यातील कारखान्यांच्या संख्येतील तफावतीचा अभ्यास करता कोल्हापूर जिल्हा हा अकोला जिल्ह्यापेक्षा अग्रेसर असून याबाबत तौलनिक अध्ययन करणारा तक्ता पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक ५.१४**

**कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातंर्गत कारखान्यांची संख्या व कामगारांच्या संख्येचे तौलनिक अध्ययन करणारा तक्ता**

| वर्षे | कामगारांच्या संख्येतील तफावत | कारखान्याच्या संख्येतील तफावत | बंद कारखान्यांच्या संख्येतील तफावत | प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | ४०५७८ (११.९९) | ११४९ (११.८९) | ९० (१३.०१) | ७७७ (१२.५०) |
| २००१-०२ | ३५७६१ (१०.५७) | १०१० (१०.४५) | ६५ (९.३९) | ५९८ (९.६२) |
| २००२-०३ | ३३६३१ (९.९४) | ९०२ (९.३३) | ५७ (८.२४) | ५४२ (८.७२) |
| २००३-०४ | ३५७०० (१०.५५) | ८८२ (९.१२) | ४८ (६.९४) | ७४४ (११.९७) |
| २००४-०५ | ३४९३२ (१०.३२) | ८९३ (९.२४) | ६८ (९.८३) | ७३३ (११.७९) |
| २००५-०६ | ३५३५५ (१०.४५) | ८९५ (९.२६) | ५६ (८.०९) | ७४० (११.९०) |
| २००६-०७ | २९५९४ (८.७४) | ८८० (९.१०) | ७९ (११.४२) | ५०९ (८.१९) |
| २००७-०८ | ३०५२५ (९.०२) | ९४५ (९.७८) | ८७ (१२.५७) | ५१४ (८.२७) |
| २००८-०९ | ३११९१ (९.२२) | १०५५ (१०.९१) | ७१ (१०.२६) | ४२६ (६.८५) |
| २००९-१० | ३११९१ (९.२२) | १०५५ (१०.९१) | ७१ (१०.२६) | ६३५ (१०.२१) |
| **एकूण** | **३३८४५८ (१००%)** | **९६६६ (१००%)** | **६९२ (१००%)** | **६२१८ (१००%)** |

वरील तक्त्यात कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील कामगार संख्या, कारखान्यांची संख्या, बंद कारखाने आणि प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांची संख्येतील तफावत अभ्यासली आहे.

कामगारांच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कामगार संख्येतील तफावत ही ३३८४५८

असून सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.९९ टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००६-०७ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ८.७४ टक्के होती.

कारखान्याच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कारखान्याच्या संख्येतील तफावत ही ९६६६ असून सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.८९ टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००२-०३ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ९.१२ टक्के होती.

बंद कारखान्याच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात बंद कारखान्याच्या संख्येतील तफावत ही ६९२ असून सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण एकूण संख्येच्या १३.०१ टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००३-०४ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ६.९४ टक्के होती.

प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्याच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्याच्या संख्येतील तफावत ही ६२१८ असून सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण एकूण संख्येच्या १२.५० टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००८-०९ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ६.८५ टक्के होती.

एकंदरीत अकोला व कोल्हापूर या दोन जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील नोंदणी झालेल्या कारखान्याची संख्या, बंद कामगारांची संख्या आणि प्रपत्र पाठवून चालू कारखान्यांची संख्येतील तफावत अभ्यासता कोल्हापूर जिल्हा हा अकोला जिल्ह्यापेक्षा अग्रेसर असलेला आढळून येतो.

## आलेख क्र.५.४

## कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील कारखाने, कामगार,बंद कारखाने व प्रपत्र पाठविणाऱ्या कारखान्यातील तफावतीचे शेकडा प्रमाण दर्शविणारा आलेख



**नोंदणी झालेल्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर**

महाराष्ट्रातील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या चालू कारखान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१५**

**नोंदणी झालेल्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर**

**(२०००-०१ ते २००९-१०)**

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्यातील नोंदणी झालेले कारखाने | अकोला जिल्ह्यातील नोदंणी झालेले कारखाने |
|---|---|---|
| २०००-०१ | १५७८<br>(----) | ४२९<br>(----) |
| २००१-०२ | १४८२<br>(-६.०८) | ४७२<br>(१०.०२) |
| २००२-०३ | १४२२<br>(-४.०५) | ५२०<br>(१०.१७) |
| २००३-०४ | १४१४<br>(-०.५६) | ५३२<br>(२.३१) |
| २००४-०५ | १४३४<br>(१.४१) | ५४१<br>(१.६९) |
| २००५-०६ | १४३४<br>(०.००) | ५३९<br>(-०.३७) |
| २००६-०७ | १४६८<br>(२.३२) | ५८८<br>(८.३३) |
| २००७-०८ | १४९० <br>(१.४८) | ५४५<br>(-७.८९) |
| २००८-०९ | १६००<br>(६.८८) | ५४५<br>(०.००) |
| २००९-१० | १६००<br>(०.००) | ५४५<br>(०.००) |

स्त्रोत : जिल्हा सांख्यिकी कार्यालयातुन प्राप्त माहितीवरुन
(कंसातील आकडे टक्के%दर्शवितात.

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, २००१-०२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर -६.०८ टक्के म्हणजेच ऋणात्मक होता तर अकोला जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर १०.०२ टक्के इतका होता.

२००९-१० मध्ये कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या कारखान्यांचा वृध्दी दर हा २००८-०९ च्या तुलनेत ०.० टक्के होता.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००८-०९ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (६.८८ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी (-६.०८ टक्के) होता.

२००२-०३ ला अकोला जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त १०.१७ टक्के होता तर २००७-०८ ला सर्वात कमी (-७.८९ टक्के) होता.

**बंद झालेल्या कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर**

महाराष्ट्रातील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१६**

**बंद झालेल्या कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर**

**(२०००-०१ ते २००९-१०)**

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्यातीलल बंद झालेले कारखाने | अकोला जिल्ह्यातील बंद झालेले कारखाने |
|---|---|---|
| **२०००-०१** | १९१<br>(----) | १०१<br>(----) |
| **२००१-०२** | १६५<br>(-१३.६१) | १००<br>(-०.९९) |
| **२००२-०३** | १५९<br>(-३.६४) | १०२<br>(२.००) |
| **२००३-०४** | १५०<br>(-५.६६) | १०२<br>(०.००) |
| **२००४-०५** | १७०<br>(१३.३३) | १०२<br>(०.००) |
| **२००५-०६** | १७०<br>(०.००) | ११४<br>(११.७६) |
| **२००६-०७** | १७५<br>(२.८६) | ९६<br>(-१८.७५) |
| **२००७-०८** | १८०<br>(२.७८) | ९३<br>(-३.२३) |
| **२००८-०९** | १६४<br>(-९.७६) | ९३<br>(०.००) |
| **२००९-१०** | १६४<br>(०.००) | ९३<br>(०.००) |

**स्त्रोत : जिल्हा सांख्यिकी कार्यालयातुन प्राप्त माहितीवरुन**

**(कंसातील आकडे टक्के%दर्शवितात.**

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, २००१-०२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर -१३.६१ टक्के म्हणजेच ऋणात्मक होता तर अकोला जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर -०.९९ टक्के इतका म्हणजेच ऋणात्मक होता.

२००९-१० मध्ये कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांचा वृध्दी दर हा २००८-०९ च्या तुलनेत ०.० टक्के होता.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००४-०५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (१३.३३ टक्के) होता तर २००५-०६ ला सर्वात कमी (-१३.६१ टक्के) होता.

२००५-०६ ला अकोला जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त ११.७६ टक्के होता तर २००६-०७ ला सर्वात कमी (-१८.७५ टक्के) होता.

**प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर**

महाराष्ट्रातील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१७**
**प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर**
**(२०००-०१ ते २००९-१०)**

| वर्षे | कोल्हापूर जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या | अकोला जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या |
|---|---|---|
| **२०००-०१** | ९११<br>(----) | १३४<br>(----) |
| **२००१-०२** | ७५५<br>(-१७.१२) | १५७<br>(१७.१६) |
| **२००२-०३** | ६९६<br>(-७.८१) | १५४<br>(-१.९१) |
| **२००३-०४** | ८७४<br>(२५.५७) | १३०<br>(-१५.५८) |
| **२००४-०५** | ८९०<br>(१.८३) | १५७<br>(२०.७७) |
| **२००५-०६** | ८९०<br>(०.००) | १५०<br>(-४.४६) |
| **२००६-०७** | ६९४<br>(-२८.२४) | १८५<br>(१८.९२) |
| **२००७-०८** | ७०२<br>(१.१४) | १८८<br>(१.६०) |
| **२००८-०९** | ६१४<br>(-१४.३३) | १८८<br>(०.००) |
| **२००९-१०** | ८२३<br>(२५.३९) | १८८<br>(०.००) |

स्त्रोत : जिल्हा सांख्यिकी कार्यालयातुन प्राप्त माहितीवरुन
(कंसातील आकडे टक्के%दर्शवितात.

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, २००१-०२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर -१७.१२ टक्के म्हणजेच ऋणात्मक होता तर अकोला जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर १७.१६ टक्के इतका म्हणजेच धनात्मक होता.

२००९-१० मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर हा २५.३९ टक्के होता तर अकोला जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांचा वृध्दी दर हा २००८-०९ च्या तुलनेत ०.० टक्के होता.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००३-०४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (२५.५७ टक्के) होता तर २००६-०७ ला सर्वात कमी (-२८.२४ टक्के) होता.

२००४-०५ ला अकोला जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त २०.७७ टक्के होता तर २००३-०४ ला सर्वात कमी (-१५.५८ टक्के) होता.

### ५.५ निरनिराळ्या उद्योगातील रोजगार:

औद्योगिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा भाग म्हणून उद्योगातील रोजगाराकडे पाहिले जाते. अकोला आणि कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक विषमता अभ्यासतांना निरनिराळ्या क्षेत्रातील निर्माण रोजगाराची संख्या अभ्यासली आहे व त्याआधारे असमतोल अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. हे अध्ययन करण्यासाठी सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडातील कोल्हापूर व अकोला जिल्ह्यात निरनिराळ्या क्षेत्रात निर्माण रोजगाराचे अध्ययन केले आहे ते पुढीलप्रमाणे-

### कृषी उद्योगातील रोजगार

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.१८**

**कृषी क्षेत्रातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता**

**(२००० ते २०१०)**

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | --- | १४५० | १०.३२ |
| २००१-०२ | १२०५ | ८.८४ | १३८२ | ९.८३ |
| २००२-०३ | १५१९ | ११.१५ | १३५७ | ९.६५ |
| २००३-०४ | १४२६ | १०.४६ | १३४९ | ९.६० |
| २००४-०५ | १४२६ | १०.४६ | १३५१ | ९.६१ |
| २००५-०६ | २९५० | २१.६५ | १४५५ | १०.३५ |
| २००६-०७ | १३१६ | ९.६६ | १४०६ | १०.०० |
| २००७-०८ | १३१७ | ९.६६ | १४१२ | १०.०५ |
| २००८-०९ | १२११ | ८.८९ | १४४२ | १०.२६ |
| २००९-१० | १२५७ | ९.२२ | १४५२ | १०.३३ |
| **एकूण** | **१३६२७** | **१००.००** | **१४०५६** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कृषी क्षेत्राततील उद्योगातून निर्माण रोजगाराची संख्या १३६२७ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या २१.६५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.८४ टक्के होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कृषी क्षेत्राततील उद्योगातून निर्माण रोजगाराची संख्या १४०५६ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००५-०६ मध्ये निर्माण

झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १०.३५ टक्के होते.  तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.६० टक्के होते.

अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात कृषी क्षेत्रात निर्माण झालेल्या रोजगाराचे प्रमाण हे जास्त असलेले आढळून येते.  म्हणजेच रोजगाराच्या बाबतीत दोन्ही जिल्ह्यात विषमता असलेली आढळून येते. अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी उद्योगात निर्माण रोजगाराचे अध्ययन करणारा आलेख पुढीलप्रमाणे-

## आलेख क्र.५.५

# कोल्हापूर व अकोला जिल्ह्यातील कृषी उद्योगात निर्मित रोजगाराचे प्रमाण दर्शविणारा आलेख



**खाणकाम उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील खाणकाम उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.१९**

**खाणकाम उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता**

**(२००० ते २०१०)**

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | उ.ना. | १४० | १३.१५ |
| २००१-०२ | ०० | ०.०० | १३७ | १२.८६ |
| २००२-०३ | २६ | १.०४ | ९६ | ९.०१ |
| २००३-०४ | २०५ | ८.१७ | ८२ | ७.७० |
| २००४-०५ | २९ | १.१६ | ८९ | ८.३६ |
| २००५-०६ | ४८१ | १९.१६ | १०२ | ९.५८ |
| २००६-०७ | ४५८ | १८.२५ | १०२ | ९.५८ |
| २००७-०८ | ४५२ | १८.०१ | १०५ | ९.८६ |
| २००८-०९ | ४२७ | १७.०१ | १०५ | ९.८६ |
| २००९-१० | ४३२ | १७.२१ | १०७ | १०.०५ |
| **एकूण** | **२५१०** | **१००.००** | **१०६५** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील खाणकाम उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात खाणकाम उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या २५१० होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १९.१६ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००१-०२ मध्ये

निर्माण झाला असून त्याचे प्रमाण निरंक होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात खाणकाम उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या १०६५ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १३.१५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ७.७० टक्के होते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत अकोला जिल्ह्यात खाणकाम उद्योगात निर्माण झालेला रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

**वस्तू निर्माण उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील वस्तू निर्माण उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.२०**

**वस्तू निर्माण उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता**

**(२००० ते २०१०)**

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | उ.ना. | ५११९७ | १०.४४ |
| २००१-०२ | ५३७७ | २४.४३ | ४९७९४ | १०.१५ |
| २००२-०३ | ४६१८ | २०.९८ | ४९९८५ | १०.१९ |
| २००३-०४ | ३८३० | १७.४० | ४८४८० | ९.८८ |
| २००४-०५ | २०४६ | ९.३० | ४८७३९ | ९.९४ |
| २००५-०६ | १३६६ | ६.२१ | ४६४१८ | ९.४६ |
| २००६-०७ | १२१८ | ५.५३ | ४८६७४ | ९.९२ |
| २००७-०८ | १२२४ | ५.५६ | ४८६५५ | ९.९२ |
| २००८-०९ | ११३४ | ५.१५ | ४८६८३ | ९.९२ |
| २००९-१० | ११९८ | ५.४४ | ४९९२८ | १०.१८ |
| **एकूण** | **२२०११** | **१००.००** | **४९०५५३** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील वस्तू निर्माण उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात वस्तू निर्माण उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या २२०११ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या २४.४३ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००८-०९ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ५.१५ होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात खाणकाम उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या ४९०५५३ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १०.४४ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.४६ टक्के होते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात वस्तू निर्माण उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

**वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.२१**

**वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी**

**उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता (२००० ते २०१०)**

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | उ.ना. | ५०७० | ११.५५ |
| २००१-०२ | २७४७ | ८.३६ | ४८१० | १०.९६ |
| २००२-०३ | २७०८ | ८.२४ | ४७२२ | १०.७६ |
| २००३-०४ | २६४८ | ८.०५ | ४६४६ | १०.५९ |
| २००४-०५ | २५५९ | ७.७८ | ४८३० | ११.०० |
| २००५-०६ | ७०५९ | २१.४७ | ४३९६ | १०.०२ |
| २००६-०७ | ३७२४ | ११.३३ | ४५९५ | १०.४७ |
| २००७-०८ | ३७३२ | ११.३५ | ३५९५ | ८.१९ |
| २००८-०९ | ३७८० | ११.५० | ३५९५ | ८.१९ |
| २००९-१० | ३९१९ | ११.९२ | ३६३१ | ८.२७ |
| **एकूण** | **३२८७६** | **१००.००** | **४३८९०** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या ३२८७६ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या २१.४७ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ७.७८ होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या ४३८९० होती. सर्वाधिक रोजगार हा सन २०००-०१ मध्ये

निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या ११.५५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००७ ते २००९ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.१९ टक्के होते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

**बांधकाम उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील बांधकाम उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.२२**

**बांधकाम उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता (२००० ते २०१०)**

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | -- | ३२०७ | ९.०१ |
| २००१-०२ | १२८३ | १४.०७ | ३३५१ | ९.४२ |
| २००२-०३ | १३०० | १४.२६ | ३३२५ | ९.३४ |
| २००३-०४ | ११९५ | १३.११ | ३३२४ | ९.३४ |
| २००४-०५ | १५३१ | १६.७९ | ३४५९ | ९.७२ |
| २००५-०६ | ७५५ | ८.२८ | ३८७८ | १०.९० |
| २००६-०७ | ७३५ | ८.०६ | ४६७२ | १३.१३ |
| २००७-०८ | ७४३ | ८.१५ | ३४२२ | ९.६२ |
| २००८-०९ | ७७२ | ८.४७ | ३४६२ | ९.७३ |
| २००९-१० | ८०३ | ८.८१ | ३४८८ | ९.८० |
| **एकूण** | **९११७** | **१००.००** | **३५५८८** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील बांधकाम उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात बांधकाम उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या ९११७ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १६.७९ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००६-०७ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.०६ होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात बांधकाम उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या ३५५८८ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००६-०७ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १३.१३ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.०१ टक्के होते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात बांधकाम उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

**घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

## तक्ता क्रमांक ५.२३

## घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता (२००० ते २०१०)

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | --- | ४२५५ | ९.१४ |
| २००१-०२ | ११५३ | २.२० | ४२१४ | ९.०५ |
| २००२-०३ | ११०२ | २.१० | ४१९८ | ९.०२ |
| २००३-०४ | ८०७ | १.५४ | ४२१५ | ९.०५ |
| २००४-०५ | ८०३ | १.५३ | ४४२७ | ९.५१ |
| २००५-०६ | ९७४४ | १८.५६ | ४१३१ | ८.८७ |
| २००६-०७ | ९६६९ | १८.४२ | ५३९२ | ११.५८ |
| २००७-०८ | ९६८२ | १८.४४ | ५१०५ | १०.९६ |
| २००८-०९ | ९६२९ | १८.३४ | ५२०१ | ११.१७ |
| २००९-१० | ९९१७ | १८.८९ | ५४२२ | ११.६५ |
| **एकूण** | **५२५०६** | **१००.००** | **४६५६०** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या ५२५०६ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण १८.८९ होते तर सर्वात कमी रोजगार हा २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १.५३ टक्के होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगात निर्माण

रोजगाराची संख्या ४६५६० होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या ११.६५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.८७ टक्के होते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत अकोला जिल्ह्यात घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

**परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.२४**

**परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता (२००० ते २०१०)**

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | --- | ८७५७ | ४.१७ |
| २००१-०२ | ४४३६ | ८.२२ | ८६३४ | ४.११ |
| २००२-०३ | २९४३ | ५.४५ | ८५४५ | ४.०७ |
| २००३-०४ | ४१५२ | ७.६९ | ८३४४ | ३.९७ |
| २००४-०५ | २७५८ | ५.११ | ८५४५ | ४.०७ |
| २००५-०६ | ७४३९ | १३.७८ | २०१३७ | ९.५९ |
| २००६-०७ | ७५१७ | १३.९३ | ३६५३७ | १७.४० |
| २००७-०८ | ७५१९ | १३.९३ | ३६७७१ | १७.५१ |
| २००८-०९ | ८५९६ | १५.९३ | ३६७७१ | १७.५१ |
| २००९-१० | ८६०६ | १५.९५ | ३६९८० | १७.६१ |
| **एकूण** | **५३९६६** | **१००.००** | **२१००२१** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या ५३९६६ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १५.९५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ५.११ होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या २१००२१ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १७.६१ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ३.९७ टक्के होते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

**वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

## तक्ता क्रमांक ५.२५

## वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता (२००० ते २०१०)

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | --- | ११५९४ | १८.९७ |
| २००१-०२ | ३९१७ | ३.३५ | ११४७४ | १८.७७ |
| २००२-०३ | ४३६२ | ३.७३ | ११६१६ | १९.०० |
| २००३-०४ | २४९७८ | २१.३३ | ११४०४ | १८.६६ |
| २००४-०५ | ४०६८ | ३.४७ | ११९६२ | १९.५७ |
| २००५-०६ | १४७२६ | १२.५८ | २५५ | ०.४२ |
| २००६-०७ | १६६३५ | १४.२१ | ९२८ | १.५२ |
| २००७-०८ | १५६८३ | १३.३९ | ६२७ | १.०३ |
| २००८-०९ | १६११४ | १३.७६ | ६२७ | १.०३ |
| २००९-१० | १६६१३ | १४.१९ | ६३५ | १.०४ |
| **एकूण** | **११७०९६** | **१००.००** | **६११२२** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या ११७०९६ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००६-०७ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १४.२१ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ३.३५ होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या ६११२२ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १९.५७ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ०.४२ टक्के होते.

कोल्हापूर जिल्ह्यात सन २००५-०६ पासून वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगात रोजगाराच्या स्तरात सतत घट झालेली आढळून येते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत अकोला जिल्ह्यात वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

**सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगातील रोजगार**

अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगातील एकूण रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता पुढीलप्रमाणे-

**तक्ता क्रमांक ५.२६**

**सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी**

**रोजगाराची स्थिती अभ्यासणारा तक्ता(२००० ते २०१०)**

| वर्षे | अकोला जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण | कोल्हापूर जिल्ह्यातील रोजगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०००-०१ | उ.ना. | --- | ४३२९८ | ९.६९ |
| २००१-०२ | २४५२२ | ३३.२५ | ४३३३७ | ९.६९ |
| २००२-०३ | २४४६७ | ३३.१७ | ४४५१३ | ९.९६ |
| २००३-०४ | ०० | ०.०० | ४३९८९ | ९.८४ |
| २००४-०५ | २३८३२ | ३२.३१ | ४३८८५ | ९.८२ |
| २००५-०६ | २०८ | ०.२८ | ४४२७१ | ९.९० |
| २००६-०७ | १७२ | ०.२३ | ५६२१ | १.२६ |
| २००७-०८ | १७८ | ०.२४ | ५८७०३ | १३.१३ |
| २००८-०९ | १८६ | ०.२५ | ५९३०३ | १३.२७ |
| २००९-१० | १९२ | ०.२६ | ६००९२ | १३.४४ |
| **एकूण** | **७३७५७** | **१००.००** | **४४७०१२** | **१००.००** |

स्त्रोत-जिल्हा सांख्यिकीय कार्यालयातून प्राप्त माहिती

टिप- उ.ना.- उपलब्ध नाही

वरील तक्त्यात अकोला व कोल्हापूर जिल्ह्यातील सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासली आहे. अकोला

जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या ७३५७५ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या ३३.२५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण निरंक होते. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या ४४७०१२ होती. सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १३.४४ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.६९ टक्के होते.

वरील विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो. अकोला जिल्ह्यात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगांतर्गत निर्माण रोजगाराच्या पातळीतर उत्तरोत्तर घट झालेली असून कोल्हापूर जिल्ह्यात मात्र त्यात वाढ झालेली आढळून येते.

**५.६ अकोला आणि कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक निर्देशाकांचे अध्ययन :**

पश्चिम विदर्भातील अकोला जिल्हा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील प्रादेशीक असमतोल अभ्यासतांना काही निवडक औद्योगिक निर्देशांकाबाबत सर्वेक्षित संग्रहित माहितीच्या आधारे काही प्रमुख आकडे प्राप्त झालेले दिसून येतात. हे निर्देशक घटक अभ्यासतांना प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्रापासुन मिळणारे उत्पन्न, कामगारांची संख्या, विदर्भातील कारखान्यांची संख्या, बंद कारखाने, प्रपत्र पाठवून चालू कारखाने तसेच कृषी, खाणकाम, उद्योग इ. विविध क्षेत्रात निर्माण झालेला रोजगार अभ्यासला आहे. त्यांचे विवचेन पुढीलप्रमाणे

## तक्ता क्रमांक- ५.२७

## विदर्भातील जिल्हानिहाय औद्योगिक प्रादेशिक विषमतेच्या निर्देशकांचा एकत्रित अभ्यास (सन २०११-१२)

| जिल्हे | औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल उत्पन्न (रुपये लाखात) | औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त निव्वळ उत्पन्न (रुपये लाखात) | कामगारांची एकूण संख्या | नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या | बंद कारखान्यांची संख्या | पपत्र पाठवणारे चालू कारखान्यांची संख्या | विविध क्षेत्रातील रोजगार (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अकोला | २२७७९८ (६.७१) | २०७७२८ (६.९९) | ८९०६ (१२.३६) | ६२२ (१४.३७) | १३१ (१९.०७) | २६० (३२.२६) | ४२०७० (५.३७) |
| अमरावती | ३६३००६ (१०.७०) | ३२८७२२ (११.०६) | ४५०२ (६.२५) | ८१८ (१८.९०) | ६८ (९.९०) | २२३ (२७.६७) | ७३५५४ (९.३८) |
| भंडारा | ६९४७६ (२.०५) | ५६४४४ (१.९०) | ३९२१ (५.४४) | १३९ (३.२१) | १३ (१.८९) | ०० (०.००) | २९९१६ (३.८२) |
| बुलडाणा | १४४६८९ (४.२६) | २०१३३८ (६.७८) | ६०३३ (८.३७) | ४६४ (१०.७२) | ९२ (१३.८९) | १४२ (१७.६२) | ३९५७३ (५.०५) |
| चंद्रपूर | ४७०८१० (१३.८७) | ३९१६७५ (१३.१८) | १२६८२ (१७.६०) | २०९ (४.८३) | २१ (३.०६) | ०० (०.००) | ८३७७४ (१०.६९) |
| गडचिरोली | ५७९९९ (१.७१) | ४९१३५ (१.६५) | ८८८ (१.२३) | ५२ (१.२०) | ०६ (०.८७) | ०० (०.००) | २३४३६ (२.९९) |
| गोंदीया | २०००२१ (५.८९) | १६८२२८ (५.६६) | ४५७ (०.६३) | ११६ (२.६८) | २७ (३.९३) | ०० (०.००) | १६६९७ (२.१३) |
| नागपूर | ११८५६१९ (३४.९४) | ९८२८५९ (३३.०८) | २०६४६ (२८.६५) | १२३२ (२८.४६) | १९९ (२८.९७) | ०० (०.००) | ३५९५०९ (४५.८७) |
| वर्धा | १७३३४६ (५.११) | १४७५१५ (४.९६) | ७२५२ (१०.०६) | १६९ (३.९०) | ३५ (५.०९) | ०० (०.००) | ३९८५१ (५.०८) |
| वाशीम | ५९२३२ (१.७५) | ५४८६२ (१.८५) | ७४१ (१.०३) | १५५ (३.५८) | ४३ (६.२६) | ३९ (४.८४) | ११३८६ (१.४५) |
| यवतमाळ | ४४१५९६ (१३.०१) | ३८२९६० (१२.८९) | ६०२८ (८.३७) | ३५३ (८.१५) | ५२ (७.५७) | १४२ (१७.६२) | ६४०१६ (८.१७) |
| **एकूण** | **३३९३५९२ (१००%)** | **२९७१४६६ (१००%)** | **७२०५६ (१००%)** | **४३२९ (१००%)** | **६८७ (१००%)** | **८०६ (१००%)** | **७८३७८२ (१००%)** |

(स्त्रोत: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई)

टिप -कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

उपरोक्त तक्त्यात विदर्भात समाविष्ट ११ जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील विषमतेचा अभ्यास केला आहे. विदर्भात समाविष्ट अकरा जिल्ह्यातील औद्योगिक विषमता दर्शविणारे निर्देशक अभ्यासून त्याआधारे संशोधनाचे क्षेत्र असणाऱ्या अकोला जिल्ह्याची औद्योगिक स्थिती अभ्यासली आहे. त्यानुसार समोर आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे

- § विदर्भाला औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे एकुण स्थुल उत्पन्न हे ३३,९३,५९२ लाख रुपये असून या उत्पन्नाच्या ६.७१ टक्के उत्पन्न अकोला जिल्ह्यास प्राप्त झालेले आहे.
- § विदर्भाला औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे एकूण निव्वळ उत्पन्न हे २९,७१,४६६ लाख रुपये असून या उत्पन्नाच्या ६.९९ टक्के उत्पन्न अकोला जिल्ह्यास प्राप्त झालेले आहे.
- § औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या एकूण कामगारांची विदर्भातील संख्या ७२०५६ असून यापैकी ८९०६ (१२.३६ टक्के) कामगार हे अकोला जिल्ह्यात असलेले आढळून येतात.
- § विदर्भातील नोंदणी झालेल्या कारखान्यांची एकूण संख्या ४३२९ असून यापैकी ६२२ (१४.६७ टक्के) कारखाने अकोला जिल्ह्यात आहेत.
- § विदर्भातील बंद कारखान्यांची संख्या ६८७ असून यापैकी १३१ (१९.०७ टक्के) कारखाने हे अकोला जिल्ह्यात असलेले आढळून येतात.
- § विदर्भातील पपत्र पाठवून चालू असणाऱ्या कारखांन्याची उपलब्ध संख्या ८०६ असून यापैकी २६० (३२.२६ टक्के) कारखाने अकोला जिल्ह्यात आढळतात.
- § विदर्भात विविध क्षेत्रात निर्माण झालेला एकूण रोजगार ७,८३,७८२ असून यापैकी ४२०७० (५.३७ टक्के) रोजगार अकोला जिल्ह्यात निर्माण झालेला आढळतो.

## तक्ता क्रमांक-५.२८

## पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हानिहाय औद्योगिक प्रादेशिक विषमतेच्या निर्देशकांचा एकत्रित अभ्यास (सन २०११-१२)

| जिल्हे | औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल उत्पन्न (रुपये लाखात) | औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त निव्वळ उत्पन्न (रुपये लाखात) | कामगारांची एकूण संख्या | नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या | बंद कारखान्यांची संख्या | पपत्र पाठवणारे चालू कारखान्यांची संख्या | विविध क्षेत्रातील रोजगार (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ५१२०८० (५.०३) | ४५३००५ (५.४१) | २४२४ (०.५८) | ७६३ (४.२५) | १३२ (३.९७) | ३८७ (६.४१) | **१३२४८२ (७.८३)** |
| धुळे | २३०४६० (२.२७) | १८८३०९ (२.२५) | ९४५१ (२.२६) | ४३६ (२.४३) | २८ (०.८४) | २२६ (३.७४) | ५६३८४ (३.३३) |
| जळगाव | ६६८२५१ (६.५७) | ५५०४०९ (६.५७) | १९८१० (४.७४) | ७७७ (४.३३) | ४४ (१.३२) | ३५१ (५.८१) | ११७५७८ (६.९५) |
| **कोल्हापूर** | **७१०५०३ (६.९८)** | **२९०३८३ (३.४७)** | **५५३३० (१३.२४)** | **१८६७ (१०.४०)** | **१९८ (५.९६)** | **८९४ (१४.८०)** | **१५९०३५ (९.४१)** |
| नाशिक | १९७९५६१ (१९.४६) | १६६७५५८ (१९.९१) | ६६३३६ (१५.८७) | १८११ (१०.०९) | १२९ (३.८८) | ९२५ (१५.३१) | १९७६६१ (११.६९) |
| पुणे | ४५८४१८० (४५.०६) | ३९०८७८८ (४६.६८) | २१३०५९ (५०.९७) | ५३१७ (२९.६१) | ११६५ (३५.०८) | १६२४ (२६.८८) | ८३९०३७ (४९.६२) |
| सातारा | ४७१८६२ (४.६४) | ४००८११ (४.७९) | १५०१५ (३.५९) | ४७० (२.६२) | ४१ (१.२३) | १६३ (२.७०) | १५०१५ (०.८९) |
| सांगली | २९३४०० (२.८८) | २८९८५१ (३.४६) | १६६५३ (३.९८) | ८५५ (४.७६) | ६१ (१.८४) | ३४९ (५.७८) | ८४८५६ (५.०२) |
| सोलापूर | ७२३६९२ (७.११) | ६२४६७१ (७.४६) | १९९२५ (४.७७) | ५६५९ (३१.५२) | १५२३ (४५.८६) | ११२२ (१८.५७) | ८८९०३ (५.२६) |
| **एकूण** | **१०१७३९८९ (१००%)** | **८३७३७८५ (१००%)** | **४१८००३ (१००%)** | **१७९५५ (१००%)** | **३३२१ (१००%)** | **६०४१ (१००%)** | **१६९०९५१ (१००%)** |

**(स्त्रोत: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई)**

**टिप -कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.**

उपरोक्त तक्त्यात पश्चिम महाराष्ट्रात समाविष्ट ०९ जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील विषमतेचा अभ्यास केला आहे. पश्चिम महाराष्ट्रात समाविष्ट ०९ जिल्ह्यातील औद्योगिक विषमता दर्शविणारे निर्देशक अभ्यासून त्याआधारे संशोधनाचे क्षेत्र असणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्याची औद्योगिक स्थिती अभ्यासली आहे. त्यानुसार समोर आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे

§ पश्चिम महाराष्ट्राला औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे एकूण स्थुल उत्पन्न हे १,०१,७३,९८९ लाख रुपये असून या उत्पन्नाच्या ६.९८ टक्के उत्पन्न कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त झालेले आहे.

§ पश्चिम महाराष्ट्राला औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे एकूण निव्वळ उत्पन्न हे ८३,७३,७८५ लाख रुपये असून या उत्पन्नाच्या ३.४७ टक्के उत्पन्न कोल्हापूर जिल्ह्यास प्राप्त झालेले आहे.

§ औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या एकूण कामगारांची पश्चिम महाराष्ट्रातील संख्या ४१८००३ असून यापैकी ५५३३० (१३.२४ टक्के) कामगार हे कोल्हापूर जिल्ह्यात असलेले आढळून येतात.

§ पश्चिम महाराष्ट्रातील नोंदणी झालेल्या कारखान्यांची एकूण संख्या १७९५५ असून यापैकी १८६७ (१०.४० टक्के) कारखाने कोल्हापूर जिल्ह्यात आहेत.

§ पश्चिम महाराष्ट्रातील बंद कारखान्यांची संख्या ३३२१ असून यापैकी १९८ (५.९६ टक्के) कारखाने हे कोल्हापूर जिल्ह्यात असलेले आढळून येतात.

§ पश्चिम महाराष्ट्रातील पपत्र पाठवून चालू असणाऱ्या कारखांन्याची उपलब्ध संख्या ६०४१ असून यापैकी ८९४ (१४.८० टक्के) कारखाने कोल्हापूर जिल्ह्यात आढळतात.

§ पश्चिम महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात निर्माण झालेला एकूण रोजगार १६,९०,९५१ असून यापैकी १५९०३५ (९.४१ टक्के) रोजगार कोल्हापूर जिल्ह्यात निर्माण झालेला आढळतो.

अशाप्रकारे प्रस्तुत प्रकरणात संग्रहीत सामग्रीच्या आधारे कोल्हापूर आणि अकोला जिल्ह्यातील औद्योगिक प्रादेशिक विषमतेचे अध्ययन केले आहे.

# ¯Öa¸ú¸ü¸Ö 6 ¾Ö

## ¯ÖÖ¤ü×¿Ö¿ú †ÃÖ´ÖÖÖ»Ö²Ö²ÖÖ Ã£ÖÖ×¯ÖÖ

## ÃÖ×´ÖÖªÖÖ“ªÖÖ ×¿Ö±úÖ¸ü¿Öà“Ö †¬ªÖªÖ−Ö

6.1 ¯ÖÃÖÖÖ¾Ö−ÖÖ

6.2 ¤üÖ›ü¸ú¸ü ÃÖ×´ÖÖß“ÖÖ †Æ¾ÖÖ»Ö (‹×¯Ö»Ö 1984) :
×¿Ö±úÖ¸ü¿Öß †Ö×¸üÖ †´Ö»Ö²Ö•ÖÖ¾Ö¸üÖß

6.3 ×−Ö¤ü¿ÖÖ¸ú ¾Ö †−Ö¿ÖÂÖ ÃÖ×´ÖÖß“ÖÖ †Æ¾ÖÖ»Ö

# प्रकरण सहावे

# प्रादेशिक असमतोलाबाबत स्थापित समित्यांच्या शिफारशींचे अध्ययन

**६.१ प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील असमतोल दूर करण्यासाठी अनेक समित्यांची स्थापना करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने दांडेकर समितीचा नामोल्लेख करावा लागतो. किंबहुना प्रादेशिक असमतोल म्हटला की, दांडेकरांचे नाव आपोआपच समोर येते. दांडोकरच्या अध्यक्षतेखाली १९८३ मध्ये स्थापित समिती ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल अभ्यासण्यासाठी स्थापित करण्यात आली होती. परंतु आज तब्बल ३० वर्षानंतर या समितीने सादर केलेल्या अहवालाकडे पाहील्यास संपूर्ण चित्र बदलून गेल्याचे दिसते. कारण या दिर्घकालावधीमध्ये अर्थव्यवस्थेने अनेक वळणे घेतलेली आढळतात. यामध्ये प्रामुख्याने आपल्या अर्थव्यवस्थेला लागलेले एक वळन म्हणजे १९९१ मध्ये स्वीकारण्यात आलेले जागतिकीकरणाचे धोरण होय. या धोरणाचा प्रभाव महाराष्ट्रावरही मोठ्या प्रमाणात झाला. जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले, मुक्त स्पर्धा आणि विदेशी व्यापाराची थेट प्रत्यक्ष गुंतवणूक यामुळे प्रत्येक क्षेत्राचे चित्र बदलले, असे असले तरी दांडेकरांनी दाखवलेली विषमतेची दरी मात्र अजुनही बुजलेली नाही. तर अविकसित आणि मागासभाग आणि विकसित भाग यातील दरी आणखीच वाढलेली आढळते.

वि.म.दांडेकर यांच्या समितीच्या सत्यशोधन अहवालानुसार विकासातील असमतोल अभ्यासण्यासाठी त्यांनी ९ क्षेत्रांचा आधार घेतला. या नऊ क्षेत्रामधील विविध विभागातील असमतोलावरुन समितीने प्रत्येक क्षेत्राकरीता ८५ आणि १५ या सुत्राचा वापर केला आहे. म्हणजेच अविकसित क्षेत्राच्या विकासासाठी ८५ प्रतिशत अनुशेष आणि विकसित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम भांगांना अनुशेषाचा १५ प्रतिशत भाग द्यावा ज्यामुळे विषमतेची दरी बुजवता येईल. ही त्यांच्या अहवालाचा सर्वात मोठी आणि महत्त्वाची शिफारस असलेली आढळून येते. एकंदरीत प्रादेशिक

असमतोलाचे जागतिकीकरणाच्या अगोदर पासून चित्र रंगविणारी ही सत्यशोधन समिती एक महत्त्वपूर्ण समिती असून या समितीने दाखविलेली दरी आजही आपणास पहावयास मिळते. या समितीने केलेल्या अध्ययनाचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे करता येते.

**६.२ दांडेकर समितीचा अहवाल (एप्रिल १९८४): शिफारशी आणि अंमलबजावणी**

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील आर्थिक विकासात फार मोठी तफावत आहे अशी सामान्य जनतेची भावना विधानसभेत अनेक नेत्यांनी व्यक्त केल्यामुळे महाराष्ट्र शासनाने ३ ऑगस्ट १९८३ मध्ये सुप्रसिध्द अर्थतज्ज्ञ प्रा. वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समितीची स्थापना केली होती. या समितीचा अहवाल महाराष्ट्रातील विभागीय असमतोल, सत्यशोधन समितीचा अहवाल या नावाने एप्रिल १९८४ साली प्रसिध्द झाला. हा अहवाल ४९३ पानी होता.

**समितीची कार्यक्षमता :**

१. विभागीय विकासाचा असमतोल काढण्यासाठी निर्देशांक निश्चित करणे.
२. महाराष्ट्र राज्याची सरासरी विकास पातळी निश्चित करून जिल्ह्या-जिल्ह्यातील असमतोल निश्चित करणे.
३. विभागीय असमतोल दूर करण्यासाठी शासनास योग्य सूचना करणे आणि असमतोल पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी दीर्घकालीन उपाय सुचविणे.

**आर्थिक क्षेत्रे आणि निर्देशकाची निवड :**

समितीने विकासाचा विभागीय अनुशेष काढण्यासाठी पुढील प्रमुख ९ आर्थिक क्षेत्रांची निवड केली.

१) रस्ते

२) सिंचन

३) ग्रामीण विद्युतिकरण

४) सर्वसाधारण शिक्षण

५) तांत्रिक शिक्षण

६) सार्वजनिक आरोग्य

७) पिण्याचा पाणीपुरवठा

८) भूविकास व मृदासंधारण

९) पशुसंवर्धन

प्रत्येक क्षेत्रात उपक्षेत्रांचीही निवड करण्यात आली. उदा. रस्ते या क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते असे उपविभाग पाडण्यात आले. ९ क्षेत्राच्या अशा उपविभागांची एकूण संख्या ३० आहे. तसेच प्रत्येक क्षेत्रात व उपक्षेत्रात निर्देशांकाची निवड करण्यासाठी प्रामुख्याने लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्र हे दोन प्रमुख घटक निवडण्यात आले.

**अनुशेष काढण्याची पध्दत :**

जिल्हा हा प्रशासकीय आणि नियोजनाचा घटक असल्यामुळे तसेच जिल्हा पातळीवर अधिक परिपूर्ण माहिती व आकडेवारी उपलब्ध असल्यामुळे दांडेकर समितीने अनुशेष मोजण्यासाठी जिल्हा हा घटक विचारात घेतला. याला फक्त सिंचन क्षेत्र अपवाद केले व सिंचनाचा अनुशेष काढण्यासाठी तालुका हा घटक विचारण्यात घेण्यात आला. यासाठी फक्त दुष्काळ ग्रस्त तालुकेच निवडण्यात आले.

अनुशेष काढतांना प्रत्येक क्षेत्रात राज्याची सरासरी काढून नंतर प्रत्येक जिल्ह्याची त्या-त्या क्षेत्राची सरासरी काढण्यात आली. जे जिल्हे राज्य सरासरीपेक्षा कमी असतील अशा जिल्ह्यांनाच अनुशेष देण्यात आला. राज्य सरासरीच्या वर असणाऱ्या जिल्ह्यांना वगळण्यात आले.

अनुशेष काढतांना प्रथम तो भौतिक स्वरूपात काढण्यात आला. उदा. हेक्टरमध्ये सिंचन क्षेत्र, रस्त्यांची लांबी कि.मी. मध्ये इ. नंतर या भौतिक अनुशेषाचे मौद्रिक स्वरूपात चालू किंमतीला (१९८२) रूपांतर करण्यात आले. महत्वाची गोष्ट म्हणजे, अनुशेष काढतांना समितीने फक्त शासकीय खर्च व शासन सहाय्य असलेल्या कार्यक्रम /प्रकल्पानाच समावेश केला. खाजगी क्षेत्राला त्यातून पूर्णपणे वगळण्यात आले.

महाराष्ट्रातील सर्व विभागांचा अनुशेष काढण्यासाठी त्या-त्या विभागातील जिल्ह्यांचा एकूण अनुशेषाची बेरीज करण्यात करण्यात आली. महाराष्ट्रातील विभागावर अनुशेष पुढील तक्यात दर्शविला आहे. महाराष्ट्र राज्याचा विभागावर विकास अनुशेष (रू. लाखात)

**तक्ता क्र. ६.१**

**महाराष्ट्र राज्याचा विभागवार विकास अनुशेष (रू.लाखात)**

| अ.क्र. | विभाग | अनुशेष | एकूणाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | ९७०.५५ | ०.३० |
| २ | कोकण | २९५६१.९१ | ९.१८ |
| ३ | पश्चिम महाराष्ट्र | ८८४०५.१० | २७.७४ |
| ४ | मराठवाडा | ७५०८५.७४ | २३.५६ |
| ५ | विदर्भ | १२४६५४.५१ | ३९.१२ |
| ६ | महाराष्ट्र | ३१८६७७.८१ | १००.०० |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सर्वाधिक विकासाचा अनुशेष १२४६.५४ कोटी रू. (३९.१२ प्रतिशत) विदर्भाचा आहे. तर दुसरा क्रमांक (२७.७४ प्रतिशत) पश्चिम महाराष्ट्राचा आहे तिसरा क्रमांक मराठवाडा (२३.५६ प्रतिशत, चौथा क्रमांक (९.२८ प्रतिशत) कोकण विभागाचा तर मुंबई शहराचा अनुशेष सर्वात कमी म्हणजे ०.३ प्रतिशत आहे. म्हणजेच दांडेकरांनी आपल्या अहवालात विदर्भ आणि

मराठवाडा यांना मागास भाग असल्यामुळे अनुशेषाचा जास्त हिस्सा दिल्याचे लक्षात येते.

**दांडेकर समितीच्या शिफारशी व अंमलबजावणी :**

- राज्याच्या प्रत्येक विभागातील अनुशेष शक्यतो त्वरीत दूर व्हावा म्हणून प्रत्येक क्षेत्रीय योजनेपैकी ८५ प्रतिशत रक्कम केवळ त्या क्षेत्राचा अनुशेष दूर करण्यासाठी वापरावी व उर्वरीत १५ प्रतिशत रक्कम चालू प्रकल्प व नैसर्गिक वृध्दी यावर खर्च करावी व ती जिल्ह्यामध्ये समान वाटावी असे सुचविले.

- अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया १९८२-१९८३ चा अनुशेष दूर झाला म्हणजे संपणारी नव्हती. म्हणून समितीने, दर ५ वर्षांनी याबाबत आढावा घ्यावा असे सुचविले होते.

- प्रादेशिक विषमता कमी करण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणारे संविधीक प्राधिकरण असावे हे प्राधिकरण प्रादेशिक किंवा राजकीय तसेच एक समिती व मंडळ असू नये ते एका व्यक्तीचे असावे तो व्यक्ती मात्र राजकारणी नसावा तर त्याची भूमिका ही काहीशी न्यायधिशासारखी असावी. विकासातील प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी कार्यान्वित केलेल्या प्रक्रियेवर बारीक नजर ठेवण्यासाठी आणि राज्य विधानमंडळास वार्षिक अहवाल सादर करण्यासाठी असे संविधीक प्राधिकरण निर्माण करावे अशी त्यांनी सुचविले होते.

परंतू, दांडेकर समितीचा अहवाल अजूनही महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे स्वीकारलेला नाही. तरीसुध्दा समितीने काढलेला विभागवार व जिल्हावार अनुशेष दूर करण्यासाठी शासन दरवर्षी काही रक्कम अनुशेष खर्च म्हणून

वेगळा करते. समितीने काढलेला अनुशेष फार मोठा सुमारे ३२०० कोटी रूपये असल्यामुळे तो ५ वर्षात (७ व्या योजनेत) पूर्ण करणे शासनास शक्य नव्हते. महाराष्ट्राची सातवी योजना १०५०० कोटी रूपयांची होती. त्यापैकी केवळ १४ प्रतिशत रक्कम अनुशेष दूर करण्यासाठी ठेवली. प्रत्यक्षात १२ प्रतिशत खर्च करण्यात आली. आठव्या योजनेमध्ये अनुशेषासाठी २४५६ कोटी रूपये तरतुद करण्यात आली होती. मात्र या कालावधीत भाववाढ झाल्यामुळे वास्तविक अनुशेष आणखी वाढल्यामुळे त्याचे पुनर्मूल्यांकन करून तो कमी करण्याचे कार्य शासनातर्फे चालू आहे.

**विभागीय औद्योगिक अनुशेष :**

महाराष्ट्र राज्य शासनाने १९६० पासून विभागीय समतोल औद्योगिक विकासासाठी आपल्या धोरणांची रचना अशारितीने केली की, जेणेकरून पूणे, मुंबई, परिसरात केंद्रित झालेले उद्योग राज्याच्या अविकसित विभागामध्ये जावेत. याकरिता शासनाने काही विशेष सवलती उद्योजकांना दिल्यात. शिवाय औद्योगिक विकास साधण्यासाठी त्या स्वरूपाच्या संस्थांची उभारणी देखील केली. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळे जसे, विदर्भ विकास महामंडळ शिवाय उद्योजकांच्या विविध संघटनांची निर्मीती देखील झाली या सर्व संस्थाच्या निर्मीतीमधून औद्योगिक विकासाला गती निश्चितपणे मिळाली. राज्याच्या औद्योगिक विकासात वाढ देखील झाली. परंतू विदर्भासारखे प्रदेश जे अविकसित होते, ते ह्या प्रयत्नानंतर देखील अविकसितच राहिले. असा निष्कर्ष महाराष्ट्र शासनाने डॉ. वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या सत्यशोधन समितीने पुढील सांख्यिकीयवरून काढला आहे.[१]

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योजकांना स्वस्त दराने भुखंड आणि गाळे व उद्योगासाठी लागणाऱ्या अनुषांगिक सुविधा व इतर सोयी उपलब्ध करून देते. महामंडळाने ३१ मार्च १९७४ पर्यंत ५४१९ जागा पाडल्यात आणि

त्यापैकी ३७८७ चे वाटप करण्यात आले. ३१ मार्च १९७४ ते ३१ मार्च १९८३ पर्यंत १५९८० भुखंड पाडलेत आणि त्यापैकी १३६४४ चे वाटप करण्यात आले. पाडण्यात आलेल्या भुखंडांपैकी वाटप झालेल्या जागांचे प्रतिशत प्रमाण ३१ मार्च १९८३ रोजी पुढीलप्रमाणे होते. मुंबई महानगर प्रदेश ८७.६३, पश्चिम महाराष्ट्र मुंबई महानगर प्रदेश वगळून ८९.८३, कोकण ८३.६६, मराठवाडा ८१.२४ आणि विदर्भ केवळ ७५.५० प्रतिशत होते.

सध्यस्थितीमध्ये (२०११-२०१२) वरील प्रमाणे मिळते. मुंबई महानगरामध्ये ३६८ भुखंडापैकी ३६५ भुखंडाचे वितरण झालेले दिसून येते. म्हणजेच (९९.२%) भुखंडाचे वितरण झालेले आहे पश्चिम महाराष्ट्रामध्ये हेच प्रमाण १७४७६ भुखंडापैकी १५९१७ म्हणजे ९१.१% चे वितरण झालेले आहे. विदर्भाचा विचार करता ४७४७ भुखंडापैकी ३५२६ म्हणजेच ७४.३% भुखंडाचे वितरण झालेले दिसून येते.[२]

म्हणजेच अजुनही भुखंडाच्या वाटपाबाबत विषमता निदर्शनात येत असुन दांडेकरांनी सुचविलेल्या शिफारशीप्रमाणे जरी भुखंडाचे वाटप झाले असले तरी अविकसीत भागात मात्र त्याचे वितरण योग्य प्रमाणात झालेले आढळून येत नाही. एकूण भुखंड वाटपाचा विचार करता महाराष्ट्रामध्ये ७०९६६ भुखंडापैकी ६२५९३ म्हणजेच ८८.२% भुखंडाचे वाटप झाल्याचे आढळते. यापैकी विदर्भाच्या वाटयाला ५.३३% ऐवढे तर पश्चिम महाराष्ट्राच्या वाटयाला २५.४३% एवढे भुखंडाचे वाटप आहे.

महामंडळाने ३१ मार्च १९७४ पर्यंत २१७ गाळ्यांचे वाटप केले. १९७४-१९८३ ह्यादरम्यान १९६६ गाळ्याचे वाटप करण्यात आले. अशाप्रकारे आरंभापासून ३१ मार्च १९८३ अखेरपर्यंत वाटप केलेल्या २१८३ गाळ्यांपैकी ५१.२१ प्रतिशत गाळे एकट्या मुंबई महानगर प्रदेशामध्ये वितरीत करण्यात आलेत. गाळ्यांचे दरडोई वाटप प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात २.७४, मराठवाडा १.५९, कोकण मुंबई महानगर प्रदेश वगळता १.५४ आणि विदर्भ मात्र १.३१ असे होते.

१९७४ ते १९८३ ह्या कालावधीत महामंडळाने केलेल्या विभागवार खर्चाकडे लक्ष दिल्यास, १९८३ अखेरपर्यंत १५०.२८ कोटी खर्च केला गेला. १९७४ पर्यंत खर्च करण्यात आलेल्या ३७.६२ कोटी रूपयांपैकी ७२.०२ प्रतिशत राशी केवळ मुंबई महानगर प्रदेशामध्येच खर्ची पडली मात्र १९८३ अखेरपर्यंत महामंडळाने कोकण विभागावर रू. ३५.०२ कोटी, पश्चिम महाराष्ट्रावर रू.३०.४४ कोटी, मराठवाड्यावर ७.२१ कोटी आणि विदर्भाच्या बाबतीत हा खर्च केवळ ९.८७ कोटी होता. ह्या खर्चाचे प्रतिव्यक्ति प्रमाण कोकण विभागबाबत मुंबई महानगर प्रदेश वगळता रू. ५०.३९, पश्चिम महाराष्ट्रात रू. १२.९४, मराठवाड्यात रू. ७.४१ तर विदर्भात सर्वात कमी म्हणजे केवळ रू ६.९५ एवढेच होत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या सध्यस्थितीतील विभागवार खर्चाचा विचार करता २०१२ पर्यंत ८९६९४ रु. कोटी खर्च केला गेला असुन विभागवार खर्चाचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रातील एकूण खर्च ३८७७१ कोटी असुन तो एकूण खर्चाच्या ४३.२३% झालेले आढळतो. तर पश्चिम विदर्भामध्ये हेच खर्चाचे प्रमाण ३०७९ कोटी रु. असून तो एकूण खर्चाच्या केवळ ३.४३% करण्यात आला वरिल आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की खर्चाच्या बाबतीत सुध्दा दांडेकरांनी सुचविलेल्या शिफारशीचे अनुकरण झालेले नाही.[३]

ह्या कालावधीत महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये प्रतिव्यक्ति व प्रतिकामगार झालेली गुंतवणूक १९७४ ते १९८३ ह्या काळात मुंबई वगळता कोकणात प्रतिव्यक्ति रू. २६६ तर प्रतिकामगार रू. १.३४ लाख गुंतवणूक झाली. पश्चिम महाराष्ट्राबाबत ही आकडेवारी अनुक्रमे रू. २५५ व रू ८८७४८ होती. मराठवाड्यामध्ये प्रमाण रू१०५ व रू. .७०९६२ असून विदर्भाच्या बाबतीत सर्वात कमी रू. ४१ व रू. ४४४०८ होती. मार्च १९८३ पर्यंत महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये दर एक लाख लोकसंख्येच्या मागे कामगारांचे प्रमाण बृहन्मुंबईत १२४३,कोकण २१३,पश्चिम महाराष्ट्र ३३५ मराठवाडा २०३ व विदर्भात केवळ १०९ होते.

महाराष्ट्रातील औद्योगिक वसाहतीची सध्यस्थिती अभ्यासता रोजगाराचे प्रमाण अभ्यासता दांडेकरांनी सुचविलेल्या शिफारशीनुसार रोजगाराच्या बाबतीत अनुकरण झालेले आढळून येत नाही. तर पश्चिम महाराष्ट्राचा विचार करता दर लाख रोजगारामागे ५७१ लोकांना रोजगार प्राप्त झाला असून पश्चिम विदर्भातील हे प्रमाण केवळ ६७ आहे. म्हणजेच एकूण महाराष्ट्रातील (१,३७,०८२) रोजगारापैकी पश्चिम महाराष्ट्रात ५७१५० (४१.६९%) आणि विदर्भात केवळ ६७७ म्हणजेच (०.४९%) रोजगार प्राप्त झालेला आढळून येतो.[४]

महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळाने १९८३ अखेरपर्यंत कोकण विभागात रू. ७२.३१ कोटी पतपूरवठा केलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात ६४ कोटी तर मराठवाड्यात रू. २३.८० कोटी पतपूरवठा केला. विदर्भात मात्र ३० कोटी पतपूरवठा करण्यात आला होता. प्रतिव्यक्ति पतपूरवठ्याचे प्रमाण कोकणात रू. १०४, पश्चिम महाराष्ट्रात रू. २७, मराठवाड्यात रू.२४ तर विदर्भात सर्वात कमी म्हणजे रू. २० होते.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम) ही संस्था १९६६ साली स्थापन करण्यात आली. मुंबई महानगर प्रदेश व पूणे महानगर प्रदेश हे दोन प्रदेश सिकॉमच्या कार्यक्षेत्रामधून वगळण्यात आले. सिकॉमने मार्च १९८३ पर्यंत एकंदर ३.६ कोटी रूपयांचे कर्ज मंजूर केले. यापैकी ३५ प्रतिशत कोकण विभागात, २९ प्रतिशत पश्चिम महाराष्ट्रात, व १३ प्रतिशत मराठवाड्यात आणि १९ प्रतिशत विदर्भ अशा स्वरूपात वितरण झाले. वितरणाचे प्रतिव्यक्ति प्रमाण कोकणच्या बाबत रू. १०४, पश्चिम महाराष्ट्रात रू. २५, मराठवाडा रू.२९ आणि विदर्भामध्ये रू. २७ होते

उपरोक्त व्यवस्थाव्यतिरिक्त शासनाने अनेकवेळा प्रोत्साहन योजना जाहीर केल्यात. यामध्ये प्रकल्प अहवालाच्या खर्चातील सहभाग, सवलतीच्या दराने विज पूरवठा, विक्रीकरात सूट कामगारांचे प्रशिक्षण, शासकीय खरेदीमध्ये अग्रक्रम, पाण्याचे अधिकार शुल्क व एन.अे. असेसमेंट पासून मुक्तता यांचा समावेश होता. ह्या

विविध प्रोत्साहनपर योजनांव्दारे १९७४ ते १९८३ ह्या कालावधीत कोकणातील उद्योगांनारू. २३.६२ कोटीची मदत पूरविण्यात आली, पश्चिम महाराष्ट्राला रू. २८.४६ कोटी मराठवाड्याला रू. ७.३१ कोटी तर विदर्भाला रू. १०.५७ कोटी प्राप्त झाले. प्रतिव्यक्ति प्रमाणाचा विचारकेल्यास विदर्भाचा अखेरचा क्रमांक लागतो. हे प्रमाण कोकण विभागाला रू. ३४, पश्चिम महाराष्ट्र रू. १२.११, मराठवाडा रू.७.५३ तर विदर्भाला रू. ७.३८ असे होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिकॉम, महावित्त यांचे विविध प्रोत्साहन योजनांव्दारे झालेले एकत्रीत अर्थसहाय्य १९७४ ते १९८३ ह्या कालावधीत कोकण विभागाला १०० कोटी रूपये, पश्चिम महाराष्ट्राला १६० कोटी रूपये मराठवाडा रू. ६३ कोटी तर विदर्भाला रू. ८१ कोटी. परंतू प्रतिव्यक्ति सहाय्याचे प्रमाण कोकणात रू. २७४.४२ पश्चिम महाराष्ट्रात रू. ६८.३७ मराठवाड्यात रू. ६५.५० तर विदर्भाच्या बाबतीत रू. ५६.७६ होते. एकंदरीत मागील पंचवीस वर्षात विदर्भाचे काहीप्रमाणात औद्योगिकीकरण झाले असले तरी, इतर विभागांच्या तुलनेत विदर्भ विभाग अविकसित राहीलेला आहे.

सष्टेंबर १९७३ पर्यंत पश्चिम महाराष्ट्रात ६७ सहकारी साखर कारखाने होते, तर विदर्भात मात्र केवळ दोन आणि हे दोन्ही कारखाने आजारी अवस्थेत होते. महाराष्ट्रात असलेल्या एकंदर २१ सहकारी सुतगिरण्यापैकी १३ पश्चिम महाराष्ट्रात एक कोकण विभागात, तीन मराठवाडा विभागात तर पाच सुतगिरण्या विदर्भात होत्या.

अखील भारतीय स्तरावरील, भारतीय औद्योगिक विकास बँकेने १९६४-६५ ते १९८२-८३ पर्यंत आणि भारतीय औद्योगिक पत गुंतवणूक महामंडळाने १९६० ते १९८२ पर्यंत ह्या दोन्ही संस्थांनी संयुक्तपणे मंजूर केलेले दरडोई वित्तिय सहाय्य कोकण विभागात बृहन्मुंबई वगळता रू. २६४.७५, पश्चिम महाराष्ट्रात रू.१०१.९७,मराठवाड्यात रू.५७.७८ अशा प्रमाणात होते. विदर्भात मात्र सर्वातकमी

प्रमाणात म्हणजे केवळ रू ५०.६० आहे. महाराष्ट्र राज्याचे हे प्रमाण रू. १२२.१९ असे होते. मुंबई वगळता हेचप्रमाण महाराष्ट्राबाबत रू. १०१.२८ एवढे कमी होते.

नोंदणी करण्यात आलेल्या लघू उद्योग घटकांचा विचार केल्यास १९७४ मध्ये १९८१ च्या प्रतिलक्ष लोकसंख्येमागे असलेले नोंदणीकृत लघू उद्योग घटकांची संख्या महाराष्ट्र राज्यात ५४.१० मुंबई वगळता ४४.११ होती. विभागावार प्रमाण पाहिल्यास कोकण विभागात बृहन्मुंबई वगळून ८०.६०, पश्चिम महाराष्ट्र ५२.३३, मराठवाडा २०.९२ आणि विदर्भात २८.६८ असे प्रमाण होते. १९७४ ते १९८२ ह्याकालावधीत ही आकडेवारी कोकण बृहन्मुंबई वगळता ६६.२६, पश्चिम महाराष्ट्र ७६.४०, मराठवाडा ६५.९३ आणि विदर्भ ७८.१२ अशी आढळते. १९८२ मध्ये १९८१ च्या प्रतिलक्ष लोकसंख्येमागे असलेली नोंदणीकृत लघू उद्योग घटाकांची संख्या महाराष्ट्र राज्यात १२८.४७, मुंबई वगळता ११७.८० महाराष्ट्रातील विभागांचा विचार केल्यास कोकण विभागात बृहन्मुंबई वगळून हे प्रमाण १४६.८६, पश्चिम महाराष्ट्रात १२८.७३, मराठवाड्यात ८६.८५ आणि विदर्भात १०६.८० (२.३७) म्हणजे या ठिकाणी देखील विदर्भ अन्य विभागांच्या तुलनेत अविकसित दिसला.

वस्तुनिर्माण आणि सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांपैकी वस्तुनिर्माण उपक्रमांचे त्यांच्या यंत्रसामग्रीतील गुंतवणुकीच्या आधारे व सेवा पुरविणाऱ्या साधनसामग्रीच्या मूल्याच्या आधारे सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठे उपक्रम असे वर्गीकरण आले आहे. महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु व मध्यम आणि मोठ्या उपक्रमाची सद्यस्थिती अभ्यासता महाराष्ट्रात सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची संख्या एकूण १६३५६६ असून यापैकी पश्चिम महाराष्ट्रात ६८०८० (४१.६ प्रतिशत) तर पश्चिम विदर्भात ७७१० (४.७ प्रतिशत) एवढे प्रकल्प असलेले आढळून येतात. म्हणजेच दांडेकर यांनी सुचविलेल्या शिफारशी नुसार पश्चिम महाराष्ट्रात सुक्ष्म व लघु व मध्यम उपक्रम स्थापण्यावर भर देण्यात आला असून महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत पश्चिम विदर्भ सर्वात जास्त पिछाडीवर असून दांडेकराच्या शिफारशीची अमंलबजावणी महाराष्ट्राती पश्चिम विदर्भात मात्र झालेली आढळून येत नाही.[५]

तसचे मोठ्या उपक्रमाचा अभ्यास करता महाराष्ट्रात ४९१५ एवढे उपक्रम असून यापैकी पश्चिम महाराष्ट्रात एकूणाच्या ३०.३ प्रतिशत आणि पश्चिम विदर्भात केवळ एकूण उपक्रमाच्या ३.० प्रतिशत मोठे उपक्रम असलेले आढळतात. म्हणजेच दांडेकरांनी सांगितलेली प्रादेशिक विषमता विदर्भाच्या बाबतीत आजही पहावयास मिळते. पश्चिम महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र शिफारशीचे काही अंशी अनुकरण झालेले आढळून येते.[६]

१९६२ मध्ये राज्यातील एकूण औद्योगिक कारखानदारी रोजगारापैकी ६६.९३ प्रतिशत रोजगार बृहन्मुंबईत केंद्रित झालेला होता. परंतू १९८१ मध्ये ह्या असमतोलाचे काही प्रमाणात बदल घडून आला. १९८१ मध्ये प्रतिलक्ष लोकसंख्येमागे असलेला औद्योगिक रोजगार महाराष्ट्र राज्यात १८९९ बृहन्मुंबई वगळून १०७९ असा होता. विभागावर स्वरूप पाहता, कोकण विभागात बृहन्मुंबई वगळून २१५२, पश्चिम महाराष्ट्र १२८३, तर मराठवाडा ४२७ आणि विदर्भात ६६५ अशा प्रमाणात आढळून आला.

एकंदरीत औद्योगिक रोजगाराबाबत देखील कोकण व पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ अती मागासलेला दिसतो. राज्यातील एकूण रोजगाराशी प्रत्येक विभागातील रोजगाराचे प्रतिशत प्रमाण असे होते, कोकण विभाग बृहन्मुंबई वगळता १२.५४ प्रतिशत, पश्चिम महाराष्ट्र २५.३२ प्रतिशत, मराठवाडा ३.४९ प्रतिशत आणि विदर्भात कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मुंबई ह्यांचेपेक्षा बऱ्याच प्रमाणात कमी म्हणजे ८ प्रतिशत होते तर मुंबईमध्ये मात्र ५०.६५ प्रतिशत होते.

महाराष्ट्रातील सद्यस्थितीतील (२०११-१२) सुक्ष्म, लघु, मध्यम आणि मोठ्या उपक्रमात निर्माण रोजगाराचा विचार करता सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगातील एकूण रोजगार हा २०.९७ लाख असून यापैकी पश्चिम महाराष्ट्रातील रोजगार हा ७.८६लाख म्हणजेच ३७.७ टक्के तर पश्चिम विदर्भात हा रोजगार ०.८९ लाख म्हणजेच ४.३ प्रतिशत इतका कमी आहे. यावरुन स्पष्ट होते की, दांडेकरांनी सुचविल्या प्रमाणे आजही पश्चिम विदर्भातील रोजगार वाढलेला आढळून येत नाही.

प्रत्यक्षात अविकसित असणाऱ्या विदर्भाकडे रोजगार निर्माण करण्यासाठी अधिक लक्ष देण्याची गरज दांडेकरांनी प्रतिपादीत केली होती.[७]

मोठ्या उपक्रमात निर्माण होणाऱ्या रोजगाराबाबत सुध्दा अशीच परिस्थिती पहावयास मिळते. महाराष्ट्र राज्या सद्यस्थितीत निर्माण रोजगार हा ११.२५ लाख असून यापैकी सर्वाधिक रोजगार पश्चिम महाराष्ट्रात निर्माण झाला असून तो एकूण रोजगाराच्या ४.०७ लाख म्हणजेच ३६.२ प्रतिशत होता, तर सर्वात कमी रोजगार हा पश्चिम विदर्भात निर्माण झाला असून तो ०.३२ लाख म्हणजेच २.८ प्रतिशत होता. यावरुन स्पष्ट होते की, लघु, मध्यम व मोठ्या प्रकल्पातील रोजगाराबाबत मुंबई, कोकण, नाशिक, औरंगाबाद विभागापेक्षा पश्चिम विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील रोजगार वाढविणाऱ्या भर द्यावा ही दांडेकरांनी सुचविलेली शिफारस पश्चिम महाराष्ट्राच्या बाबत जरी लागू झाली असली तरी पश्चिम विदर्भाच्या बाबतीत मात्र त्यात म्हणावी तशी वाढ झालेली दिसून येत नाही.[८]

महाराष्ट्र शासनाने अधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व देशाच्या औद्योगिक क्षेत्रातील आपले स्थान कायम ठेवण्यासाठी केंद्र शासनाच्या धोरणास अनुसरुन महाराष्ट्र शासनानेही पावले उचचली आहेत. याचाच एक भाग म्हणून सन १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा पुरस्कार केल्या नंतर महाराष्ट्र शासनाने नवीन आर्थिक बदल म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) च्या रुपात सन २००७ मध्ये महाराष्ट्रामध्ये स्वीकारण्यात आला. या धोरणामध्ये सुध्दा प्रादेशिक विषमता दिसून आलेली आहे. म्हणजेच या धोरणातही दांडेकर समितीने सुचविलेल्या शिफारशींचा अवलंब झालेली आढळून येत नाही. विदर्भाच्या बाबतीत ही परिस्थिती पहावयास मिळते. राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्राची संख्या अभ्यासता ही संख्या २००७ अखेर १४४ लाख होती, यापैकी पश्चिम महाराष्ट्रात ४२ म्हणजेच एकूणाच्या ३४.४३ प्रतिशत तर विदर्भात केवळ ९ लाख म्हणजेच एकूणाच्या ७.३८ प्रतिशत होती.

विशेष आर्थिक क्षेत्राचे हेक्टरी प्रमाण अभ्यासता महाराष्ट्रात हे क्षेत्र ४९,८८० हेक्टर होते, त्यापैकी पश्चिम महाराष्ट्रात १०२२८ हेक्टर म्हणजेच एकूणाच्या २०.५१ प्रतिशत तर विदर्भात ६००४ हेक्टर १२.०३ प्रतिशत होते.

विशेष आर्थिक क्षेत्रातील गुंतवणूकीचा विचार करता महाराष्ट्र राज्याकरीता झालेली गुंतवणूक ही १,३२,५७८ कोटी रुपये होती, यापैकी पश्चिम महाराष्ट्रात २२,६०७ म्हणजेच एकूणाच्या १७.०५ प्रतिशत तर विदर्भातील गुंतवणूक ही १०४०९ म्हणजेच ७.८५ प्रतिशत झालेली आढळते.

विशेष आर्थिक क्षेत्रात निर्माण होणारा रोजागार विचारात घेता, महाराष्ट्रातील एकूण रोजगार हा ५३.४८ लाख होता यापैकी पश्चिम महाराष्ट्रात १०.७३ म्हणजेच एकूणाच्या २०.०६ प्रतिशत तर विदर्भात ५.८४ प्रतिशत म्हणजेच एकूणाच्या १०.९१ प्रतिशत रोजगार निर्माण झालेला आढळतो.

म्हणजेच एकंदरीत विशेष आर्थिक क्षेत्राच्या वरील निकषाच्या बाबतीत विदर्भाच्या वाट्याला आलेले प्रमाण हे दांडेकरांनी सुचविलेल्या अविकसित भागाच्या विकासासाठी आवश्यक ८५ टक्क्याच्या तरतुदीपेक्षा कमीच होते.[९]

**६.३ दांडेकरांच्या शिफारशींचे परिक्षण :**

दांडेकर समितीच्या अहवालावर चित्र स्वरूपात प्रतिक्रीया उमटलेल्या आढळतात. या अहवालातील शिफारशींना समितीच्या सर्वच सदस्यांची सहमती नव्हती.

दांडेकर समितीच्या अहवालातील सर्वात मोठी त्रुटी म्हणजे समितीने प्रत्येक क्षेत्राची सरासरी काढतांना फक्त शासकीय व शासन सहाय्यीत संस्था व कार्यक्रमांचाच समावेश आपल्या विश्लेषणात केला आहे. खाजगी उद्योग, खाजगी शाळा, दवाखाने, तांत्रिक संस्था यांना पूर्णपणे वगळले त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याचे खरे चित्र पुढे येऊ शकले नाही. उलट काही विरोधाभासी चित्र पुढे आहे. दांडेकर समितीची अनुशेष दूर करण्याची पध्दतीही चूकीची आहे. या पध्दतीत मागास जिल्ह्यांना, जे राज्य सरासरीच्या खाली असतील, त्यांना फक्त राज्य सरासरी पर्यंत आणले जाते. परंतु या पध्दतीमुळे मागास जिल्हे मागासच राहतील. कारण मधल्या काळात प्रगत जिल्हे अधिक पुढे जातील त त्यामुळे संबंध राज्य सरासरीच वर सरकेल. कदाचित म्हणूनच दांडेकर समितीने अनुशेष काढण्याची प्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रीया आहे असे म्हटले आहे.

अर्थात समितीने विभागीय असमतोल दूर करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय योजनेच्या ८५ टक्के रक्कम केवळ मागास क्षेत्राचा अनुशेष दूर करण्यासाठी वापरावी अशी जी शिफारस केली ती जर अंमलात आली असती तर मागास भागातील अनुशेष निश्चितच जलद गतीने कमी झाला असता.

**तक्ता क्र. ६.२**

**महाराष्ट्रात विभागीय अनुशेष**

| अ.क्र. | विभाग | दांडेकर समिती १९८४ | |
|---|---|---|---|
| | | मौद्रिक अनुशेष | एकूणशी प्रमाण |
| १. | उर्वरित महाराष्ट्र | ११८९.३८ | ३७.३२ |
| २. | मराठवाडा | ७५०.८५ | २३.५६ |
| ३. | विदर्भ | १२४६.५५ | ३९.१२ |
| | **एकूण महाराष्ट्र** | **३१८६.७८** | **१००.००** |

वरील तक्त्यातील आकडेवारीनुसार सन १९८४ मध्ये उर्वरित महाराष्ट्राचा मौद्रीक अनुशेष ३७.३२ टक्के होता, मराठवाड्याचा मौद्रीक अनुशेष २३.५६ टक्के तर विदर्भासाठी हा मौद्रीक अनुशेष ३९.१२ टक्के होता. म्हणजेच यावरुन हे स्पष्ट होते की, दांडेकरांनी विदर्भासाठी अपेक्षिलेला मौद्रीक अनुशेष हा संपूर्ण महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत अधिकच होता.

कोणत्याही क्षेत्रात अनुशेष निश्चित केल्यावर तो दूर करण्याची कोणती पध्दती सरकार स्वीकारते म्हणजे मागास विभागाचे विविध क्षेत्रांतील अनुशेष भरून काढण्यासाठी विकासनिधीचा किती आणि कोणत्या तत्वावर पुरवठा करते ते खरे महत्वाचे आहे. त्यासाठी दांडेकर समितीने एक स्वतंत्र प्रकरण आपल्या अहवालात घालून विशिष्ट शिफारशी केल्या आहेत. त्या आजच्या केंद्रीय धोरणाच्या तुलनेत मागास भागाच्या दृष्टीने हितकर आणि पुरोगामी आहेत. नियोजनाच्या ज्या-ज्या क्षेत्रात योजनात किंवा कार्यक्रमात अनुशेष आहे त्या सर्व क्षेत्रासाठी, योजनांसाठी

किंवा कार्यक्रमासाठी नियोजनातून ठरलेल्या रक्कमेच्या ८५% रक्कम त्या त्या क्षेत्रातील योजनांमधील किंवा कार्यक्रमातील जिल्ह्या-जिल्ह्याचे अनुशेष दूर करण्यासाठी केवळ १५% रक्कम काही चालू कामे किंवा नैसर्गिक वाढीसाठी सर्व जिल्ह्यांना (अनुशेष असलेले व नसलेल्या सर्वच जिल्ह्यांना) वाटून दिली पाहिजे अशी समितीची शिफारस आहे. समितीने मागास विभागाच्या विकासाबाबत किंवा प्रादेशिक विषमतेबाबत आपली भूमिका प्रारंभीच मांडली आहे. की, विकासातील विषमता दूर करण्यची प्रक्रिया आज आहे. त्या विकास निधीच्या मर्यादेतच आणि त्या क्षेत्रनिहाय वाटणीमध्येही, विषमता दूर करण्यावर आणि अनुशेष भरून काढण्यावर लक्ष केंद्रित करून विनाविलंब सुरू होऊ शकते मागे राहिलेल्या जिल्ह्यांचा विकासाची गती वाढती ठेवण्याची आणि त्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात पुढे गेलेल्या जिल्ह्यांच्या विकासाची गती काहीशी हळू करण्याची संकल्पना समितीने स्पष्टपणे मांडली आहे आणि त्याच भूमिकेवरून वर उल्लेखलेली ८५% व १५% च्या हिशेबांनी विकासनिधीची वाटणी सुचविली आहे. अनुशेष भरून काढण्यासाठी करावयाच्या निधीच्या पुरवठ्यासाठी मागास विभागाच्या हिताची दुसऱ्या कुणी एवढी स्प्ष्ट व ठाम शिफारस देशात किंवा परदेशातही आजवर केलेली नाही. दुर्देवाने दांडेकर समितीने काढलेल्या अनुशेषाच्या आकड्यापलीकडे किंवा विकास प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी यंत्रणा कोणती असावी यापलीकडे अभ्यासकाचे फारसे लक्ष गेलेले दिसत नाही. घटनेच्या कलम ३७१ (२) मध्ये अभिप्रेत असलेल्या वैधनिक विकास मंडळाच्या स्वरूपात देखरेखेची यंत्रणा असावी की नसावी यावरच सर्व वादाचा आणि चर्चेचा भर राहिला आहे.

दांडेकर समितीचे निकष, त्यांवर आधारलेले मागासपणाचे दिग्दर्शन, अनुशेष व ते भरून काढण्यासाठी विकासनिधीच्या वाटणीची सुचविलेली नवी पर्यायी प्रणाली वगैरेबाबत राज्यसरकारने स्वीकृती तरी दिली आहे की नाही याचीही विचारणा कुणी केलेली दिसत नाही किंवा तशी ती घ्यावी असा कुणाचा आग्रह आहे असेही दिसत नाही. विशेष म्हणजे समितीच्या शिफारशीचा नकारात्मक परिणाम पुढे गेलेल्या जिल्ह्यावर होणार हे स्पष्ट असताना त्यांच्याऐवजी मागे राहिलेल्या

जिल्ह्यातूनच समितीच्या शिफारशीबाबत अधिक प्रतिकूल मत असावे याचे आश्चर्य वाटते.

असे व्यापक विचारार्थ अभ्यासविषयक असलेल्या समितीच्या निष्कर्षावर किंवा शिफारशींवर मतभेद असणे साहजिकच आहे. सर्वच निष्कर्ष कुणासही पटतील असे शक्य नाही समितीच्या सभासदातही तीव्र मतभेद होतेच. त्यामुळेच समितीच्या अहवालातच अनेक भिन्न मतपत्रिका आहेत.

## ६.४ निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल (१९९७) :-

श्री. वि.म.म दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन सत्यशोधन समितीनंतर महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावर खऱ्या अर्थाने प्रकाश टाकण्याचे कार्य राज्यपालांनी १९९४ मध्ये स्थापन केलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीने केले आहे. या समितीने सुध्दा अनुशेष काढण्यासाठी दांडेकर समितीने निवडलेल्या ९ प्रमुख क्षेत्रांचीच निवड केलेली आहे. फक्त एक महत्त्वाचा बदल केला तो म्हणजे, दांडेकर समितीप्रमाणे दुष्काळी तालुक्यासाठी सिंचन क्षेत्रासाठी अनुशेष काढतांना तालुका हा घटक न घेता सर्वच ९ आर्थिक क्षेत्रासाठी जिल्हा हाच घटक घेतला आहे. या समितीने आपला मुख्य अहवाल जुलै १९९७ ला राज्यपालांना सादर केला.

समितीने सन १९८४ साली दांडेकर समितीने काढलेला एकूण विकास अनुशेष (३१८६.७८) कोटी रु. वरुन सन १९९४ ला (१५,३५५.७७) कोटी रुपये पर्यंत वाढल्याचे म्हटले आहे. सन १९८४ ते १९९४ ची विभागावर अनुशेषाची तुलनात्मक आकडेवारी पुढील प्रमाणे-

**तक्ता क्रमांक-६.३**

**महाराष्ट्र राज्याचा विभागावर विकास अनुशेषाची तुलनात्मक स्थिती**

(रु. लाखात)

| अ. क्र. | विभाग | दांडेकर समिती १९८४ | | निर्देशांक व अनुशेष समिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | मौद्रीक अनुशेष | एकुणशी प्रमाण | मौद्रीक अनुशेष | एकुणशी प्रमाण |
| १ | उर्वरित महाराष्ट्र | ११८९.३८ | ३७.३२ | ३७६८.२० | २४.५४ |
| २ | मराठवाडा | ७५०.८५ | २३.५६ | ४६२५.५५ | ३०.१३ |
| ३ | विदर्भ | १२४६.५५ | ३९.१२ | ६९६१.०२ | ४५.३३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **एकूण महाराष्ट्र** | **३१८६.७८** | **१००.००** | **१५३५५.७७** | **१००.००** |

(स्त्रोत -५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा , डॉ. दि.व्य.जहागिरदार., पृष्ठ क्रमांक १५९)

वरील तक्त्यातील तुलनात्मक आकडेवारी पाहता सन १९८४ ते १९९४ या दहा वर्षात विदर्भाचा अनुशेष ३९.१२ टक्के वरून ४५.३३ टक्के पर्यंत वाढला, मराठवाड्याचा सुध्दा २३.५६ टक्के वरून ३०.१३ टक्के पर्यंत वाढलेला दिसतो. याऊलट उर्वरीत महाराष्ट्राचा अनुशेष ३७.३२ टक्के वरून २४.५४ टक्के पर्यंत घटला आहे. यावरून प्रादेशिक असमतोल १९८४ च्या तुलनेत १९९४ मध्ये कमी होण्याऐवजी अधिकच वाढला आहे.

तुलना शास्त्रशुध्द करण्यासाठी, राज्य दरडोई अनुशेषास १०० गृहित धरुन अनुशेषाचे निर्देशांक पाहिल्यास, १९८४ मध्ये विदर्भाचा दरडोई निर्देशांक सर्वाधिक १६१ तर मराठवाड्याचा १४३ व उर्वरीत महाराष्ट्राचा फक्त ६१ असल्याचे दिसले. सन १९९४ मध्ये विदर्भाचा दरडोई निर्देशांक १६१ वरुन २०६ पर्यंत तर मराठवाड्याचा १४३ वरुन १८६ वर गेला आहे. याउलट उर्वरीत महाराष्ट्राचा दरडोई अनुशेष ६१ वरुन ३९ पर्यंत घटला आहे. यावरुन तुलनात्मक दृष्ट्या मागास असलेले विदर्भ आणि मराठवाडा हे प्रदेश आणखीच मागास झालेले दिसत आहेत.

निर्देशांक व अनुशेष समितीने प्रादेशिक असमतोला दूर करण्यासाठी मागास भागातील शासकीय प्रशासन मजबूत करण्यावर भर दिला आहे. कारण मागास भागातील शासकीय यंत्रणा फारशी कार्यक्षम नसते असा अनुभव आहे. त्यामुळे अनुशेष दूर करण्यासाठी वा इतर विकास कार्यासाठी आलेली रक्कम खर्च न होता परत जाते. दुसरे कारण म्हणजे, जिल्ह्यांचा व तालुक्यांचा फार मोठा आकार असतो विशेषतः विदर्भातील गावांची संख्या फार मोठी आहे. त्यामुळे सहाजिकच प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. यासाठी विभाजन करुन नविन जिल्हे व नविन तालुके निर्माण करण्यासाची गरज समितीने प्रतिपादीत केली आहे.

विदर्भात याचे परिणाम दिसून आले असून १९९८ मध्ये अकोला आणि वाशीम असे जिल्ह्यांचे विभाजन करण्यात आले आहे. तसेच अनेक नवीन तालुके निर्माण करण्यात आले आहेत. म्हणजेच समितीने सुचविलेल्या शिफारशीचे अनुकरण

झालेले आढळते. याचा अर्थ विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून प्रशासकीय सक्षमीकरणाचा उपाय मागास भागांच्या विकासासाठी आवश्यक आहे.[१०]

अशाप्रकारे समित्यांच्या शिफारशीचे अध्ययन करुन त्यांची सुचविलेल्या शिफारशींच्या अमंलबजावणीचा व परिणामाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

**संदर्भग्रंथ-**


१. डॉ.वि.म.दांडेकर ., महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल., एप्रिल १९८४. पृष्ठ क्रमांक २२१ ते २४५

२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २०१२-१३)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ११५.

३. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २०१२-१३)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ११५.

४. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २०१२-१३)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ११५.

५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २०१२-१३)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ११३.

६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २०१२-१३)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ११३.

७. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २०१२-१३)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ११३.

८. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २०१२-१३)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ११३.

९. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ( २००७-०८)., उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. पृष्ठ क्रमांक ४८.

१०. डॉ. दि.व्य.जहागिरदार ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा , पृष्ठ क्रमांक १५९ ते १६०

# ¯Öúú¸üÖ 7 ¾Ö

## ÃÖÖ¸üÖ¿Ö, ×¾ÖÂÖ¾ÖúÂÖ ¾Ö ×¿Ö±úÖ¸ü¿Öß

- 7.1 ÃÖÖ¸üÖ¿Ö
- 7.2 ×¾ÖÂÖ¾ÖúÂÖ
- 7.3 ÃÖ¿ÖÖ¬Ö¾ÖÖ“ÖÖ ¾Ö×ÆüÖ ¾ÖúÖ“ÖÖ“Öß ±ú»ÖÁÖÝÖß“Ö ×¾ÖÂÖ¾ÖúÂÖ
- 7.4 ×¿Ö±úÖ¸ü¿Öß

# प्रकरण सातवे

# सारांश, निष्कर्ष व उपाययोजना

## ७.१ सारांश

प्रबंधाच्या प्रकरण पहिल्यामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना अभ्यासली आहे. हा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलाचा मागोवा घेण्यात आला आहे. यासाठी प्रामुख्याने प्रादेशिक अमतोलाची संकल्पना, औद्योगिक विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भारतातील औद्योगिक विकासाची पार्श्वभूमी, पहिल्या महायुध्दा पासून तर दुसरे महायुध्द आणि फाळणी व त्यांनतरच्या काळातील भारताची औद्योगिक परिस्थिती अभ्यासली आहे. तसेच स्वतंत्र भारताचे औद्योगिक धोरण, सरकारी क्षेत्रातील औद्योगिक विकास, नियोजन काळात औद्योगिक विकासासाठी झालेला प्रयत्न इ. चे अध्ययन केलेले आहे. राष्ट्रीय स्तरवरील औद्योगिक परिस्थिती अभ्यासल्यानंतर महाराष्ट्रातील औद्योगिक परिस्थिती, अभ्यासली आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतेतील स्थान अभ्यासले आहे. महाराष्ट्रातील कारखाने, उपलब्ध रोजगार, महाराष्ट्रातील औद्योगिक संस्था त्यांचे कार्य व महाराष्ट्रातील स्थिती अभ्यासली आहे.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात संशोधनाशी सबंधीत साहित्य यांचा आढावा घेतला आहे. संशोधन साहित्याचा आढावा घेतांना अभ्यासलेल्या विषयाशी संबंधीत विविध अभ्यासकांनी मांडलेल्या मतांचा आढावा घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने, अर्थशास्त्रज्ञ, संशोधन अधिकारी, विषया संबधी झालेल्या चर्चासत्रातील विषय, प्रसिध्द ग्रंथ, निगडीत नियतकालिके, वर्तमानपत्रातील साहित्य, इत्यादीचे अध्ययन केले आहे.

प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात विषयाचा उपसंहार अभ्यासला आहे. संशोधन करीत असतांना उपयोगात आणलेल्या संशोधन पध्दतीचा या प्रकरणात अभ्यास केला आहे. संशोधन पध्दती समवेत या प्रकरणात संशोधनाची गृहितके, उद्दिष्ट्ये इत्यादीचा आढावा घेतला आहे.

प्रबंधाच्या चवथ्या प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या विविध विभागांची माहिती दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील दोन विभागांचा व विभागातील दोन जिल्ह्यांना अध्ययनक्षेत्र म्हणून निवडलेले आहे. महाराष्ट्रातील दोन विभागात प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भ यांचा समावेश केला असून पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा आणि पश्चिम विदर्भातील अकोला जिल्हा हा संशोधनासाठी निवडलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात या दोन जिल्ह्यांचा ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक परिचय करुन दिला आहे. या दोन्ही जिल्ह्यातील लोकसंख्या, साक्षरता इ. समवेत जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक सांख्यिकी अभ्यासली आहे. तसेच अभ्यासासाठी दोन्ही जिल्ह्यातील निवडक निर्देशकांच्या आधारे तुलनात्मक स्थिती अभ्यासली आहे.

प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात संशोधनासाठी संग्रहित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. संशोधनासाठी निवडलेल्या महाराष्ट्रातील दोन जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राशी संबंधीत माहिती या अध्ययनासाठी उपयोगात आणली आहे. हे अध्ययन दुय्यम सर्वेक्षणावर आधारीत आहे. संग्रहित सामुग्रीचे विश्लेषण करतांना प्रामुख्याने दोन्ही जिल्ह्यांना प्राप्त औद्योगिक क्षेत्रापासून चे उत्पन्न, उत्पन्नातील तफावत, कामगारांची दैनिक सरासरी संख्या, कारखान्यांची संख्या, बंद कारखाने, प्रपत्र पाठविणारे चालू कारखाने, जिल्ह्यांत उपलब्ध विविध क्षेत्रातील रोजगार यांचे अध्ययन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने कृषी उद्योगातील रोजगार, खाणकाम उद्योगातील रोजगार, वस्तू निर्माण उद्योगातील रोजगार, वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगातील रोजगार, बांधकाम उद्योगातील रोजगार, घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगातील रोजगार, परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगातील रोजगार, वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगातील रोजगार, सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगातील रोजगार यांचे दोन्ही जिल्ह्यातील प्रमाण अभ्यासून दोन जिल्ह्यातील औद्योगिक विषमता अभ्यासली आहे.

प्रबंधाच्या सहाव्या प्रकरणात महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल अभ्यासण्यासाठी स्थापित समित्यांनी केलेल्या शिफारशींचे अध्ययन करुन त्यांच्या अंमलबजावणीचा अभ्यास केला आहे. हे अध्ययन करण्यासाठी प्रामुख्याने दांडेकर समितीला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच जागतिकीकरणाचा स्वीकार झाल्यानंतर त्याचा महाराष्ट्रावरील प्रभाव अभ्यासण्याच्या दृष्टीने निर्देशांक व अनुशेष समितीने केलेल्या शिफारशींचे अध्ययन करुन त्यांचे परिक्षण केले आहे.

प्रबंधाच्या सातव्या प्रकरणात संशोधनाचा सारांश, अध्ययनाच्या आधारे काढलेले निष्कर्ष व औद्योगिक विषमता दुर करण्यासाठीच्या शिफारशींचे अध्ययन केले आहे.

## ७.२ संशोधनाचे निष्कर्ष

- महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात प्रादेशिक विषमता आढळते.
- स्थुल मूल्यवृध्दी व कामगार वेतन यामध्ये अखिल भारतीय स्तरावर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र उच्च स्थानावर आहे.
- वार्षिक उद्योग पाहणीनुसार एकूण उद्योग, स्थिर भांडवल आणि रोजगार याबाबतीत राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे.
- महाराष्ट्रात उद्योगांना वित्तीय सहाय्य देण्यात वित्तीय संस्थांचा समावेश होतो.
- उद्योगांना वित्तीय सहाय्य देण्यात प्रामुख्याने भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ, लघु उद्योग विकास बँक, भारतीय आयुर्विमा महामंडळ, भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ, महाराष्ट्रराज्य वित्तीय महामंडळ, सिकॉम इ. संस्थांचा समावेश होतो.

### निवडक निर्देशकांच्या अध्ययनातून समोर आलेले निष्कर्ष

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि पश्चिम विदर्भातील अकोला जिल्ह्यातील निवडक विकास निर्देशकाच्या आधारे विविध बाबीतील विषमता अभ्यासतांना प्रामुख्याने लोकसंख्या, साक्षरता, भौगोलिक क्षेत्र, वीज वापर, औद्योगिक क्षेत्र, पायाभूत सुविधा या निर्देशांकांचा आधार घेतला आहे.

- अकोला जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दी दराचा विचार करता २०११-१२ मध्ये हा दर २००१-०२ च्या तुलनेत ११.५३ टक्के होता, तर कोल्हापूर जिल्ह्यात हा दर १०.२१ टक्के असलेला आढळतो. म्हणजेच लोकसंख्येच्या बाबतीत अकोला जिल्हा हा कोल्हापूर जिल्ह्याच्या समोर असलेला आढळतो.
- लोकसंख्येची घनता, साक्षरता, स्त्री पुरुष प्रमाण याबाबत कोल्हापूर जिल्हा पुढे असलेला आढळतो.
- अकोला जिल्ह्यातील जंगलव्याप्त क्षेत्रात वाढ होऊन ही वाढ ४२.१९ टक्के असलेली आढळून येते. अकोला जिल्ह्यातील ओलिताखालील प्रमाणाचा विचार करता अकोला जिल्ह्यात सन २००१-०२ च्या तुलनेत ३०.३२ टक्के वाढ झालेली आढळून येते.
- दोन्ही जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्राचा विचार करता अकोला जिल्ह्यातील वाढ ही -८१.०१ टक्के एवढी म्हणजेच ऋणात्मक झालेली आढळते. तर कोल्हापूर जिल्ह्यात मात्र पिकाखालील क्षेत्रात वाढ होऊन ही वाढ १.६१ टक्के झालेली आढळते.
- दोन्ही जिल्ह्यातील वीजवापराची स्थिती अभ्यासता अकोला जिल्ह्यात वीज वापरात सन २००१-०२ च्या तुलनेत झालेली वृध्दी ही ११.७१ टक्के तर कोल्हापूर जिल्ह्यात ही वृध्दी १०३.५१ टक्के होती.
- रस्त्यांच्या लांबीचा विचार करता अकोला जिल्ह्यात सन २००१-०२ च्या तुलनेत सन २०११-१२ मध्ये ही वृध्दी १५७.४२ एवढ्या मोठ्याप्रमाणात झाली असून कोल्हापूर जिल्ह्यात हे वाढीचे प्रमाण २४.०३ टक्के आहे.
- दळणवळण साधनांचा विचार करता वाढत्या भ्रमणध्वनी सुविधेमुळे दोन्ही जिल्ह्यातील दुरध्वनी, पोष्ट व तार सेवा यांचे प्रमाण कमी झाले असून किंबहूना ते ऋणात्मक झालेले आढळते हे प्रमाण कमी होऊन अकोला

जिल्ह्यात -१६.४२ टक्के एवढे ऋणात्मक आणि कोल्हापूर -०.५१ एवढे ऋणात्मक असलेले दिसून येते.

- दोन्ही जिल्ह्यात अधिकोषांच्या संख्येत सुध्दा घट झाली असून अकोला जिल्ह्यात घटीचे प्रमाण -४.६२ टक्के तर कोल्हापूर जिल्ह्यात -४१.४२ टक्के होते.
- दोन्ही जिल्ह्यातील आरोग्य विषयक सुविधांचा विचार करता अकोला जिल्ह्यात या सोयीत घट होऊन -३२.८८ इतकी झालेली आढळून येते. तर कोल्हापूर जिल्ह्यात ही वाढ ८.२७ टक्के झालेली आढळून येते.
- सन २००१-०२ च्या तुलनेत २०११-१२ या वर्षातील असमतोल अभ्यासण्याच्या दृष्टीने विषमता अभ्यासण्यासाठी उपयोगात आणलेल्या निर्देशित घटकांच्या आधारे असे दिसून येते की, लोकसंख्या आणि रस्ते या दोन घटकांच्या बाबतीत अकोला जिल्हा हा अग्रेसर असून इतर बाबतीत मात्र तो कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत पिछाडीवर असलेला आढळते.

**औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त उत्पन्नाबाबत निष्कर्ष**

- कोल्हापूर जिल्ह्यातील चालू किंमतीनुसार औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न अभ्यासता प्राप्त सर्वाधिक उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या २१.२१ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ५.२८ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील स्थिर किंमतीनुसार औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न अभ्यासता प्राप्त सर्वाधिक स्थुल उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या २३.४० टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ६.४९ टक्के होते.

- अकोला जिल्ह्यातील चालू किंमतीनुसार औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न अभ्यासता प्राप्त सर्वाधिक स्थुल उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या १८.४३ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ५.७२ टक्के होते.
- अकोला जिल्ह्यातील स्थिर किंमतीनुसार औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल व निव्वळ उत्पन्न अभ्यासता प्राप्त सर्वाधिक स्थुल उत्पन्न २००९-१० मध्ये प्राप्त झाले ते एकूण उत्पन्नाच्या १८.६९ टक्के होते, तर सर्वात कमी उत्पन्न २००१-०२ मध्ये प्राप्त झाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ७.०८ टक्के होते.
- औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या दोन्ही जिल्ह्यातील चालू किंमतीनुसार उत्पन्नातील तफावत अभ्यासता सर्वाधिक तफावत ही सन २००९-१० मध्ये होती तफावतीचे प्रमाण २१.६१ टक्के होते. तर सर्वात कमी उत्पन्नातील तफावत ही सन २०००-०१ या वर्षी असून तफावतीचे प्रमाण ५.०७ टक्के होते.
- औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या दोन्ही जिल्ह्यातील स्थिर किंमतीनुसार उत्पन्नातील तफावत अभ्यासता सर्वाधिक तफावत ही सन २००९-१० मध्ये होती तफावतीचे प्रमाण २४.३६ टक्के होते. तर सर्वात कमी उत्पन्नातील तफावत ही सन २००१-०२ या वर्षी असून तफावतीचे प्रमाण ६.२६ टक्के होते.
- दोन्ही जिल्ह्यात औद्योगिक उत्पन्नात विषमता असलेली आढळून येते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील चालू व स्थिर किंमतीनुसार प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्न हे अकोला जिल्ह्याच्या तुलनेत अधिक असलेले आढळून येते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा चालू किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००५-०६ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (३२.५६ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी (-१.१० टक्के) होता.

- अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा चालू किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००८-०९ ला अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (६६.२१ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी -८.३५ टक्के म्हणजे ऋणात्मक होता.
- कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा स्थिर किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००९-१० मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (८४.३५ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी (-३.४० टक्के) होता.
- अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून प्राप्त स्थुल व निव्वळ उत्पन्नाचा स्थिर किंमतीनुसार वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००८-०९ ला अकोला जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (४६.२५ टक्के) होता तर २००५-०६ ला सर्वात कमी -१५.१९ टक्के म्हणजे ऋणात्मक होता.

**कामगारांच्या दैनिक सरासरी संख्येबाबत निष्कर्ष**

- कोल्हापूर जिल्ह्यातील पुरूष कामगारांची दैनिक सरसरी संख्या अभ्यासता सर्वाधिक पुरूष कामगार सन २०००-०१ मध्ये होते त्यांची संख्या ४३६५२ असून त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या ११.६८ टक्के होते. तर सर्वात कमी कामगार सन २००६-०७ मध्ये होते त्यांची संख्या ३४२९९ असून त्यांचे प्रमाण ९.१८ टक्के एवढे होते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील स्त्री कामगारांची दैनिक सरसरी संख्या अभ्यासता सर्वाधिक स्त्री कामगार सन २००४-०५ मध्ये होते त्यांची संख्या १४४७ असून त्यांचे प्रमाण एकूण स्त्री कामगारांच्या ११.४० टक्के होते. तर सर्वात कमी

कामगार सन २००८-०९ मध्ये होते त्यांची संख्या ९३९ असून त्यांचे प्रमाण ७.४० टक्के एवढे होते.

- कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण कामगारांची दैनिक सरसरी संख्या अभ्यासता सर्वाधिक एकूण कामगार हे २०००-०१ मध्ये होते त्यांची संख्या ४५०३५ असून त्यांचे प्रमाण ११.६६ टक्के होते तर सर्वात कमी सन २००६-०७ मध्ये कामगारांची संख्या ३५,५६० होती त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या ९.२० टक्के होते.
- अकोला जिल्ह्यातील पुरूष कामगारांची दैनिक सरसरी संख्या अभ्यासता सर्वाधिक पुरूष कामगार सन २००६-०७ मध्ये होते त्यांची संख्या ५५९२ असून त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या १२.६१ टक्के होते. तर सर्वात कमी कामगार सन २००२-०३ मध्ये होते त्यांची संख्या ३२८० असून त्यांचे प्रमाण ७.४० टक्के एवढे होते.
- अकोला जिल्ह्यातील स्त्री कामगारांची दैनिक सरसरी संख्या अभ्यासता सर्वाधिक स्त्री कामगार सन २००७ ते २००९ मध्ये होते त्यांची संख्या ४२७ असून त्यांचे प्रमाण एकूण स्त्री कामगारांच्या ११.८६ टक्के होते. तर सर्वात कमी कामगार सन २००५-०६ मध्ये होते त्यांची संख्या २४२ असून त्यांचे प्रमाण ६.७२ टक्के एवढे होते.
- अकोला जिल्ह्यातील एकूण कामगारांची दैनिक सरसरी संख्या अभ्यासता सर्वाधिक एकूण कामगार हे २००६-०७ मध्ये होते त्यांची संख्या ५९६६ असून त्यांचे प्रमाण ११.६६ टक्के होते. तर सर्वात कमी सन २००२-०३ मध्ये कामगारांची संख्या ३३५९ होती त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या ७.६३ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील कामगारांच्या दैनिक सरासरीचा वार्षिक वृध्दीदर अभ्यासता सर्वात जास्त वार्षिक वृध्दी दर २००३-०४ मध्ये (७.३९ टक्के) होता तर २००६-०७ ला सर्वात कमी (-९.७६ टक्के) होता.

- अकोला जिल्ह्यातील कामगारांच्या दैनिक सरासरीचा वार्षिक वृध्दीदर अभ्यासता २००१-०२ ला अकोला जिल्ह्यातील कामगार संख्येचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त २०.३१ टक्के होता तर २००२-०३ ला सर्वात कमी (-३१.७६ टक्के) होता.

**कारखान्यांच्या संख्येबाबत निष्कर्ष:**

- कोल्हापूर जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सर्वाधिक नोंदणी झालेले कारखाने सन २००८-०९ व २००९-१० या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या १०.७२ टक्के होते तर सर्वात कमी नोंदणी झालेले कारखाने सन २००९-१० या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ९.४८ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सर्वाधिक बंद पडलेले कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.३२ टक्के होते तर सर्वात कमी बंद पडलेले कारखाने सन २००८ ते २०१० या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ९.७२ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या अभ्यासता सर्वाधिक प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.६१ टक्के होते तर सर्वात कमी प्रपत्र पाठविणारे चालू कारखाने सन २००८-०९ या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ७.८२ टक्के होते.
- अकोला जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सर्वाधिक नोंदणी झालेले कारखाने सन २००७ ते २०१० या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या १०.३७ टक्के होते तर सर्वात कमी नोंदणी झालेले कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ८.१६ टक्के होते.

- अकोला जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांची संख्या अभ्यासता सर्वाधिक नोंदणी झालेले कारखाने सर्वाधिक बंद पडलेले कारखाने सन २००५-०६ या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.४५ टक्के होते तर सर्वात कमी बंद पडलेले कारखाने सन २००७ ते २०१० या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ९.३४ टक्के होते.
- अकोला जिल्ह्यातील प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या अभ्यासता सर्वाधिक प्रपत्र पाठवणाऱ्या चालू कारखाने सन २०००-०१ या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.६१ टक्के होते तर सर्वात कमी प्रपत्र पाठविणारे चालू कारखाने सन २००८-०९ या वर्षात होते त्यांचे प्रमाण एकूण संख्येच्या ७.८२ टक्के होते.
- कामगारांच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सन २०००-०१ ते २००९-१० या कालखंडात कामगार संख्येतील तफावत ही ३३८४५८ असून सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.९९ टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००६-०७ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ८.७४ टक्के होती.
- कारखान्याच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण एकूण संख्येच्या ११.८९ टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००२-०३ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ९.१२ टक्के होती.
- बंद कारखान्याच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण एकूण संख्येच्या १३.०१ टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००३-०४ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ६.९४ टक्के होती.
- प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्याच्या संख्येतील दोन जिल्ह्यातील तफावत अभ्यासता सर्वाधिक तफावत सन २०००-०१ यावर्षी होती हे तफावतीचे प्रमाण

एकूण संख्येच्या १२.५० टक्के होते. तर सर्वात कमी तफावत ही सन २००८-०९ मध्ये असून ती एकूण तफावतीच्या ६.८५ टक्के होती.

- अकोला व कोल्हापूर या दोन जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील नोंदणी झालेल्या कारखान्याची संख्या, बंद कामगारांची संख्या आणि प्रपत्र पाठवून चालू कारखान्यांची संख्येतील तफावत अभ्यासता कोल्हापूर जिल्हा हा अकोला जिल्ह्यापेक्षा अग्रेसर असलेला आढळून येतो.
- कोल्हापूर जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर अभ्यासता सर्वात जास्त वार्षिक वृध्दीदर हा २००८-०९ मध्ये (६.८८ टक्के) होता तर २००१-०२ ला सर्वात कमी (-६.०८ टक्के) म्हणजेच ऋणात्मक होता.
- अकोला जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००२-०३ मध्ये नोंदणी झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त १०.१७ टक्के होता तर २००७-०८ ला सर्वात कमी (-७.८९ टक्के) इतका म्हणजेच ऋणात्मक होता.
- कोल्हापूर जिल्ह्यातील बंद झालेल्या कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००४-०५ मध्ये हा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (१३.३३ टक्के) होता तर २००५-०६ ला सर्वात कमी (-१३.६१ टक्के) इतका म्हणजेच ऋणात्मक होता.
- अकोला जिल्ह्यातील बंद झालेल्या कारखान्यांचा वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००५-०६ मध्ये सर्वात जास्त ११.७६ टक्के होता तर २००६-०७ ला सर्वात कमी (-१८.७५ टक्के) होता.
- कोल्हापूर जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००३-०४ मध्ये हा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त (२५.५७ टक्के) होता तर २००६-०७ मध्ये सर्वात कमी (-२८.२४ टक्के) इतका म्हणजेच ऋणात्मक होता.

- अकोला जिल्ह्यातील प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारख्यान्यांच्या संख्येचा वार्षिक वृध्दी दर अभ्यासता २००४-०५ मध्ये हा वार्षिक वृध्दी दर सर्वात जास्त २०.७७ टक्के होता तर २००३-०४ मध्ये सर्वात कमी (-१५.५८ टक्के) इतका म्हणजेच ऋणात्मक होता.

## विविध उद्योगात निर्माण रोजगाराबाबत निष्कर्ष

- अकोला जिल्ह्यात कृषी उद्योगात निर्माण रोजगाराचे अध्ययन करता सर्वाधिक रोजगार हा सन २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या २१.६५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.८४ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात कृषी उद्योगात निर्माण रोजगाराचे अध्ययन करता सर्वाधिक रोजगार हा सन २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १०.३५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.६० टक्के होते.
- अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात कृषी क्षेत्रात निर्माण झालेल्या रोजगाराचे प्रमाण हे जास्त असलेले आढळून येते. म्हणजेच रोजगाराच्या बाबतीत दोन्ही जिल्ह्यात विषमता असलेली आढळून येते.
- अकोला जिल्ह्यात खाणकाम उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १९.१६ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण निरंक होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात खाणकाम उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १३.१५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ७.७० टक्के होते.

- कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत अकोला जिल्ह्यात खाणकाम उद्योगात निर्माण झालेला रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.
- अकोला जिल्ह्यातील वस्तू निर्माण उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या २४.४३ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००८-०९ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ५.१५ होते.
- कोल्हापूर जिल्ह्यातील वस्तू निर्माण उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १०.४४ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.४६ टक्के होते.
- वस्तू निर्माण उद्योगात निर्मित रोजगार हा अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात जास्त निर्माण झालेला आढळून येतो.
- अकोला जिल्ह्यात वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या २१.४७ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ७.७८ होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या ११.५५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००७ ते २००९ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.१९ टक्के होते.
- वीजनिर्मिती, गॅस, पाणी व सांडपाणी सेवा संबंधी उद्योगात निर्मित रोजगार हा अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात जास्त झालेला आढळून येतो.

- अकोला जिल्ह्यात बांधकाम उद्योगात निर्मित रोजगाराची संख्या अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १६.७९ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००६-०७ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.०६ होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात बांधकाम उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००६-०७ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १३.१३ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.०१ टक्के होते.
- अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात बांधकाम उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.
- अकोला जिल्ह्यात घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण १८.८९ होते तर सर्वात कमी रोजगार हा २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १.५३ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या ११.६५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ८.८७ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत अकोला जिल्ह्यात घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.
- अकोला जिल्ह्यात परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला

असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १५.९५ टक्के होते.  तर सर्वात कमी रोजगार हा २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ५.११ होते.

- कोल्हापूर जिल्ह्यात परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १७.६१ टक्के होते.  तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ३.९७ टक्के होते.
- अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात परिवहन, गोदामे आणि दळणवळण उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.
- अकोला जिल्ह्यातील वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००६-०७ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १४.२१ टक्के होते.  तर सर्वात कमी रोजगार हा २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ३.३५ होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००४-०५ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १९.५७ टक्के होते.  तर सर्वात कमी रोजगार हा २००५-०६ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ०.४२ टक्के होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगात रोजगाराच्या स्तरात सतत घट झालेली आढळून येते.
- कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत अकोला जिल्ह्यात वित्त पुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यापार विषयक सेवासंबंधी उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.

- अकोला जिल्ह्यात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगातील रोजगाराची स्थिती अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००१-०२ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या ३३.२५ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २००३-०४ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण निरंक होते.
- कोल्हापूर जिल्ह्यात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगात निर्माण रोजगाराची संख्या अभ्यासता सर्वाधिक रोजगार हा सन २००९-१० मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण एकूण रोजगाराच्या १३.४४ टक्के होते. तर सर्वात कमी रोजगार हा २०००-०१ मध्ये निर्माण झाला असून त्याचे प्रमाण ९.६९ टक्के होते.
- अकोला जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगात निर्मित रोजगार हा जास्त झालेला आढळून येतो.
- अकोला जिल्ह्यात सामुहिक व व्यक्तीगत सेवा संबंधी उद्योगांतर्गत निर्माण रोजगाराच्या पातळीतर उत्तरोत्तर घट झालेली असून कोल्हापूर जिल्ह्यात मात्र त्यात वाढ झालेली आढळून येते.

**प्रादेशिक असमतोल अभ्यासण्यासाठी स्थापित समित्यांच्या अध्ययनातून समोर आलेले निष्कर्ष**

- २०११-२०१२ या वर्षात पश्चिम महाराष्ट्रामध्ये १७४७६ भुखंडापैकी १५९१७ म्हणजे ९१.१% चे वितरण झालेले आहे. विदर्भाचा विचार करता ४७४७ भुखंडापैकी ३५२६ म्हणजेच ७४.३% भुखंडाचे वितरण झालेले दिसून येते.

  म्हणजेच अजुनही भुखंडाच्या वाटपाबाबत विषमता निदर्शनात येत असुन दांडेकरांनी सुचविलेल्या शिफारशीप्रमाणे जरी भुखंडाचे वाटप झाले असले तरी अविकसीत भागात मात्र त्याचे वितरण योग्य प्रमाणात झालेले आढळून येत नाही.

- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या सध्यस्थितीतील विभागवार खर्चाचा विचार करता २०१२ पर्यंत ८९६९४ रु. कोटी खर्च केला गेला असुन

विभागवार खर्चाचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रातील एकूण खर्च ३८७७१ कोटी असुन तो एकूण खर्चाच्या ४३.२३% झालेले आढळतो. तर पश्चिम विदर्भामध्ये हेच खर्चाचे प्रमाण ३०७९ कोटी रु. असून तो एकूण खर्चाच्या केवळ ३.४३% करण्यात आला.

म्हणजेच यावरुन हे स्पष्ट होते की खर्चाच्या बाबतीत सुध्दा दांडेकरांनी सुचविलेल्या शिफारशीचे अनुकरण झालेले नाही.

- महाराष्ट्रातील औद्योगिक वसाहतीची सध्यस्थिती अभ्यासता रोजगाराचे प्रमाण अभ्यासता दांडेकरांनी सुचविलेल्या शिफारशीनुसार रोजगाराच्या बाबतीत अनुकरण झालेले आढळून येत नाही. तर पश्चिम महाराष्ट्राचा विचार करता दर लाख रोजगारामागे ५७१ लोकांना रोजगार प्राप्त झाला असून पश्चिम विदर्भातील हे प्रमाण केवळ ६७ आहे.

म्हणजेच एकूण महाराष्ट्रातील (१,३७,०८२) रोजगारापैकी पश्चिम महाराष्ट्रात ५७१५० (४१.६९%) आणि विदर्भात केवळ ६७७ म्हणजेच (०.४९%) रोजगार प्राप्त झालेला आढळून येतो.

- महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु व मध्यम आणि मोठ्या उपक्रमाची सद्यस्थिती अभ्यासता महाराष्ट्रात सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची संख्या एकूण १६३५६६ असून यापैकी पश्चिम महाराष्ट्रात ६८०८० (४१.६ प्रतिशत) तर पश्चिम विदर्भात ७७१० (४.७ प्रतिशत) एवढे प्रकल्प असलेले आढळून येतात.

म्हणजेच दांडेकर यांनी सुचविलेल्या शिफारशी नुसार पश्चिम महाराष्ट्रात सुक्ष्म व लघु व मध्यम उपक्रम स्थापण्यावर भर देण्यात आला असून महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत पश्चिम विदर्भ सर्वात जास्त पिछाडीवर असून दांडेकराच्या शिफारशीची अमंलबजावणी महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भात मात्र झालेली आढळून येत नाही.

- मोठ्या उपक्रमाचा अभ्यास करता महाराष्ट्रात ४९१५ एवढे उपक्रम असून यापैकी पश्चिम महाराष्ट्रात एकूणाच्या ३०.३ प्रतिशत आणि पश्चिम विदर्भात केवळ एकूण उपक्रमाच्या ३.० प्रतिशत मोठे उपक्रम असलेले आढळतात.

म्हणजेच दांडेकरांनी सांगितलेली प्रादेशिक विषमता विदर्भाच्या बाबतीत आजही पहावयास मिळते. पश्चिम महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र शिफारशीचे काही अंशी अनुकरण झालेले आढळून येते.

- महाराष्ट्रातील सद्यस्थितीतील (२०११-१२) सुक्ष्म, लघु, मध्यम आणि मोठ्या उपक्रमात निर्माण रोजगाराचा विचार करता सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगातील एकूण रोजगार हा २०.९७ लाख असून यापैकी पश्चिम महाराष्ट्रातील रोजगार हा ७.८६लाख म्हणजेच ३७.७ टक्के तर पश्चिम विदर्भात हा रोजगार ०.८९ लाख म्हणजेच ४.३ प्रतिशत इतका कमी आहे.

यावरुन स्पष्ट होते की, दांडेकरांनी सुचविल्या प्रमाणे आजही पश्चिम विदर्भातील रोजगार वाढलेला आढळून येत नाही. प्रत्यक्षात अविकसित असणाऱ्या विदर्भाकडे रोजगार निर्माण करण्यासाठी अधिक लक्ष देण्याची गरज दांडेकरांनी प्रतिपादीत केली होती.

- महाराष्ट्र राज्यात मोठ्या उपक्रमात सद्यस्थितीत निर्माण रोजगार हा ११.२५ लाख असून यापैकी सर्वाधिक रोजगार पश्चिम महाराष्ट्रात निर्माण झाला असून तो एकूण रोजगाराच्या ४.०७ लाख म्हणजेच ३६.२ प्रतिशत होता, तर सर्वात कमी रोजगार हा पश्चिम विदर्भात निर्माण झाला असून तो ०.३२ लाख म्हणजेच २.८ प्रतिशत होता.

यावरुन स्पष्ट होते की, लघु, मध्यम व मोठ्या प्रकल्पातील रोजगाराबाबत मुंबई, कोकण, नाशिक, औरंगाबाद विभागापेक्षा पश्चिम विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील रोजगार वाढविणाऱ्या भर द्यावा ही दांडेकरांनी सुचविलेली शिफारस पश्चिम महाराष्ट्राच्या बाबत जरी लागू झाली असली

तरी पश्चिम विदर्भाच्या बाबतीत मात्र त्यात म्हणावी तशी वाढ झालेली दिसून येत नाही.

- महाराष्ट्र शासनाने स्विकारलेल्या नवीन आर्थिक बदल म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मध्ये सुध्दा प्रादेशिक विषमता दिसून आलेली आहे. म्हणजेच या धोरणातही दांडेकर समितीने सुचविलेल्या शिफारशींचा अवलंब झालेली आढळून येत नाही. विदर्भाच्या बाबतीत ही परिस्थिती पहावयास मिळते. राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्राची संख्या अभ्यासता ही संख्या २००७ अखेर १४४ लाख होती, यापैकी पश्चिम महाराष्ट्रात ४२ म्हणजेच एकूणाच्या ३४.४३ प्रतिशत तर विदर्भात केवळ ९ लाख म्हणजेच एकूणाच्या ७.३८ प्रतिशत होती.

- विशेष आर्थिक क्षेत्राचे हेक्टरी प्रमाण अभ्यासता महाराष्ट्रात हे क्षेत्र ४९,८८० हेक्टर होते, त्यापैकी पश्चिम महाराष्ट्रात १०२२८ हेक्टर म्हणजेच एकूणाच्या २०.५१ प्रतिशत तर विदर्भात ६००४ हेक्टर १२.०३ प्रतिशत होते.

- विशेष आर्थिक क्षेत्रातील गुंतवणूकीचा विचार करता महाराष्ट्र राज्याकरीता झालेली गुंतवणूक ही १,३२,५७८ कोटी रुपये होती, यापैकी पश्चिम महाराष्ट्रात २२,६०७ म्हणजेच एकूणाच्या १७.०५ प्रतिशत तर विदर्भातील गुंतवणूक ही १०४०९ म्हणजेच ७.८५ प्रतिशत झालेली आढळते.

- विशेष आर्थिक क्षेत्रात निर्माण होणारा रोजागार विचारात घेता, महाराष्ट्रातील एकूण रोजगार हा ५३.४८ लाख होता यापैकी पश्चिम महाराष्ट्रात १०.७३ म्हणजेच एकूणाच्या २०.०६ प्रतिशत तर विदर्भात ५.८४ प्रतिशत म्हणजेच एकूणाच्या १०.९१ प्रतिशत रोजगार निर्माण झालेला आढळतो.

- म्हणजेच एकंदरीत विशेष आर्थिक क्षेत्राच्या वरील निकषाच्या बाबतीत विदर्भाच्या वाट्याला आलेले प्रमाण हे दांडेकरांनी सुचविलेल्या अविकसित भागाच्या विकासासाठी आवश्यक १५ टक्क्याच्या तरतुदीपेक्षा कमीच होते.

**७.३ संशोधनाच्या गृहित कृत्यांची फलश्रुतिचे निष्कर्ष-**

"महाराष्ट्रातील औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलाचा तुलनात्मक अभ्यास-संदर्भ विदर्भ (अकोला जिल्हा) व पश्चीम महाराष्ट्र (कोल्हापूर जिल्हा)" या विषयावर संशोधन करतांना काही गृहितके विचारात घेतली होती. संशोधनावरून असे दिसून आले की, संशोधनासाठी निवडलेल्या विभागातील दोन जिल्ह्यांमध्ये औद्योगिक विकासात प्रादेशिक विषमता आहे. अध्ययनासाठी निवडलेल्या गृहितकांची पडताळणी प्रबंधातील प्रकरण पाचव्याच्या आधारे करण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे

- **महाराष्ट्रातील विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन विभागातील औद्योगिक विकासामध्ये प्रादेशिक असमतोल आहे.**

  संशोधनावरून हे दिसून आले की, संशोधनासाठी निवडलेल्या जिल्ह्यामध्ये औद्योगिक विकासाबाबत विषमता आढळून येते. संशोधन कालावधी मध्ये अकोला जिल्ह्यात मिळणारे औद्योगिक क्षेत्रापासून मिळणारे स्थुल आणि निव्वळ उत्पन्न हे कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत कमी आहे त्यामुळे विकासाच्या बाबतीत अकोला जिल्हा पिछाडलेला दिसतो.

- **पश्चिम महाराष्ट्राचा विकास हा विदर्भाच्या तुलनेने अधिक झालेला आहे.**

  पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्याचा विकास हा विदर्भातील अकोला जिल्ह्याच्या तुलनेने अधिक झालेला आहे. कोल्हापूर जिल्हा हा नोंदणीकृत कारखान्यांच्या बाबतीत, कामगारांची संख्या, प्रपत्र पाठविणाऱ्या चालू कारखान्यांची संख्या इ. बाबतीत आघाडीवर आहे त्यामुळे पश्चिम महाराष्ट्राचा विकास हा विदर्भाच्या तुलनेत अधिक आहे.

यावरुन संशोधनासाठी घेतलेली गृहितके वास्तवात आलेली दिसून आली.

## ७.४ उपाययोजना

प्रस्तुत प्रबंधात प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी अध्ययनाच्या आधारे पुढील महत्त्वाच्या उपाययोजना सुचविल्या आहेत. औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत अकोला जिल्हा हा मागे पडला असून कोल्हापूर जिल्हा पुढे गेला आहे. असे

असले तरी महाराष्ट्रातील विविध विभागातील समाविष्ट जिल्ह्यात प्रादेशिक असमतोल पहावयास मिळतो. मुंबई, कोकण यासारख्या विभागांचा विकास झाला असून या विभागांच्या मुलभूत विकास झाल्या असल्यामुळे शासनाकडून जिल्ह्यांना मिळणारा अनुशेष हा त्यांच्या विकासात उत्त्तरोत्तर अधिक वाढ करीत आहे. याउलट मागास विभागांना सुध्दा अनुशेष मिळत असून त्यातून केवळ त्यांच्या मुलभूत गरजाचांची पूर्तता होत असल्यामुळे या विभागांचा पाहिजे तसा विकास झालेला आढळत नाही त्यामुळे ही असमतोलाची दरी वाढत आहे. ही दरी बुजविण्याचे कार्य करण्याच्या अनुषंगाने पुढील उपाय सुचविता येतील.

१. जिल्ह्यांच्या औद्योगिक विकासासाठी भांडवली खर्चात वाढ करावी. जेणेकरून जिल्ह्यांचे मागासपण दूर होण्यास मदत होईल.

२. जिल्ह्यातील औद्योगिक विषमता कमी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावावी.

३. जिल्ह्यांचे औद्योगिक मागासपण दूर करावे यासाठी प्रामुख्याने दांडेकरांनी सुचविलेल्या ८५ आणि १५ टक्के या सुत्राचा वापर करावा.

४. औद्योगिक क्षेत्रात मुलभूत सोयी, सेवांचा विकास करावा.

५. सर्वसमावेशक नियोजन करावे म्हणजेच विकासोन्मुख सर्व क्षेत्रांचा समावेश करुन नियोजनाची आखणी आणि अमंलबजावणी करावी.

६. औद्योगिक क्षेत्रात कामगारांसाठी आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

७. शासनाने विकासोत्तर खर्च कमी करून विकास खर्चात वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे.

८. बंद कारखान्यात घट होण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजने आवश्यक आहे.

९. बेकारी दूर करून स्थानिक रोजगाराच्या प्रमाणात वाढ होण्याची दृष्टीने योजना आखणे आवश्यक आहे.

१०. चालु आणि स्थिर किमतीनुसार मिळणाऱ्या स्थुल आणि निव्वळ उत्पन्नातील जिल्हानिहाय विषमता कमी करवी.

११. उत्पन्नातील विषमता कमी करण्यासाठी जिल्ह्यातील औद्योगिक पातळीवर चालविल्या जाणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन द्यावे.

१२. औद्योगिक स्तरावर कामगारांची दैनिक सरासरी संख्येतील विषमता कमी करण्यासाठी त्यांना मिळणाऱ्या सामाजिक सुरक्षिततेत वाढ करावी.

१३. औद्योगिक स्तरावर काम करणाऱ्या स्त्री कामगारांना आवश्यक सोयी सुविधा पुरवाव्यात.

१४. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक पातळीवर रोजागार उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करावेत.

१५. अकोला जिल्ह्यातील औद्योगिकरण वाढविणे आवश्यक आहे यादृष्टीने पाहणी करावी.

१६. जिल्ह्यातील उद्योगांमध्ये विदेशी गुंतवणुका वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

१७. उद्योगांची प्रतवारी वाढवावी.

१८. निरनिराळ्या उद्योगांची स्थापना होण्याच्या दृष्टीने योजना आखाव्यात.

१९. सुशिक्षित बेरोजगारांना नवीन उद्योग स्थापन करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करावे व नवीन उद्योग स्थापन करण्यास आर्थिक सहाय्य प्रदान करावे.

२०. औद्योगिक विषमता कमी करण्यासाठी योग्य ती व्युव्हनिती आखण्यात यावी.

२१. औद्योगिक विकासाबाबतीत अकोला हा जिल्हा कोल्हापूर पेक्षा मागे या जिल्ह्यास पुढे आणण्यासाठी संशोधनाची गरज आहे.

२२. जिल्ह्यांच्या समतोल विकासासाठी औद्योगिक क्षेत्राताच्या विकासावर भर देण्यात यावा.

२३. मागास जिल्ह्यांना पुढे आणण्यासाठी योग्यवेळी तात्काळ निधीचे योग्य वाटप झाले पाहिजे.

२४. वित्त पुरवठ्याबाबत नियोजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

२५. ज्याठिकाणी कच्चा माल उत्पादित होतो तेथेच उत्पादन प्रक्रिया झाली पाहिजे. त्यामुळे स्थानिक भागाचा सामाजिक व आर्थिक विकास व वृध्दी होईल.

प्रस्तुत अभ्यासावरून असे दिसून येते की, वरील सर्व उपाय एकत्रित व प्रभावीरीत्या अमलात आणल्यास प्रादेशिक स्तरावर विषमता कमी होऊन परिवर्तन घडून येण्यास मदत होईल.


• संदर्भ ग्रंथ सूची
• ¯Öx¸|x¿ÖÂ™|

# संदर्भ ग्रंथ सूची

## (Bibliography)

ƒ **इंग्रजी संदर्भ :**


1) Alexander P.C., (1963).,*Industrial Estates in India*, Asia Publication house, Bombay-1963.

2) Alagh Yoginder K., (1972)., Regional Aspects of Indian *Industrialization Structure & Policies*, Seminar on Regional Imbalances- The Problem & Polices, Indian Institute Public Administration New Delhi. MIT Press Cambridge.

3) Bhandakar,P.L.,Wilkinson,T.S (2010).,*Methodology and Techniques of Social Research*.,Himalaya Publishing house Mumbai.

4) Bhattacharya K.N., (1970)., *Balance Regional Development Location of New Industries*., I.B.H Publication Calcutta.

5) Chand Mahesh & Puri V.K., (1983)., *Regional Planning in India*., New Delhi.

6) Godbole M.D.,(1978)., *Industrial Disperse Polices*., Himalaya Publishing House New Delhi.

7) Gadgil Gangadhar & Deshpande Arvind A., (1988)., *Maharashtra: Problems, Potential and Prospects*, Somaiya Publication Pvt.Ltd., Mumbai.

8) Govt. of Maharashtra, (1993)., *Dispersal of Industries-package scheme of incentives*.

9) Kothari C.R(2010)., *Research Metholodgy Methods & Techniques* New Age International (P) Ltd. Publisher,Ansari Road Daryaganj New Delhi.

10) Kunda Amitabh and Moonis Raz., (1980)., *Regional Disparities in India*, Indian Council of Social Science Research, New Delhi.

11) Mandal S.K.,(1987)., *Regional Disparities and Imbalances in India's Planned Economic Development*., Deep and Deep Publications, New Delhi.

12) Mydral Gunnar.,(1963)., *Economic Theory and Underdeveloped Regions.,* Methuen London.

13) Patel M.C., (1975)., *Dilemma of Balance Regional Development in India*., Progress Publishers, Bhopal.

14) Pathale Mahesh T.,(1974).,*Development of Backward Areas, Problems and Prospects* in M.P.Patel. J.H. Adhvaryu etc (eds) Economic Development of Backward Regions Vallabh Vidyanagar.

ƒ **वार्षिक अहवाल :**

1) Directorate of Economics and Statistics, Govt. of Maharashtra., Economic survey of Maharashtra.2000-2010.
2) Govt. of India., “Report working Group on Identification of Backward Area”, Planning Commission New Delhi, Feb-1969 (Pande Working Group)
3) Govt. of India., “Report of Working Group –Fiscal & Financial Incentives for starting Industries in Backward Area”, Development Commissioners (SSI) Ministry of Industrial Development. New Delhi.(April-1969 Wanchoo Working Group)
4) Govt. of Maharashtra, “Report of Fact Finding Committee on Region Imbalance in Maharashtra”, Planning Departmental Bombay, April-1984.
5) Annual Survey of Industries -1980-2010.

ƒ **मराठी संदर्भ :**

१) आगलावे,प्रदिप (जुलै,२००२)., भारतीय समाज:संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

२) आगलावे,प्रदिप (जाने,२०००)., संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

३) बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, ॲड.मृणाल कुलकर्णी (जाने,२००३), सामाजिक संशोधन पध्दती, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) भांडारकर पु.ल.(१९९९)., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळासाठी वसंत पिपंळापूरे,विद्या बुक्स औरंगपुरा, औरंगाबाद.

५) भोसले के.एम., स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था., विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

६) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अकोला आणि कोल्हापूर जिल्हा-२०१२., अर्थ व सांख्यिकी संचालनालय मुंबई.

७) दि.व्य.जहागिरदार., महाराष्ट्र: ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा., सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती., २०१२.

८) घाटोळे,रा.ना. (२००३).,समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती,श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.

९) डॉ. जंगले मंगला, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. (२००८).

१०) कुलकर्णी, बी.डी.,ढमढेरे,एस.व्ही. (प्रथम आवृत्ती २००७)., अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती,डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

११) कऱ्हाड,बी.एम(जाने २००७).,शास्त्रीय संशोधन पध्दती, पिपंळापूरे ॲन्ड कं.पब्लिशर्स नागपूर.

१२) के. सागर - महाराष्ट्रातील जिल्हे - के सागर प्रकाशन, पुणे, २२ वी आवृत्ती.

१३) सवदी ए.बी., द मेगा स्टेट महाराष्ट्र- निराली प्रकाशन, (२००५)

१४) डॉ.पाटील ज.फा.-आर्थिक वृध्द्ी व विकासाचे अर्थशास्त्र. कोल्हापूर.

ƒ **संशोधन अहवाल (Research Projects) :**

1) Banarjee Pradeep., State Industialzation and Policy Formulation in India- A study of Selected Polices., University of Bombay.,Jauuary-1990.

2) Patil Pandurang., “Regional Imbalance in Maharashtra with Special Reference to South Konkan”, University of Bombay-1988.

3) Godbole M.D., “Impact of Industrial Dispersal Polices- A case Study of Maharashtra”, University of Bombay 1976.

ƒ **मासिके व साप्ताहिके :**

१) योजना मासिक-केंद्रसरकार माहिती व प्रसारण मंत्रालय माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) लोकराज्य-माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र शासन,

३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-महाराष्ट्र शासन मुंबई.(२०००-२०१०)

४) Artha Vigyan-National Journal, Gokhale Institute of Polices and Economics Pune, Various Issues, From 1999-2010.

५) Arthbodha- Journal of Indian School of Political Economy Pune.2010

ƒ **संकेतस्थळ (Websites)**

१. www.maharashtra.gov.in

२. www.mahadesmaharashtra.gov.in

**- परिशिष्ट क्रमांक ९-**

**महाराष्ट्राचा नकाशा**



## - परिशिष्ट क्रमांक २-

## - अकोला जिल्ह्याचा नकाशा -



**- परिशिष्ट क्रमांक ३-**

**- कोल्हापूर जिल्ह्याचा नकाशा -**

